गुरुवार
११
सप्टेंबर २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १८९
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत



अनया बांगर लग्नासाठी उत्सुक (पान ७ वर)

## महत्त्वाचे

### शक्तिपीठ महामार्गाचा आर्थिक बोजा कमी करावा



**जयसिंगपूर :** शक्तिपीठ महामार्गाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने सध्या अस्तित्वात असलेला रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग सहापदरी किंवा आठपदरी करावा व राज्य सरकारवर पडणारा शक्तिपीठ महामार्गाचा आर्थिक बोजा कमी करावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. राज्य सरकार भक्तांनी मागणी केली नसताना शक्तिपीठ महामार्गाचा घाट घालत आहे. पवनार ते पत्रादेवीपर्यंत असलेली सर्व देवस्थाने ही रत्नागिरी- नागपूर या सध्या अस्तित्वात असलेल्या महामार्गालगत आहेत. कोणत्याही देवस्थानला दर्शनासाठी जात असताना वाहतुकीची कोंडी होत नाही. शक्तिपीठ महामार्ग हा फक्त गडचिरोलीच्या खाणीमधील बॉक्साइट गोवा याठिकाणी घेऊन जाण्यासाठी होणार असल्याने सामान्य जनतेला याचा कोणताच लाभ होणार नाही, असे शेट्टी म्हणाले आहेत.

### 'दारू'वर जीएसटी लागू होणार का?



**नवी दिल्ली :** मोबाईल, गाडी, कपडे यांसारख्या सर्वच गोष्टींवर जीएसटी लागू आहे, मग दारू आणि पेट्रोल-डिझेलवर जीएसटी का नाही? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. नुकतेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी याबाबत स्पष्ट उत्तर दिले आहे. सीतारमण एका कार्यक्रमात बोलताना म्हणाल्या की, दारू वर जीएसटी लागू करायचा की नाही, हा निर्णय पूर्णपणे राज्य सरकारांच्या हातात आहे. केंद्र सरकार याबाबत कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. सध्या दारू जीएसटीच्या कक्षेबाहेर आहे. दारू हा राज्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. त्यामुळे त्यावर कर लावण्याचा अधिकार राज्यांकडेच आहे. सध्या मद्य आणि पेट्रोलियम उत्पादनांवर एक्साईज ड्युटी आणि सारखे कर लागतात, जे थेट राज्य सरकारांच्या तिजोरीत जातात.

### सोन्याच्या किंमती आणखी एका उच्चांकावर



**नवी दिल्ली :** सोन्याने आणखी एक उच्चांक गाठला आहे. जागतिक पातळीवरील भूराजकीय स्थितीचा फटका जागतिक सोन्याच्या बाजारपेठेत बसला असताना आता भारतीय सराफा बाजारातही गेल्या २ आठवड्यात सोन्याच्या दरात सर्वाधिक वाढ झाली आहे. काल सोने नव्या उच्चांकावर गेले असताना त्यात आणखी एक भर पडली आहे. गुडरिटर्न्स संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात २१.९० रूपयांनी, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात २० रूपयांनी, १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १६ रूपयांनी वाढ झाली आहे. परिणामी सोन्याचा प्रति ग्रॅ म दर २४ कॅरेटसाठी ११०५१ रूपये, २२ कॅरेटसाठी १०१३० रूपये, १८ कॅरेटसाठी ८२८८ रूपयांवर पोहोचला आहे. संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत २१९ रूपयांनी वाढ झाली असून २२ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत २०० रूपयांनी, १८ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १६० रूपयांनी वाढ झाली.

# सुशिला कार्की होणार नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान?

## भारताशी आहे खास नाते

**काठमांडू, दि. १०** वृत्तसंस्था

नेपाळच्या राजकारणात नवा टप्पा येताना दिसत आहे. हिंसाचार आणि सत्तासंकटाच्या पार्श्वभूमीवर आता देशाची धुरा कोण सांभाळणार, यावर चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर 'जेन-झी' आंदोलकांनी व्हर्च्युअल बैठक घेतली. या बैठकीत माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांचे नाव सर्वाधिक पुढे आले आहे. त्यामुळे सुशीला कार्की यांना नेपाळच्या अंतरिम पंतप्रधानपदाची जबाबदारी मिळू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

नेपाळमध्ये मोठ्या घडामोडी सुरू असून 'जेन-झी'ने नेपाळमधील सरकारविरोधात सुरू केलेल्या निदर्शनांनी मोठ्या प्रमाणात उग्र स्वरूप धारण केलं. त्यानंतर अखेर पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा द्यावा लागला. निदर्शकांचा संताप एवढा होता की निदर्शकांनी पार्लमेंटसह अनेक महत्त्वाच्या इमारतींची जाळपोळ केली. एवढंच नाही तर नेपाळची संसद, सर्वोच्च न्यायालय आणि इतर महत्त्वाच्या इमारतींना आग लावली. (पान २ वर)

### कोण आहेत सुशिला कार्की?



सुशीला कार्की यांचा जन्म ७ जून १९५२ रोजी विराटनगर, नेपाळ येथे झाला. त्यांनी १९७४ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठातून राज्यशास्त्रात मास्टर डिग्री प्राप्त केली. त्या नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाच्या माजी सरन्यायाधीश असून, या पदावर विराजमान होणाऱ्या त्या एकमेव महिला आहेत. ११ जुलाई २०१६ रोजी त्यांनी सरन्यायाधीशपदाची जबाबदारी स्वीकारली होती. कार्की यांचे शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवन काशीशी (वाराणसी) जवळून जोडले गेले आहे. काशीमध्ये शिक्षण घेत असताना त्यांची भेट दुर्गा प्रसाद सुबेदी यांच्याशी झाली, ज्यांच्याशी त्यांनी नंतर विवाह केला. कार्की या विराटनगरच्या कार्की कुटुंबातील असून, त्यांच्या माता-पित्याच्या सात अपत्यांपैकी त्या सर्वात मोठ्या आहेत. नेपाळमध्ये त्यांची प्रतिमा भ्रष्टाचारविरोधी कणखर भूमिका घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची आहे.

### बालेंद्र शहा यांचेही नाव चर्चेत



नेपाळचा पुढचा नेता कोण याची चर्चा देखील सुरू झाली आहे. यात काठमांडूचे युवा महापौर बालेंद्र शहा यांचंही नाव सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चेत आलं आहे. ऑनलाईन कॅम्पेनमध्ये सध्या काठमांडूचे महापौर बालेंद्र शहा आघाडीवर आहेत. बालेंद्र शहा हे बालेन या नावानं प्रसिद्ध असून ते ३५ वर्षाचे आहेत. ते राजकारणात येण्यापूर्वी रॅपर होते. ते २०२२ पासून काठमांडूचे महापौर आहेत. त्यांनी ही निवडणूक अपक्ष म्हणून लढवली आणि जिंकली, ते काठमांडूचे पहिले अपक्ष महापौर ठरले. बालेन यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीबद्दल बोलायचं झालं तर ते सिव्हील इंजिनिअर आहेत. त्यांचं इंडियन कनेक्शन देखील आहे. त्यांनी कर्नाटकातील विश्वेश्वरय्या टेक्लॉलॉजिकल विद्यापीठातून स्ट्रक्चरल इंजिनिअरची डिग्री घेतली आहे. राजकारणात येण्यापूर्वी ते नेपाळच्या हिप हॉप ग्रुपचे सदस्य होते. हा अंडरग्राऊंड हिप हॉपचा ग्रुप देशातील भ्रष्टाचार आणि नेपोटीझमवर आधारीत गाणी तयार करत होता. बालेन यांनी २०२३ मध्ये सर्वांच लक्ष वेधून घेतलं. त्यांनी काठमांडूमध्ये भारतीय चित्रपटांच्या स्क्रीनिंगवर बंदी घातली होती. त्यांचा आदीपुरूष चित्रपटातील संवादांवर आक्षेप होता.



# हैदराबाद गॅझेटियर जीआरवर सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल

**मुंबई, दि. १०** वृत्तसंस्था

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आझाद मैदानातील उपोषणाने राज्य सरकारवर मोठा दबाव निर्माण केला होता. मराठा समाजाच्या वाढत्या संख्येने आणि आंदोलनाच्या आक्रमकपणामुळे सरकारने अखेर मागण्या मान्य केल्या. यानुसार, हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय जारी करण्यात आला, ज्यामुळे मराठवाड्यातील काही मराठा समाजाला कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

तसेच, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचा जीआरही निघाला आहे. मात्र, या निर्णयाविरुद्ध ओबीसी समाजाने आक्षेप घेतला असून, ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर, हैदराबाद गॅझेटियरच्या जीआर विरोधात सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मराठा आंदोलकांच्या बाजूने ॲड. राज पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. २ सप्टेंबर २०२५ रोजी जारी झालेल्या शासन निर्णयाला कोणीही आव्हान दिल्यास, आंदोलकांची बाजू ऐकल्याशिवाय कोणताही निर्णय घेतला जाऊ नये, अशी मागणी या कॅव्हेटद्वारे करण्यात आली आहे. यामुळे, जीआर विरोधातील कोणत्याही याचिकेत आंदोलकांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच, ॲड. राज पाटील यांनी (पान २ वर)

# मतांची चोरी पकडल्यामुळे भाजप देशभरात अस्वस्थ - राहुल गांधींची टीका

**रायबरेली, दि. १०** वृत्तसंस्था

भातीय जनता पार्टीचे लोक संपूर्ण देशात अस्वस्थ आहेत, कारण आम्ही त्यांची मतांची चोरी पकडली आहे. आम्ही ही चोरी महाराष्ट्र, हरियाणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, सर्वत्र पकडली आहे अशी टीका काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. राहुल रायबरेली या त्यांच्या मतदारसंघाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आले आहेत.



दिदौली येथे बूथ कार्यकर्त्यांना संबोधित करताना राहुल म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसभेत आमची आघाडी जिंकते, लोकसभेत आमचा विजय झाल्यावर चार महिन्यांनंतर विधानसभा निवडणुकीत आमचा सफाया होतो. आम्ही तपास केल्यावर लोकसभेनंतर सुमारे एक कोटी नवीन मतदार जोडले गेले असल्याचे आम्हाला आढळले. लोकसभा आणि विधानसभेत आमच्या मतांमध्ये कोणताही फरक नव्हता, भाजपची मते वाढली. जिथे नवीन मतदार आहेत तिथे भाजपची मते वाढली आणि सर्व नवीन मतदार भाजपच्या खात्यात गेले. मी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली, तुम्ही म्हणत आहात की लोकसभेत नवीन मतदार नव्हते, आता तुम्ही म्हणत आहात की विधानसभेत नवीन मतदार आले आहेत. राहुल गांधींचा बटोही रिसॉर्टमध्ये बूथ अध्यक्षांशी भेटण्याचा (पान २ वर)

# शेजाऱ्यांबरोबर भांडण जीवन संपविण्याचे कारण ठरू शकत नाही : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** शेजाऱ्यासोबत झालेला वाद किंवा मारहाणीचा प्रकार घडला असला तरी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६ अंतर्गत जीवन संपविण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा मानला जाऊ शकत नाही, असे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने अपीलकर्ता महिलेची निर्दोष मुक्तता केली.

सारिका आणि गीता या दोन महिला शेजारी राहत होत्या. सारिका ही अविवाहित होती. याच मुद्द्यावरून गीता तिची वारंवार थट्टा करत असे. १२ ऑगस्ट २००८ रोजी सारिकाने रॉकेल ओतून पेटवून घेतले. यात ती गंभीर जखमी झाली. उपचार सुरू असताना २ सप्टेंबर २००८ रोजी तिचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी रुग्णालयात दिलेल्या जबाबात सारिकाने आरोप केला होता की, गीता तिला वारंवार अविवाहित असल्यावरून हिणवत असे आणि अपमान करत असे. १२ ऑगस्ट २००८ रोजी संध्याकाळी गीता व इतरांनी तिच्या कुटुंबासोबत गैरवर्तन करून मारहाण केली. सारिकाने दिलेल्या जबाबावरून चौघांवर गुन्हा दाखल झाला. (पान २ वर)

# सी. पी. राधाकृष्णन शुक्रवारी उपराष्ट्रपती पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेणार

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था

सी. पी. राधाकृष्णन शुक्रवारी (दि.१२ ) उपराष्ट्रपती पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राधाकृष्णन यांना शपथ देतील. राष्ट्रपती भवनातील औपचारिक समारंभात हा शपथविधी पार पडेल. मंगळवारी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत ६७ वर्षीय राधाकृष्णन यांनी विजय मिळवला. त्यांनी विरोधी पक्षाचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. दरम्यान, २१ जुलै रोजी जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा अचानक राजीनामा दिल्याने ही निवडणूक झाली. महाराष्ट्राच्या राज्यपाल पदावर असलेल्या सी. पी. राधाकृष्णन यांना एनडीएने उपराष्ट्रपतीपदाची उमेदवारी दिली. या निवडणुकीत विरोधी पक्षांचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांना पराभूत करून सी. पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपती झाले. देशाच्या १७ व्या उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी आज संसद भवनात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान पार पडले. एकूण ७६८ खासदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. भारतीय संसदेत लोकसभा आणि राज्यसभेसह एकूण ७८८ खासदार आहेत. सध्या दोन्ही सभागृहात ७ जागा रिक्त आहेत. अशाप्रकारे एकूण ७८१ खासदारांना मतदान करायचे होते, त्यापैकी १३ जणांनी मतदानात भाग घेतला नाही. यापैकी बीआरएसचे ४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि १ अपक्ष खासदाराने मतदान केले नाही. ४२७ एनडीए खासदारांनी मतदान केले होते.



# समृद्धी महामार्गावर खिळे कुणी ठोकले?

**नागपूर, दि. १०** वृत्तसंस्था

समृद्धी महामार्गावर खिळ्यांमुळे अनेक वाहनांचे टायर पंक्चर झाल्याच्या घटनेने सोशल मीडियावर मोठा गोंधळ उडाला होता. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आणि नागपूरचे डीसीपी प्रशांत स्वामी यांनी अधिकृत खुलासा केला आहे. त्यानुसार, रस्त्यावर खीळे नव्हे, तर दुरुस्तीच्या कामादरम्यान वापरलेले 'ॲल्युमिनिअम नोजल्स' या घटनेस कारणीभूत ठरले आहेत.

एमएसआरडीसीच्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गाच्या मुंबईकडे जाणाऱ्या पहिल्या आणि दुसऱ्या लेनमध्ये सुमारे १५ मीटर लांबीचे सूक्ष्म तडे आढळले होते. या तड्यांवर 'इपॉक्सी ग्राउटिंग'द्वारे दुरुस्तीचे काम सुरू होते. या कामासाठी 'ॲल्युमिनिअम नोजल्स' लावण्यात आले होते. हे काम ९ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११:३० वाजता पूर्ण झाले. नागपूरचे डीसीपी प्रशांत स्वामी यांनी सांगितले की, काल रात्री एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यात रस्त्यावर खीळे लावल्याचा दावा करण्यात आला. मात्र, खरेतर महामार्गावर देखभाल आणि बळकटीकरणाचे काम सुरू आहे. काल 'इंजेक्टेबल नोजल्स' वापरून हे काम पहिल्या लेनमध्ये केले जात होते, तर दुसरी आणि तिसरी लेन वाहतुकीसाठी खुली होती. बॅरिकेड्स लावण्यात आले होते, पण एका वाहनाने ते तोडले, ज्यामुळे टायर पंक्चर झाले. एमएसआरडीसीने स्पष्ट केले की, कामादरम्यान वाहतूक वळवण्यासाठी 'ट्रॅफिक डायव्हर्जन'ची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, काही वाहनांनी डायव्हर्जनकडे दुर्लक्ष करत वेगाने (पान २ वर)





# नेपाळमध्ये महाराष्ट्राचे १५० पर्यटक अडकले

**मुंबई :** नेपाळमध्ये समाजमाध्यमांवरील बंदीविरोधात स्थानिक तरूणांनी केलेल्या निदर्शनांना हिंसक वळण लागून निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमिवर नेपाळमध्ये महाराष्ट्रातून पर्यटनासाठी गेलेले १५० पर्यटक अडकून पडले आहेत. यामध्ये ठाण्यातील ६७ तर पुणे १९ व बीडमधील ११ पर्यटकांचा समावेश आहे. हे सर्व पर्यटक सुखरूप असले तरी नेपाळमधील सध्याची परिस्थिती पाहता राज्य सरकारने पर्यटकांना नेपाळमध्ये जाऊ नये असे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील नागरिक मोठ्या संख्येने नेपाळमध्ये पर्यटनासाठी गेले आहेत. परंतु, तेथे समाजमाध्यमावरील बंदीमुळे स्थानिक तरूणांनी केलेल्या जाळपोळीमुळे नेपाळमध्ये निर्माण झालेल्या अराजकतेमुळे जनजीवन ठप्प झाले आहे.

# मेळघाटातील शिक्षकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष; वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अन्यायकारक दृष्टिकोन!

। संजय भा. देशमुख ।

**अमरावती, दि. १० :** मेळघाट सारख्या दुर्गम भागात कार्यरत असलेल्या शिक्षकांना केवळ शिक्षणाचं कार्य नाही, तर एक सामाजिक जबाबदारीही पार पाडावी लागते. खडतर भूगोल, रस्त्यांची दुरवस्था, पाण्याचा अभाव, विजेची टंचाई, आणि मूलभूत सुविधांचा अभाव या सगळ्या अडचणींमध्ये शिक्षक अक्षरशः झगडत आहेत. मात्र दुर्दैव म्हणजे, वरिष्ठ अधिकारी या अडचणींना समजून घेण्याऐवजी शिक्षकांवर कारवाई करणेच पसंत करतात.

अडचणी काय आहेत? राहण्याची व्यवस्था नाही बहुतांश शाळा डोंगराळ वस्तीपासून दूर आहेत. शिक्षकांसाठी निवासस्थान तर नाहीच, पण सुरक्षित राहण्याची हमीही नाही. वाहतूक सुविधा शून्य सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसल्याने अनेक शिक्षकांना पायी किंवा खाजगी वाहनाने मैलोनमैल प्रवास करावा लागतो. दैनंदिन जीवनात अडथळे शाळांमध्ये वीज नाही, पाणी नाही, वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या, शैक्षणिक साहित्य अपुरं. स्थानिक अडथळे आणि समज-गैरसमज काही भागांमध्ये शिक्षकांना स्थानिक पातळीवर विरोधाचा सामना करावा लागतो.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका समस्या न ऐकता कारवाई! शिकवण्याच्या दर्जावर प्रश्न उपस्थित करून शिक्षकांवर ताशेरे ओढले जातात. वेळेवर शाळेत अनुपस्थित राहिल्याबद्दल कारणमीमांसा न करता कारणे न विचारता शिस्तभंगाची नोटीस दिली जाते. अहवाल मागवण्याचे दबाव जिथे इंटरनेट किंवा नेटवर्कच नाही, अशा ठिकाणी सुद्धा ऑनलाइन अपडेट्सची मागणी. या सगळ्याचा परिणाम म्हणजे शिक्षकांमध्ये नैराश्य, असंतोष आणि स्थलांतराची मानसिकता वाढते. यावर मेळघाटच्या दृष्टिकोनातून आवश्यक उपाय म्हणजे

एकतर शिक्षकांची अडचण समजून घेणारी समिती स्थापन करणे. प्रशासन आणि शिक्षक यांच्यात नियमित संवाद ठेवणं अनिवार्य करावं. शिक्षकांसाठी निवास आणि प्रवास भत्ता तातडीने लागू करणे. प्रशिक्षण आणि सहकार्याची वृत्ती केवळ कारवाई न करता मार्गदर्शन.स्थानिक स्तरावर शिक्षक (पान २ वर)

## आशिया कप २०२५ — यूएई ५७ धावांवरच गारद

# भारताचा युएईवर ९ गडी राखून धमाकेदार विजय

**दुबई, दि. १०** वृत्तसंस्था

आशिया कप २०२५ चा आज दुसरा सामना भारत आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) संघांमध्ये दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्याद्वारे, दोन्ही संघांनी स्पर्धेतील त्यांच्या मोहिमेची सुरुवात केली. भारताने युएईविरुद्ध टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.



आशिया कप टी-२० स्पर्धेत भारतीय संघाने संयुक्त अरब अमिराती (यूएई) संघाचा एकतर्फी पराभव केला. यूएईने विजयासाठी ठेवलेले अवघ्या ५८ धावांचे लक्ष्य भारताने केवळ ४.३ षटकांत आणि फक्त एक गडी गमावून आरामात पूर्ण केले. ५९ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल सलामीला आले. अभिषेकने पहिल्याच चेंडूवर षटकार आणि त्यानंतरच्या चेंडूवर चौकार ठोकत आपल्या आक्रमक इराद्यांचे संकेत दिले. त्याने पहिल्या षटकात १० धावा चोपल्या. अभिषेकने आपली आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवत अवघ्या १५ चेंडूत ३० धावा फटकावल्या. त्याच्या या धडाकेबाज खेळीत ३ षटकार आणि २ चौकारांचा समावेश होता. जुनैद सिद्दीकीने त्याला बाद करून भारताला पहिला धक्का दिला. त्यानंतर मैदानात आलेल्या सूर्यकुमार यादवने पहिल्याच चेंडूवर षटकार मारून भारतीय संघाची विजयाची भूक दाखवून दिली. दुसरीकडे, सलामीवीर शुभमन गिलने अभिषेकला चांगली साथ दिली आणि ७ चेंडूत १ षटकार आणि १ चौकार लगावत नाबाद १५ धावा केल्या. गिलनेच विजयी चौकार मारत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. या सामन्यात भारताने केवळ २७ चेंडूतच लक्ष्य गाठले, ज्यामुळे क्रिकेट विश्वात एक नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. युएईचा डाव कर्णधार मोहम्मद वसीम आणि अलिशान शराफू यांनी सुरू केला, परंतु भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. संघाला पहिला धक्का २६ धावांवर बसला, जेव्हा जसप्रीत बुमराहने अलिशान शराफू (२२ धावा) ला बाद केले. त्यानंतर २९ धावांवर दुसरा झटका बसला. मोहम्मद जोहेब (२ धावा) देखील वरुण चक्रवर्तीच्या चेंडूवर बाद झाला. नवव्या षटकात कुलदीप यादवने कहर केला. त्याने एकाच षटकात तीन बळी घेतले. यात राहुल चोप्रा (३), कर्णधार मोहम्मद वसीम (१९) आणि हर्षित कौशिक (२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर युएईने ५० धावांवर पाच बळी गमावले. शिवम दुबेने ५१ धावांवर सहावा धक्का दिला. त्याने आसिफ खान (२)ला बाद केले. त्यानंतर ५२ धावांवर अक्षर पटेलने सिमरनजीत सिंग (१)च्या रुपात बळी घेतला. हा युएईला सातवा झटका होता. लवकरच दुबेने ध्रुव पराशर (१) आणि जुनैद सिद्दीकी (२) यांनाही बाद केले. शेवटचा धक्का कुलदीप यादवने दिला. त्याने हैदर अली (१)ला संजू सॅमसन करवी झेलबाद केले. भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर शिवम दुबेने ३ बळी घेतले. जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांना १-१ विकेट मिळाली.

# उपराष्ट्रपती निवडणुकीत भाजपच्या १२ खासदारांचे क्रॉस व्होटींग?

**नवी दिल्ली, दि. १०** वृत्तसंस्था

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत ज्या पक्षांचे क्रॉस व्होटिंग झाले आहे, त्या पक्षांनी त्याचा शोध घेऊन कारवाई करावी असे आम आदमी पक्षाचे राज्यसभेचे सदस्य संजय सिंह यांनी म्हटले आहे. तसेच याच पक्षाचे आणखी एक नेते अनुराग धांडा यांनी एक मोठा दावा करताना या निवडणुकीत २७ विरोधी खासदारांनी सरकारच्या उमेदवाराच्या बाजूने क्रॉस व्होटिंग केले असल्याचे म्हटले आहे.

अनुराग धांडा यांनी असाही दावा केला की, १२ भाजप खासदारांनीही विरोधी उमेदवाराच्या बाजूने क्रॉस व्होटिंग केले आहे. वास्तविक वेगवेगळ्या बातम्यांमध्ये असा दावा केला जात आहे की, उपराष्ट्रपती निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या खासदारांनी क्रॉस व्होटिंग केले. मात्र धांडा यांनी हे दावे पूर्णपणे



फेटाळून लावले. आम आदमी पक्षाचे लोकसभेत तीन खासदार आहेत. होशियारपूरमधून राजकुमार छब्बेवाल, संगरूरमधून गुरमीत सिंग मीत हेयर आणि आनंदपूर साहिबमधून मालविंदर सिंग कांग हे खासदार आहेत. आपचे राज्यसभेत एकूण नऊ खासदार आहेत. नारायण दास गुप्ता, स्वाती मालीवाल आणि संजय सिंह दिल्लीतून राज्यसभेत गेले आहेत. पंजाबमधून राघव चड्ढा, अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक, विक्रमजीत साहनी, हरभजन सिंग आणि संत बलबीर सिंग हे राज्यसभेवर गेले आहेत.

# पान 1 वरून...

## सुशीला कार्की होणार ...

अखेर के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला आणि नेपाळमधील परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आता नेपाळमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी देखील सुरू असून माजी न्यायाधीश सुशीला कार्की नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान होण्याची शक्यता आहे. सुशीला कार्की या नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश होत्या. माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांना नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान करण्यासाठी 'जेन-झी'च्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. नेपाळच्या राजकारणात सध्या भूकंप आला आहे. 'जेन-झी' आंदोलनाच्या दबावामुळे पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. यानंतर सत्ता कोणाच्या हाती जाणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. याच प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी 'जेन-झी' आंदोलकांनी एका व्हर्च्युअल बैठकीचे आयोजन केले. या ऑनलाइन सभेत ५,००० हून अधिक तरुणांनी सहभाग घेतला. यात सुशीला कार्की यांना सर्वाधिक पाठिंबा मिळाला. विशेष म्हणजे, कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या तरुणाला नेतृत्वाची संधी देऊ नये, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. आंदोलन पूर्णपणे निष्पक्ष आणि राजकीय हस्तक्षेपमुक्त ठेवण्याचा उद्देश यामागे होता. सुशीला कार्की या सध्या कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसून, त्या सामाजिक कार्यकर्त्या आणि माजी न्यायाधीश असल्याने त्यांना या भूमिकेसाठी सर्वात योग्य मानले गेले आहे. सुशीला कार्की यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मात्र, २०१७ मध्ये माओवादी सेंटर आणि नेपाळी काँग्रेसने त्यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणला होता. या कदमाचा देशभरात तीव्र विरोध झाला. सर्वोच्च न्यायालयानेही संसदेला हा प्रस्ताव रोखण्याचे आदेश दिले आणि अखेरीस हा प्रस्ताव मागे घ्यावा लागला. या घटनेने कार्की यांना दबावाला न झुकणारी आणि ठाम व्यक्तिमत्त्व म्हणून देशभरात ओळख मिळवून दिली. सुशीला कार्की यांच्या या कणखर आणि निष्पक्ष व्यक्तिमत्त्वामुळे त्या नेपालच्या सध्याच्या राजकीय संकटात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## हैदराबाद गॅझेटियर जीआरवर ...

राज्य सरकारनेही कॅव्हेट दाखल करावे, अशी मागणी केली आहे.

कॅव्हेट म्हणजे काय?

कॅव्हेट ही एक कायदेशीर नोटीस आहे, जी न्यायालयात दाखल करून संबंधित प्रकरणात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी कॅव्हेट दाखल करणाऱ्या पक्षाला पूर्वसूचना देण्याची विनंती केली जाते. यामुळे, कॅव्हेट दाखल करणाऱ्या व्यक्तीला किंवा गटाला कोर्टात आपली बाजू मांडण्याचा कायदेशीर अधिकार मिळतो. या प्रकरणात, कॅव्हेटमुळे मराठा आंदोलकांना जीआर विरोधातील याचिकांवर आपली भूमिका स्पष्ट करण्याची संधी मिळेल, आणि कोणताही निर्णय एकतर्फी होणार नाही.

## मतांची चोरी पकडल्यामुळे भाजप...

कार्यक्रम ठरला होता. ते कार्यक्रमस्थळी पोहोचण्यापूर्वीच, राज्य सरकारचे स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री प्रताप सिंह यांनी त्यांच्या समर्थकांसह काठवाराजवळ धरणे आंदोलन सुरू केले. यावर अधिकाऱ्यांनी खासदार राहुल गांधी यांचा ताफा वाटेतच थांबवला. स्वतंत्र प्रभार राज्यमंत्र्यांचे समर्थक हातात फलक घेऊन होते ज्यात राहुल गांधी परत जा असे लिहिले होते. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी राज्यमंत्र्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु जोरदार निदर्शनांवर समर्थक ठाम राहिले. बराच वेळ वाट पाहिल्यानंतर, खासदारांचा ताफा महामार्गाच्या दुसऱ्या लेनमधून बाहेर काढण्यात आला.

## मेळघाटातील शिक्षकांच्या ...

स्नेहवृत्तीने टिकून राहतील अशी धोरणं आखणं. शिक्षक म्हणजे केवळ कर्मचारी नाहीत, ते राष्ट्रनिर्माते आहेत. मेळघाटसारख्या दुर्गम भागात काम करणाऱ्या शिक्षकांना आधाराची, समजूतदारपणाची आणि सहकार्याची गरज आहे कारवाईची नव्हे. शासनाने जर त्यांचा सन्मान केला, तर ते शंभरपटीने अधिक समर्पणाने काम करतील.

## शेजाऱ्यांबरोबर भांडण जीवन ...

कनिष्ठ न्यायालयाने चार सहआरोपींना निर्दोष सोडले; परंतु गीताचे वर्तन चिथावणी देण्यासारखे होते, असे स्पष्ट करत तिला दोषी ठरवले होते. या विरोधात तिने कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली. गीताचे वर्तन हे सारिकाने जीवन संपविण्यासाठी चिथावणी देण्यासारखे होते, या मताला कर्नाटक उच्च न्यायालयाने अंशतः पुष्टी दिली. सारिका ही एक संवेदनशील व्यक्ती होती जिने सतत छळ सहन केल्यानंतर हे टोकाचे पाऊल उचलले, असे स्पष्ट करत गीताला तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. उच्च न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेला गीताने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. तिच्या याचिकेवर न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, शेजाऱ्यांबरोबरची भांडणे दुर्दैवी आहेत; परंतु समूह म्हणून जीवन जगताना ती एक सामान्य बाब आहे. तुमच्या शेजाऱ्यावर प्रेम करा, ही आदर्श परिस्थिती असली तरी, शेजाऱ्यांसोबत भांडणे सामाजिक जीवनातील सर्वसामान्य घटना आहे. प्रश्न असा आहे की, जीवन संपविण्यास प्रवृत्त करण्याचा खटला तथ्यांवरून घडला आहे का? या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या पुराव्यांमधून हा प्रकार जीवन संपविण्यासाठी प्रवृत्त करण्यात आला हे सिद्ध झालेले नाही.

## समृद्धी महामार्गावर खिळे कुणी ...

नोजल्सवरून प्रवास केला, ज्यामुळे १० सप्टेंबरच्या रात्री १२:१० वाजता तीन वाहनांचे टायर पंक्चर झाले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग गस्त वाहन रात्री १२:३६ वाजता घटनास्थळी दाखल झाले. सुदैवाने यात कोणताही अपघात किंवा जीवितहानी झाली नाही. दुरुस्तीसाठी लावलेले 'ॲल्युमिनिअम नोजल्स' १० सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजता काढण्यात आले असून, सध्या महामार्गावरील वाहतूक सुरळीत आहे. दरम्यान, या घटनेत ट्रॅफिक डायव्हर्जनसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आले.

### कुणबी प्रमाणपत्रे ठरली वैध, हजारो अर्जांची तपासणी सुरूच

# हैद्राबाद गॅझेटिअरनुसार ८ जिल्ह्यांत कुणबी नोंदींची पडताळणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि.१० :** मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या संघर्षाला अखेर यश मिळाले आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी हैदराबाद गॅझेटिअरचा जीआर काढल्यानंतर, आता मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया प्रत्यक्ष सुरू झाली आहे.




मनोज जरांगे यांनी काही दिवसांपूर्वीच कुणबी प्रमाणपत्र वाटप सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार सरकारने मराठवाड्यात ही प्रक्रिया सुरु केली. हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन गावपातळीवर समित्या गठीत करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. समिती सदस्यांसाठी विशेष प्रशिक्षण सत्रे आणि कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देशही विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिले आहेत.

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशीव, लातूर, हिंगोली, बीड, नांदेड आणि परभणी या आठ जिल्ह्यांना यासंदर्भातील पत्रे पाठवली आहेत.

गावपातळीवर गठीत समित्या (ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी) चौकशी करून अर्जदारांना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यास सहाय्य करतील.मराठवाड्यातील ८,५५० पैकी १,५१६ गावांत कुणबी नोंदी आढळल्या आहेत. ज्या गावांत नोंदी उपलब्ध नाहीत, तेथील अर्जदारांना १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वी रहिवासी असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करता येईल. त्यानंतर सक्षम अधिकारी चौकशी करून प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतील.

## अकोल्यातील आदिवासी विकास प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामात निकृष्ट साहित्य वापरल्याचा आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** एकाकी आदिवासी विकास प्रकल्प, शकीला (जि. अकोला) येथे उभारल्या जात असलेल्या कार्यालयीन इमारतीच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. स्वामी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती मार्फत तब्बल ५ कोटी ९० लाखांचा करार देण्यात आला होता. नामांकित कंपन्यांचे सिमेंट वापरण्याची अट असतानाही कंपनीने तामिळनाडूमधील सागर या निकृष्ट सिमेंटचा वापर केला असल्याचे समोर आले आहे.

३० जुलै २०२५ रोजी कार्यकर्त्यांनी पाहणी केली असता इमारतीच्या भिंतींना व कंपाऊंड वॉलला तडे गेलेले आढळले. तळमजल्यावर शासनाला दाखवण्यासाठी ए.सी.सी. सिमेंटची पोती शो पीस म्हणून ठेवण्यात आली होती, मात्र दुसऱ्या मजल्यापासून पुढे संपूर्ण इमारतीत निकृष्ट दर्जाचे सिमेंटच वापरले गेले. बांधकामस्थळी दारूच्या बाटल्या व चकना आढळले, तसेच उपस्थित पर्यवेक्षकाने ''कंपनी मोठी आहे, इंजिनिअर्स आमच्या खिशात आहेत'' असे म्हणत कार्यकर्त्यांना धमकावले, असा आरोप आहे.

करारातील अनेक नियम धुडकावून बांधकाम सुरू ठेवण्यात आले आहे. सुरक्षा म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची अटदेखील पाळलेली नाही. इमारतीमध्ये अतिजुमार दर्जाचे वायरिंग आणि साहित्य वापरले गेले असून ही इमारत तीन ते चार वर्षांत धोकादायक ठरेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष श्री गजानन स. डाबेराव यांनी शासनाला निवेदन सादर करून स्वामी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीसह संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## अपुऱ्या सुविधा, वेरूळ लेणीत पर्यटकांचे होत आहेत हाल!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**खुलताबाद , दि.१० :** जागतिक वारसा स्थळ असलेल्या जगप्रसिद्ध वेरूळ लेणीमध्ये दिवसेंदिवस पर्यटकांचा ओढा वाढत आहे मात्र या ठिकाणी येणाऱ्या हजारो पर्यटकांचे अपुऱ्या सुविधांमुळे दररोज हाल सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की वेरूळ हे जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी दिवसेंदिवस पर्यटकांचा ओढा वाढत असताना मात्र या ठिकाणी केवळ बारा पर्यटक मार्गदर्शक (गाईड) असल्याने आणि त्या पर्यटक मार्गदर्शकांची फीस ही आवाक्याच्या बाहेर असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांचे मोठे हाल होत असल्याचे दिसून येते आहे. परिणामी दोन दोन तास पर्यटकांना पर्यटक मार्गदर्शकांची वाट पाहावी लागत असल्याने त्यांचा अमूल्य वेळ हा वाया जातो आहे.त्यातच या ठिकाणी नव्यानेच सुरू केलेल्या ई व्हेईकल्स या केवळ दहा सुरू असून लेणी क्रमांक एक ते ३४ पर्यंत पर्यटकांना पर्यटकांकडून पूर्ण लेणी दाखवण्याची फीस घेतली जाते. मात्र फक्त १६ ते ३४ या लेणी दरम्यानच पर्यटकांना सदरील ई व्हेईकल्सने ने आण करतात.

## घरगुती गणेश दर्शन स्पर्धेच्या पारितोषिक वितरणाचा भव्य सोहळा १३ सप्टेंबरला

### मुंबईसह देश-विदेशातून ९०७ स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि.१० :** संत तुकोबारायांच्या ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे'' या अभंगातील संदेशाला जीवंत करत, निसर्ग संवर्धनाचा मार्ग पसरवणाऱ्या 'जाणीव' संस्थेच्या वतीने आयोजित घरगुती गणेश दर्शन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, श्री शिवाजी पार्क, दादर येथे करण्यात आले आहे.

संस्थेची स्थापना मुळांची आणि मूल्यांची जाणीव ठेवणाऱ्या या उपक्रमासाठी झाली. प्रेरणा म्हणून पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याची पायवाट आणि निसर्ग संवर्धनातील दृष्टिकोन आहे. यासह, उद्धव ठाकरे यांनी पर्यावरण आणि स्वच्छतेच्या क्षेत्रात सखोल मार्गदर्शन केले. युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी पर्यावरण विषयासाठी जीवतोड मेहनत घेत संस्थेला ऊर्जा दिली आहे. गेल्या चार वर्षांपासून 'जाणीव' संस्थेने पर्यावरणपूरक तसेच सामाजिक विषयांवर आधारित घरगुती गणेश दर्शन स्पर्धा आयोजित केली आहे. यंदा मुंबई, महाराष्ट्र, देशभरासह परदेशातूनही उत्स्फूर्त सहभाग नोंदला गेला असून, तब्बल ९०७ स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. घरगुती गणेशोत्सवात पर्यावरणपूरक संदेश पोहोचवण्याचा हा उपक्रम यशस्वी ठरला आहे.या पारितोषिक वितरण सोहळ्यात स्वर्णस्वर इंटरटेनमेंट प्रा. लि. निर्मित, माधुरी नारकर यांच्या संकल्पना व दिग्दर्शनातून 'ओमकार स्वरूपा' ही गणपती विशेष करमणूक सादर केली जाणार आहे. 'आमची माती, आमची संस्कृती' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम प्रेक्षकांना मातीची, संस्कृतीची आणि परंपरेची ओळख करून देईल. शिवसेना नेते व खासदार, माजी केंद्रीय मंत्री, अरविंद सावंत यांनी सर्व गणेशभक्तांना सोहळ्यास सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आयोजक, प्रायोजक व नियोजक यांचे मनोबल वाढवावे, तसेच पर्यावरणपूरक व सामाजिक संदेश अधिक लोकांपर्यंत पोहोचवावा, असेही त्यांनी सांगितले.

## आरोग्यमंत्र्यांच्या चर्चेनंतर एनएचएम कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.१० :** गेल्या २३ दिवसांपासून सुरू असलेला राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर मागे घेण्यात आला. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह झालेल्या दीर्घ चर्चेनंतर १३ पैकी १० मागण्यांना तत्वतः मान्यता देत लेखी आश्वासन देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची सकारात्मक भूमिका असल्याचे आबिटकर यांनी बैठकीत स्पष्ट केले. १९ ऑगस्टपासून राज्यभरातील सुमारे ३५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी बेमुदत कामबंद आंदोलन छेडले होते. या आंदोलनात आरोग्य सेवेतील तब्बल १६ संघटना प्रथमच एकत्रित आल्या होत्या. आज झालेल्या निर्णायक बैठकीला आरोग्यमंत्री आबिटकर, आयुक्त कादंबरी बलकवडे, संचालक नितीन अंबाडेकर तसेच संघटनेचे राज्य समन्वयक मनोज कडू,विजय गायकवाड, दिलीप उटाणे, ॲड. भाग्यश्री रंगारी, डॉ. दत्ता गायकवाड, डॉ. राम नागे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. आबिटकर यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी सकारात्मक भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी काही वेळ लागेल, मात्र मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावर पूर्ण सहकार्य राहील. उर्वरित तीन मागण्यांवर लवकरच कार्यवाही होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तत्वतः मंजूर झालेल्या मागण्यांमध्ये कर्मचाऱ्यांना वार्षिक ८ टक्के वेतनवाढ, २०१६ पूर्वी व नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांतील वेतनातील तफावत दूर करणे, लॉयल्टी बोनस पुन्हा सुरू करणे, विमा संरक्षण योजना, ईपीएफ व ग्रॅच्युटी योजना लागू करणे आणि १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन यांचा समावेश आहे. या निर्णयानंतर संघटनेचे समन्वयक विजय गायकवाड यांनी संप मागे घेत असल्याची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात १३ हजार कर्मचाऱ्यांना थेट फायदा होणार असून, टप्प्याटप्प्याने सर्व कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दि विदर्भ डेली न्युज पेपर असोसिएशनच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.१० :** अकोला येथे मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी दि विदर्भ डेली न्युज पेपर असोसिएशनच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी विदर्भ डेली न्यूज पेपर असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण चांडक , लोकमतचे संतोष चिपडा , दैनिक भास्करचे रांका , दैनिक नवभारतचे शुक्ला यांचा अकोला जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघाच्या वतीने अध्यक्ष संतोष बारस्कर यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला व नवीन कार्यालय उदघाटाच्या याप्रसंगी शुभेच्छा दिल्या व त्यांच्यासोबत विविध विषयांवर




चर्चा करण्यात आली या प्रसंगी अकोला शहरातील सर्व प्रमुख वृत्तपत्र वितरक व संपूर्ण टॅक्सी धारक उपस्थित होते.

## आरोग्यमंत्री येणार, चाहूल लागताच रुग्णालय 'चमकले'; फक्त वरवरचा दिखावा!

### स्त्री रुग्णालयातील घाण, भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनावर पडदा?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि.१० :** आरोग्यमंत्री आबिटकर गुरुवारी अकोल्यात दाखल होणार, ही माहिती कळताच जिल्हा शासकीय स्त्री रुग्णालय प्रशासनाची अक्षरशः धांदल उडाली. मंत्री येणार असल्याचे समजताच काही तासांतच रुग्णालयात घाईघाईने स्वच्छतेची मोहीम राबवण्यात आली. गलिच्छ वार्ड, दुर्गंधीने भरलेले कॉरिडॉर, रक्ताचे डाग आणि थुंकीच्या खुणांनी विद्रूप झालेल्या भिंती एका रात्रीत स्वच्छ करून रुग्णालयाला तात्पुरते चमकदार स्वरूप देण्यात आले. मात्र, हा फक्त वरवरचा दिखावा असून खरे वास्तव लपवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप रुग्ण आणि नागरिकांकडून केला जात आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून रुग्णालयातील लिफ्ट बंद आहे. लिफ्टच्या खड्यात जैविक कचरा कुजत पडलेला असून त्यामुळे संपूर्ण रुग्णालयात उग्र दुर्गंधी पसरली आहे. वार्डमधील खिडक्या लाल थुंकीच्या डागांनी विद्रूप झालेल्या आहेत. अनेक बेडवर बेडशीट नसल्याने रुग्णांना उघड्यावर झोपावे लागत आहे. शिवाय, नर्स आणि कर्मचाऱ्यांकडून उद्धट वागणूक मिळाल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत.

अशा परिस्थितीतदेखील या रुग्णालयाला निर्देशांकात प्रथम क्रमांक मिळाला, ही बाब नागरिकांच्या गळ्यात काटा ठरली आहे. प्रश्न असा की, जिथे मूलभूत सुविधा नाहीत आणि भ्रष्टाचाराचे साम्राज्य आहे, तिथे प्रथम क्रमांक कसा मिळाला? या रुग्णालयात मनुष्यबळ पुरवठा घोटाळा, अधिसेविकेचा भ्रष्टाचार, भंगार घोटाळा असे गंभीर प्रकार उघड झालेले आहेत. तरीदेखील प्रशासन मंत्रीसमोर केवळ सजवलेली प्रतिमा दाखवून सत्य लपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. अकोल्यातील नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोग्यमंत्री आबिटकर यांना विनंती केले की, त्यांनी या साफसफाई व सादरीकरणावर विश्वास न ठेवता अचानक पाहणी करावी. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून प्रत्यक्ष तक्रारी ऐकून या रुग्णालयातील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी.

जर चौकशी झाली, तर रुग्णालय प्रशासनाचा खरा चेहरा उघडकीस येईल, असा ठाम विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. मंत्री आबिटकर यांनी केवळ कागदोपत्री यश दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांना जाब विचारून या रुग्णालयाचे वास्तव राज्यभर उघड करावे, अशी मागणी होत आहे.

## भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणारा प्रायव्हेट जेट बाजार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नवी दिल्ली, दि. १० :** भारताने खाजगी विमान वाहतुकीत मोठी झेप घेतली असून, जगातील सर्वांत वेगाने वाढणारा प्रायव्हेट जेट बाजार म्हणून भारत उदयास आला आहे. या वाढीमुळे भारताने चीनला मागे टाकत आशियामध्ये सर्वाधिक प्रायव्हेट जेट मालक असलेला देश म्हणून आपली आघाडी पक्की केली आहे.२०२१ ते २०२४ दरम्यान भारतातील खाजगी विमान ताफ्यात तब्बल २५ टक्क्यांची वाढ झाली, तर त्याच काळात चीनच्या ताफ्यात जवळपास एक-तृतीयांश घट झाली. २०२४ अखेर भारताकडे ४९० हून अधिक प्रायव्हेट जेट्स आहेत, तर २०२९ पर्यंत ही संख्या ७०० च्या घरात जाण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.भारताच्या अर्थव्यवस्थेतील मजबुती, वाढता उच्च व मध्यमवर्ग आणि कार्यक्षम व्यावसायिक प्रवासाची गरज यामुळे या क्षेत्रात विक्रमी वाढ होत आहे. खाजगी विमान उड्डाणांची संख्या तर गेल्या काही वर्षांत तब्बल तीनपट वाढून दरमहा २,४०० हून अधिक फ्लाइट्सपर्यंत पोहोचली आहे.भारताच्या या झेपेमुळे जागतिक खाजगी विमानवाहतूक क्षेत्रात देशाचे महत्त्व अधिक ठळकपणे अधोरेखित झाले आहे.

**सुविधा** | सागरी महामंडळाचा निर्णय

# आता प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंबई, दि. १० :** मुंबईच्या पारंपरिक फेरी बोटी आता डिजिटल युगात पाऊल ठेवत आहेत. भाऊचा धक्का ते रेवस, उरण, मोरा, तसेच गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा, एलिफंटा, अलिबाग या मार्गांवरील प्रवास आता अधिक सोयीस्कर, पारदर्शक व सुरक्षित होणार आहे. ई-तिकीट खरेदी प्रणालीसह बोटीची रियल टाइम माहिती प्रवाशांना लवकरच उपलब्ध होणार आहे. सागरी महामंडळाने यासाठी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात एक बैठक नुकतीच पार पडली.



मुंबई व आसपासच्या समुद्रकिनारी असलेली गावे, छोटे बंदर आणि पर्यटनस्थळांसोबत जोडणाऱ्या पारंपरिक फेरी बोटी सेवा अनेक दशकांपासून प्रवासी वाहतूक करीत आहेत. गेल्या काही वर्षांत आधुनिक वॉटर टॅक्सी आणि रो-रो सेवा सुरू झाल्या असल्या तरी स्वस्त, सोयीस्कर आणि मोठ्या प्रवासी क्षमतेमुळे पारंपरिक फेरी बोटींची लोकप्रियता अजूनही कायम आहे.

गेटवे ऑफ इंडियावरून एलिफंटा बेटाकडे जाणाऱ्या एका लाकडी फेरी बोटीच्या अपघातानंतर समुद्री सुरक्षा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर फेरी बोटचालक व संचालकांनी सुरक्षिततेसाठी बोट ट्रॅकिंग सिस्टीम बसवण्याचे निर्णय घेतले आहेत. ही प्रणाली भारतीय नौदलाकडून विकसित केली जात आहे.

या प्रणालीअंतर्गत समुद्रात कोणती बोट कुठे आहे, याची रियल टाइम माहिती सागरी महामंडळ आणि मुंबई पोर्ट ट्रस्टकडे उपलब्ध राहणार आहे. यामुळे अपघात टाळणे, प्रवासी सुरक्षितता सुधारणा आणि फेरी बोटींच्या सुरक्षिततेची हमी मिळवणे शक्य होणार आहे. ही प्रणाली पारंपरिक फेरी बोटी सेवा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा महत्त्वाचा टप्पा ठरेल. प्रवाशांना तिकीट खरेदी सोपी होईल आणि बोटींची सुरक्षितता सुनिश्चित करता येईल, असे सागरी महामंडळाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

पारंपरिक फेरी बोटींसाठी लवकरच ई-तिकीट प्रणाली मोबाईल ॲपद्वारे तिकीट खरेदी करता येणार. थेट सागरी महामंडळाकडे पैसे जमा होणार. प्रत्येक तिकिटावरील सागरी कर थेट जमा होऊन उर्वरित रक्कम बोट मालकांकडे जाणार. पारदर्शकता व व्यवस्थापन सुधारणा होणार.कोणती फेरी बोट कुठे आहे, सागरी महामंडळ आणि मुंबई पोर्ट ट्रस्टकडे रियल टाइम माहिती उपलब्ध असणार.सुरक्षा व सुविधा अपघात टाळण्यास मदत होणार. प्रवासी सुरक्षितता वाढविण्यासाठी पारंपरिक फेरी बोटी सेवा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडली जाणार.

## शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन जीवन संपविले

**जळगाव :** अमळनेर तालुक्यातील लोण खुर्द गावातील ३६ वर्षीय तरूणाने कर्जबाजारीपणाला कंटाळून विहिरीत उडी घेवून आपली जीवनयात्रा संपविली. ही घटना मंगळवारी (दि. ९) दुपारी उघडकीस आली. याबाबत मारवड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. समाधान विजय पाटील (वय ३६, रा. लोणखुर्द ता. अमळनेर) असे मृत तरूण शेतकऱ्याचे नाव आहे.अमळनेर तालुक्यातील लोणखुर्द गावात समाधान पाटील हे आपल्या कुटुंबियांसह वास्तव्याला होते. शेती करून ते आपला उदरनिर्वाह करत होते. मंगळवारी सकाळी ते घरातून निघून गेले.

## महत्त्वाचे

### आमदार सतीश सैल यांना अटक



**बेंगळूर :** कारवार-अंकोलाचे आमदार सतीश सैल यांना मनी लाँड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) अधिकाऱ्यांनी अटक केली आहे. मंगळवारी चौकशीसाठी आमदार सतीश सैल बेंगळुरातील ईडीच्या कार्यालयात हजर झाले होते. सखोल चौकशीनंतर ईडीने त्यांना अटक केली.ऑगस्ट महिन्यात १३ आणि १४ तारखेला आमदार सतीश सैल यांच्या निवासस्थानावर ईडीच्या पथकाने छापा टाकला होता. यावेळी त्यांच्याजवळ बेहिशेबी मालमत्ता, रोकड, सोने आढळले होते. या पार्श्वभूमीवर त्यांना मंगळवार ९ सप्टेंबर रोजी चौकशीला हजर राहण्याची सूचना देण्यात आली होती. त्यानुसार मंगळवारी ते बेंगळूरमधील ईडीच्या कार्यालयात हजर झाले. चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली.

### झारखंडमधून संशयित दहशतवाद्याला अटक

**रांची :** झारखंडची राजधानी रांचीमधून आज मोठी बातमी समोर आली आहे. राज्याची राजधानी रांची याठिकाणी एका संशयित आयसिस दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. दिल्ली स्पेशल सेलची टीम बऱ्याच दिवसांपासून या संशयित दहशतवाद्याचा शोध घेत होती. आता दिल्ली स्पेशल सेल, झारखंड एटीएस, रांची पोलिसांच्या संयुक्त कारवाईत संशयित व्यक्तीला रांची येथून अटक करण्यात आली आहे.
झारखंडची राजधानी रांची येथून अटक करण्यात आलेल्या संशयित आयसिस दहशतवाद्याचे नाव अशर दानिश आहे. त्याला रांचीतील इस्लामनगर येथून अटक करण्यात आली आहे. अशर दानिश हा बोकारो जिल्ह्यातील पेटवार येथील रहिवासी आहे. दिल्लीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्याच्या आधारे दिल्ली स्पेशल सेलची टीम त्याचा शोध घेत होती. मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या संशयित दहशतवाद्याची चौकशी केली जात आहे.माहितीनुसार, देशातील विविध राज्यांमध्ये १२ हून अधिक ठिकाणी स्पेशल सेल आणि केंद्रीय एजन्सींकडून छापे टाकण्यात येत आहेत. दिल्लीतूनही आयसिस दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे.

### शालिमार इमारतीत भीषण आग

**मुंबई :** गोरेगाव येथील एस. व्ही. मार्गावरील सिद्धी गणेश सोसायटीतील शालिमार या पाच मजली इमारतीला बुधवारी दुपारी १२.३० च्या सुमारास आग लागली. अग्निशमन दलाचे जवना घटनास्थळी पोहोचले असून जवान आग विझवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. इमारतीच्या मीटर बॉक्समध्ये आग लागल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य हाती घेतले. तसेच, पोलीस, संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांसह अदानी इलेक्ट्रिसिटीचे कर्मचारीही दुर्घटनास्थळी दाखल झाले आहेत. आगीची तीव्रता सातत्याने वाढत असून अग्निशमन दलाने दुपारी १२.२५ च्या सुमारास आग भीषण स्वरूपाची (वर्दी क्र. १) असल्याचे घोषित केले. आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला अडचणी येत असून विविध अद्ययावत यंत्रांच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## पॅरिसमध्ये २०० हून अधिक लोकांना अटक

# नेपाळनंतर आता 'फ्रान्स'मध्येही हिंसाचाराचा भडका

**पॅरिस : दि.१० वृत्तसंस्था**

नेपाळमध्ये गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या हिंसाचारामुळे पंतप्रधान के.पी. ओली यांनी राजीनामा दिला. ज्यामुळे सरकारही कोसळले. जनतेने भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवत आंदोलने सुरू केली. गेल्या चार दिवसांपासून नेपाळ हिंसाचाराच्या आगीत होरपळत असताना आता दुसऱ्या देशातही असाच गोंधळ सुरू झाला आहे. नेपाळनंतर आता फ्रान्समध्येही लोक रस्त्यावर उतरले आहेत. पोलिस आणि आंदोलकांमध्ये मोठा संघर्ष सुरू झाला आहे.
फ्रान्स सध्या रस्त्यावरील संघर्ष आणि संसदेतील अस्थिरता या दोन्ही संकटांशी झुंजत आहे. बुधवारी सकाळी राजधानी पॅरिस आणि अनेक मोठ्या शहरांमध्ये पोलिस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. 'ब्लॉक एव्हरीथिंग' या नावाने सुरू झालेल्या या मोहिमेमुळे देशभरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. केवळ पॅरिसमध्ये २०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली.
मुखवटा घातलेल्या निदर्शकांनी फ्रान्समधील विविध ठिकाणी कचऱ्याचे डबे आणि बॅरिकेड्स उभारून रस्ते अडवले. बोर्डो आणि मार्सेलसारख्या शहरांमध्ये जमावाने चौकांना वेढा घातला. राजधानी पॅरिसमध्ये गारे डू नॉर्ड या प्रमुख रेल्वे स्थानकावरही निदर्शकांनी हल्ला चढवला.
निदर्शकांकडून पोलिसांवर आगीचे गोळे आणि बाटल्या फेकण्यात आल्या.



**❏ मुखवटा घातलेल्या निदर्शकांनी फ्रान्समधील विविध ठिकाणी कचऱ्याचे डबे आणि बॅरिकेड्स उभारून रस्ते अडवले. बोर्डो आणि मार्सेलसारख्या शहरांमध्ये जमावाने चौकांना वेढा घातला. राजधानी पॅरिसमध्ये गारे डू नॉर्ड या प्रमुख रेल्वे स्थानकावरही निदर्शकांनी हल्ला चढवला.**

याप्रकरणी अनेकांना अटक करण्यात आली असून, अटक केलेल्या बहुतेकांनी सार्वजनिक सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या मते, दिवस जसजसा पुढे जाईल तसतसा जमाव अधिक आक्रमक होण्याची शक्यता आहे. हे हिंसक आंदोलन अशा वेळी उसळले आहे, जेव्हा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी अवघ्या २४ तासांपूर्वी देशाचे नवे पंतप्रधान म्हणून सेबास्टियन लेकोर्नू यांची नियुक्ती केली आहे.

## मॅक्रॉन यांच्याकडून फ्रान्सच्या नव्या पंतप्रधानाची निवड

**पॅरिस : दि.१० वृत्तसंस्था**



फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी संरक्षण मंत्री सेबास्टियन लेकोर्नू यांची फ्रान्सचे नवे पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली आहे. संसदेत विश्वासमत गमावल्यानंतर राजीनामा देणाऱ्या फ्रँकोइस बायरो यांची ते जागा घेतील. लेकोर्नू हे एका वर्षाच्या आत फ्रान्सचे चौथे पंतप्रधान बनले आहेत. ३९ वर्षीय लेकोर्नू हे फ्रान्सच्या इतिहासातील सर्वात तरुण संरक्षण मंत्री होते.
फ्रान्सच्या एका वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, माजी पंतप्रधान फ्रँकोइस बायरो संसदेत विश्वासमत गमावल्यानंतर राष्ट्रपती मॅक्रॉन यांनी ही नियुक्ती केली. बायरो सार्वजनिक खर्चात कपात करण्याबद्दल बोलत होते, ज्यामुळे त्यांना संसदेत पाठिंबा मिळाला नाही. लेकोर्नू यांच्यासमोर आता संसदेत बजेट मंजूर करण्याचे आव्हान असणार आहे.मात्र, मॅक्रॉन यांच्या कार्यालयाने सांगितले की राष्ट्रपतींनी लेकोर्नू यांना त्यांच्या मंत्रिमंडळाची घोषणा करण्यापूर्वी बजेट आणि इतर धोरणांवर करार करण्यासाठी संसदेतील सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करण्यास सांगितले आहे. कंझर्व्हेटिव्ह नेते आणि माजी ब्रेक्झिट वाटाघाटीकार मिशेल बार्नियर यांना काढून टाकल्यानंतर गेल्या वर्षी फ्रँकोइस बायरो यांना फ्रान्सचे पंतप्रधान बनवण्यात आले होते.

## बिहार, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यात मुसळधार पावसाचा इशारा



**नवी दिल्ली : दि.१० वृत्तसंस्था**

पंजाबमध्ये धरणांची पाणी पातळी कमी झाली. परंतु, पावसाच्या इशाऱ्यामुळे चिंता वाढली. नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. अनेक भागांत मुसळधार पाऊस होत आहे. असे असताना आता बिहार, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर राजधानी दिल्लीत मुसळधार पावसानंतर दिल्लीकरांना पुन्हा एकदा उष्णतेच्या झळा सोसाव्या लागत आहेत. सध्या यमुना नदीच्या पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे.
दिल्लीत आता पुन्हा एकदा दमट उष्णतेचे वातावरण आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आजपासून येत्या तीन-चार दिवसांत दिल्लीत पारा वाढण्याची आणि उष्णता वाढण्याची शक्यता आहे. तर उत्तर प्रदेश-बिहारमध्ये मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे. ११ सप्टेंबरपासून उत्तर प्रदेशात मुसळधार पावसाचा कालावधी सुरू होण्याची शक्यता आहे. तर १३ सप्टेंबरपर्यंत बिहारमध्ये हलका ते मुसळधार पाऊस पडू शकतो. पुढील दोन-तीन दिवस पंजाबला पावसापासून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.
दरम्यान, पंजाबमध्ये धरणांची पाणी पातळी कमी झाली. परंतु, पावसाच्या इशाऱ्यामुळे चिंता वाढली.

## महारेरा तक्रारीची आता महिन्याभरातच सुनावणी!

**मुंबई :** घरखरेदीदारांच्या तक्रारी लवकरात लवकर निकाली निघाव्यात, यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) आपल्या कार्यपद्धतीत बदल केला आहे. याचा परिणाम म्हणजे ऑक्टोबर २०२४ ते जुलै २०२५ या दहा महिन्यांत घरखरेदीदारांच्या तब्बल पाच हजार २६७ तक्रारी निकाली काढल्या आहेत. महारेराकडे जुलै अखेरपर्यंत दाखल झालेल्या तक्रारींची पहिली सुनावणी झाली असून यापैकी काही प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारखाही निश्चित करण्यात आल्या आहेत. घरखरेदीदार आयुष्याची कमाई गुंतवून घर नोंदवतो.

## चिनी तंत्रज्ञानाच्या मदतीने पाकिस्तानची ४० लाख फोनवर हेरगिरी

### 'ॲम्नेस्टी'च्या रिपोर्टमध्ये धक्कादायक माहिती समोर

**नवी दिल्ली : दि.१० वृत्तसंस्था**

चिनी तंत्रज्ञानाच्या मदतीने पाकिस्तान जनतेची नाराजी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्याया उद्देशाना लाखो नागरिकांवर पाळत ठेवत असल्याची माहिती ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या रिपोर्टमध्ये देण्यात आली आहे. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलही एक आंतरराष्ट्रीय गैर-सरकारी संस्था असून जगभरात मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी काम करते.
या रिपोर्टनुसार पाकिस्तान सोशल मीडियावर सेन्सॉरशिप लावण्यासाठी चिनी बनावटीची इंटरनेट फायरवॉल वापरत आहे. याबरोबरच ते लॉफुल इंटरसेप्ट मॅनेजमेंट सिस्टीम च्या मदतीने एकाच वेळी ४० लाख मोबाईल फोनवर हेरगिरी करू शकतात.
या फायरवॉलचे नाव डब्लूएमएस २.० ( २.०) असे असून ही इंटरनेट ट्रॅफिकवर लक्ष ठेवते आणि एका वेळी २० लाख ॲक्टिव्ह सेशन्सना ब्लॉक करू शकते. मानवाधिकार संघटनेने माहिती दिली की,



त्यांनी लायसनिंग करार, ट्रेड डेटा, लीक झालेल्या टेक्निकल फाईल्स आणि चिनी रेकॉर्ड्स तपासले ज्यामधून या फायरवॉल पुरवठादाराचे बीजिंगमधील सरकारच्या मालकीच्या कंपन्यांशी असलेले संबंध समोर आले.
ॲम्नेस्टीने सांगितले की, ही फायरवॉल अमेरिकेतील नियागरा नेटवर्क्स या कंपनीची उपकरणे, फ्रान्सच्या थेल्स युनिटमधील थेल्स डीआयएसचे सॉफ्टवेअर, आणि चीनच्या एका सरकारी आयटी फर्मचे सर्व्हर वापरते.रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, ''हे दोन मॉनिटरिंग सिस्टीम एकत्र काम करतात : एकामुळे गुप्तचर यंत्रणांना कॉल आणि मेसेज टॅप करता येतात, तर दुसरी देशभरातील वेबसाईट आणि सोशल मीडियाचा वेग कमी करते किंवा ते पूर्णपणे ब्लॉक करते.''
''मोठ्या प्रमाणावर हेरगिरी केल्याने समाजात एक दहशतीचा इफेक्ट तयार होतो, ज्यामुळे लोक ऑनलाईन आणि ऑफलाईन त्यांचे हक्कांचा वापर करणे टाळतात,'' असेही रिपोर्टमध्ये म्हटले आहे. तसेच रिपोर्टमध्ये असेही म्हटले आहे की पाकिस्तान सध्या जवळपास ६५०,००० वेब लिंक्स ब्लॉक करत आहे आणि यूट्यूब, फेसबूक आणि एक्स अशा प्लॅटफॉर्म्स वापरण्यावर बंधने आण आहे.
या रिपोर्टमध्ये एजन्सीज या एलआयएमएसच्या माध्यमातून किमान ४० लाख मोबाईल फोन्सवर एकाच वेळी पाळत ठेवत असल्याचा आरोप केला. तर डब्लूएमएस २.० हे एकाच वेळी २० लाख ॲक्टिव्ह सेशन्स ब्लॉक करते, असे अम्नेस्टीने म्हटले आहे.

## गरिबांच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांना सोडणार नाही - योगी आदित्यनाथ

**गोरखपूर : दि.१० वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी गरिबांच्या जमिनीवरील अतिक्रमण तात्काळ हटवण्याचे आणि भू-माफियांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. गोरखनाथ मंदिरात जनता दर्शन कार्यक्रमादरम्यान ते नागरिकांच्या तक्रारी ऐकत होते. महंत दिग्विजयनाथ स्मृती भवनाबाहेर बसलेल्या सुमारे २०० लोकांना ते भेटले.मुख्यमंत्री



आदित्यनाथ म्हणाले की, राज्य सरकार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी कटिबद्ध आहे. गरीबांच्या जमिनीवरील अतिक्रमण त्वरित हटवण्याचे निर्देश देताना ते म्हणाले, ''गरीबांना त्रास देणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही. अशा लोकांना कायद्यानुसार धडा शिकवला जाईल.स्थानिक गुंडांनी आपली जमीन बेकायदेशीरपणे बळकावल्याची तक्रार एका महिलेने केली होती, तेव्हा योगी आदित्यनाथ यांनी तात्काळ पोलीस आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना हस्तक्षेप करून कारवाई करण्याचे आदेश दिले.''कोणत्याही विलंबाशिवाय अतिक्रमण काढले पाहिजे. भविष्यात पुन्हा कोणीही कोणाची जमीन बळकावण्याचे धाडस करणार नाही याची खात्री करा,'' असे ते म्हणाले.

## पूरग्रस्तांना जास्तीत जास्त साहाय्य देऊ; दोन राज्यांचे पंतप्रधान मोदी यांच्याकडून सर्वेक्षण

**नवी दिल्ली : दि.१० वृत्तसंस्था**

वर्षा आणि पूर यामुळे हाहाकार उडालेल्या पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमधील, तसेच देशातील इतरही पूरग्रस्त भागांमधील आपदाग्रस्त जनतेला जास्तीत जास्त साहाय्य केंद्र सरकारकडून दिले जाईल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यांनी मंगळवारी पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमधील पूरग्रस्त भागाचे हेलिकॉप्टरमधून सर्वेक्षण केले. तसेच, अधिकाऱ्यांकडून पूर आणि अतिवृष्टीने झालेल्या हानीची माहिती घेतली.



पूरग्रस्तांना आवश्यक ते सर्व साहाय्य करण्याच्या सूचना आपण अधिकाऱ्यांना केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अतिवृष्टी आणि पुरामुळे या दोन राज्यांमध्ये, तसेच देशाच्या अन्य भागांमध्येही शेतकरी वर्गाची मोठी हानी झाली आहे. लक्षावधी एकर भूमीतली शेती अतिवृष्टीमुळे वाया गेली आहे. त्यामुळे आता या शेतकऱ्यांना सरकारखेरीज कोणाचाही आधार उरलेला नाही.
सरकारला या स्थितीची जाणीव असून सरकार लवकरात लवकर आपद्ग्रस्तांना साहाय्य देणार आहे, अशी घोषणा त्यांनी केली. त्यांनी हिमाचल प्रदेशसाठी १ हजार ५०० कोटीचे पॅकेजही घोषित केले आहे.पूर आणि अतिवृष्टी यांच्यामुळे पंजाब आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये जनजीवन अस्ताव्यस्त झाले आहे. लक्षावधी लोक बेघर झाले असून त्यांची रोजगाराची साधनेही गमावली गेली आहेत.
या राज्यांमधील जनजीवन पुन्हा सुरळीत करण्यासाठी बहुविध उपाययोजना आवश्यक असून ती करण्यासाठी संबंधित राज्यसरकारांशी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी केंद्र सरकारची चर्चा होत आहे. लवकरात लवकर एक बहुपेडी योजना घोषित केली जाईल आणि तिचे कार्यान्वयनही त्वरित केले जाईल, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

## दिलासा | फेरीवाल्यांसाठी केंद्र सरकारकडून दुहेरी भेट

# ५० हजार रुपयांचे कर्ज पेन्शन योजना

**नवी दिल्ली , दि.१० वृत्तसंस्था**

केंद्र सरकार देशभरातील फेरीवाल्यांना आणि रस्त्यावरील विक्रेत्यांना (रेहड़ी-पटरी वाले) मोठा दिलासा देण्याच्या तयारीत आहे. पीएम स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांना आता अटल पेन्शन योजनेचाही फायदा घेता येणार आहे. या निर्णयामुळे ५० लाखांहून अधिक विक्रेत्यांना विना-हमी ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळण्यासोबतच, वयाच्या ६० वर्षांनंतर नियमित पेन्शनची सोयही होणार आहे.
पेन्शन निधी नियामक आणि विकास प्राधिकरणचे अध्यक्ष एस. रमण यांनी या संदर्भात माहिती दिली. पीएम स्वनिधी योजना देशातील एक मोठी यशस्वी कथा असल्याचे ते म्हणाले. या योजनेअंतर्गत कर्ज घेतलेल्या ८२ टक्के लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड केली आहे. यामुळे, त्यांच्यासाठी क्रेडिट सोसायटी विकसित झाली असून, 'अटल पेन्शन योजने'चा लाभ ५० लाखांहून अधिक पीएम स्वनिधी लाभार्थ्यांपर्यंत



पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.आवास आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी ही योजना १ जून २०२० रोजी सुरू झाली. या योजनेत फेरीवाल्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज कोणतीही हमी न देता मिळते. सुरुवातीला १० हजार रुपयांचे कर्ज दिले जाते. त्याची परतफेड झाल्यावर २० हजार रुपये आणि त्यानंतर ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते.
**कर्ज:** या योजनेत, रस्त्यावरचे विक्रेते रुपये १०,००० पर्यंतचे खेळते भांडवल कर्ज घेऊ शकतात. हे कर्ज विना-तारण (-) दिले जाते.पुनरावृत्ती कर्ज: जर तुम्ही पहिले कर्ज वेळेवर फेडले, तर तुम्हाला दुसऱ्यांदा रुपये २०,००० आणि तिसऱ्यांदा रुपये ५०,००० पर्यंतचे कर्ज मिळू शकते. काही नवीन माहितीनुसार, कर्जाची मर्यादा वाढवून रुपये ८०,००० पर्यंत करण्यात आली आहे.
**व्याज अनुदान :** कर्जाची नियमित परतफेड केल्यास, वार्षिक ७% व्याज अनुदान दिले जाते, जे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.डिजिटल व्यवहारांवर प्रोत्साहन: डिजिटल व्यवहार करणाऱ्या विक्रेत्यांना प्रति वर्षी रुपये१,२०० पर्यंत कॅशबॅक मिळू शकतो. अर्जदार रस्त्यावरचा विक्रेता असावा आणि त्याच्याकडे शहरी स्थानिक संस्थाद्वारे जारी केलेले प्रमाणपत्र किंवा ओळखपत्र असावे.या योजनेसाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, बँक खाते पासबुक आणि मोबाईल नंबर यांसारख्या कागदपत्रांची आवश्यकता असते. ९ मे २०१५ रोजी सुरू झालेली 'अटल पेन्शन योजना' असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी एक सामाजिक सुरक्षा योजना आहे. १८ ते ४० वयोगटातील, आयकर न भरणारा कोणताही भारतीय नागरिक या योजनेत सहभागी होऊ शकतो.



## नेपाळमधील स्थिती हाताबाहेर; भारताने सीमेवरील सुरक्षा वाढविली

**नवी दिल्ली : दि१० वृत्तसंस्था**

नेपाळमध्ये गेल्या दोन दिवसांपासून हिंसक आंदोलन होत आहेत. देशातील तरूण पिढी भ्रष्टाचार आणि परिवारवादाविरूद्ध रस्त्यावर उतरली आहे. दरम्यान, नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आलं आहे. दरम्यान, नेपाळमधील परिस्थिती पाहून भारतानं देखील नेपाळच्या सीमेवरील सुरक्षा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य पोलीस दलाच्या तुकड्या या सीमा सुरक्षा दलासोबत काम करत असून सशस्त्र सीमा दल हे भारतीय हद्दीत कोणतीही घुसखोरी होऊ नये यासाठी सज्ज झाली आहे.
यभारत आणि नेपाळ हे १ हजार ७५१ किलोमीटरची सीमा शेअर करतात. भारतातील उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, सिक्कीम आणि पश्चिम बंगाल या राज्यांची सीमा नेपाळला लागून आहे. या सीमेवर बऱ्याच अंशी कोणत्याही बंधनाशिवाय लोकांची आणि सामानांची ये-जा सुरू असते. याबाबतचा शांती आणि मैत्रीचा करार १९५० मध्येच झाला होता. मात्र आता नेपाळमधील परिस्थिती पाहून सीमेवरील हालचालीवर बारीक लक्ष असणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेशाला लागून असलेल्या अनेक सीमांवर नेपाळी नागरिकांना भारतात प्रवेश करण्यापासून रोखलं जात आहे. मात्र नेपाळमधील भारतीय नागरिकांना देशात परतण्याची परवानगी देण्यात येत आहे. याचबरोबर नेपाळी सुरक्षा दल देखील भारतीय नागरिकांना त्यांच्या देशात येण्यापासून रोखत आहे. मात्र नेपाळी नागरिकांना मायदेशात परतण्याची परवानगी देण्यात येतेय.पश्चिम बंगालमधील दार्जीलिंग जिल्ह्यातील पानीटंकी या भागातील सीमाक्षेत्राजवळ सामानांची वाहतूक करणारे ट्रक रांगा लावून उभे असल्याचे चित्र दिसत आहे.दरम्यान, एसपी प्रविन प्रकाश यांनी सांगितलं की, आम्ही सीमेजवळ पोलीस चौकी तयार केली असून तिथं पोलीस दल देखील तैनात करण्यात आलं आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com


# संपादकीय...

## स्वस्ताई खरेच येणार की केवळ दिवास्वप्न?

दिवाळी सण महिनाभरावर येवून ठेपला असतानाच या सणाआधीच जनतेचा आनंद वाढविण्याची किमया केंद्र सरकारच्या जीएसटी संदर्भातील सुधारणांनी केली असल्याचा दावा केला जात आहे. आता हा दावा प्रत्यक्षात किती उतरतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. जीएसटीमधील सुधारणांनी सध्यातरी बाजारपेठेत 'फील गुड' वातावरण दिसत आहे. 'फील गुड' म्हणण्याचे कारण एवढेच, की या सुधारणा २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. सुधारणा प्रत्यक्षात अमलात यायला आणखी १२ दिवसांचा अवधी असला, तरी त्याची सविस्तर घोषणा आधीच झाली असल्यामुळे उत्पादक, विक्रेते आणि ग्राहकांनाही या सुधारणा गृहीत धरून तयारी करायला पुरेसा वेळ मिळणार आहे. भारतीय संस्कृतीत सण वर्षभर असले, तरी 'दिवाळी हा सर्व सणांचा राजा' असे म्हटले जाते. दिवाळीनिमित्ताने बाजारात होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा वर्षातील अन्य कुठल्याही काळापेक्षा कितीतरी अधिक असतो. ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी नवरात्रीपासूनच बाजार फुललेला असतो. मालाचा भरपूर पुरवठा असतो. जीएसटीतील सुधारणांमुळे जीवनावश्यक घरगुती उपयोगाच्या किंवा वाहनांसारख्या सणासुदीला खरेदी होणाऱ्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने त्याची मागणी यावेळी कितीतरी वाढेल, असा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुरवठा; म्हणजे उत्पादन वाढेल आणि त्या उत्पादनासाठी रोजगाराची मागणी वाढणे अपरिहार्य आहे. त्यामुळे, केवळ किमतीतील घटच नाही, रोजगाराच्या मागणीत वाढ झाल्यामुळेही अर्थचक्राला चांगली गती येईल. त्यामुळे, यावर्षी आनंदी आनंद कांकणभर जास्तच असेल, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. करप्रणालीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी देशाला जीएसटी सारखी करप्रणाली आवश्यकच होती. त्यामुळे जुलै २०१७ मध्ये जेव्हा ती लागू झाली, तेव्हा तिचे स्वागतच झाले. त्यातील तपशिलाबाबत मात्र अनेक तक्रारी होत्या. करपात्र बाबींचे वर्गीकरण करताना केलेल्या पाच श्रेणी हे टीकेमागचे पहिले कारण होते. दुसरी तक्रार होती, ती वस्तूंच्या वर्गीकरणाबाबत. चपाती आणि पराठा यांना वेगवेगळ्या श्रेणीतून वेगवेगळे कर लावण्यात आले होते. तयार मालावरचा कर अनेक बाबतीत त्याला लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षा कमी होता! कपड्यांच्या सुती धाग्यावर १८ टक्के, कृत्रिम धाग्यावर १२ टक्के, तर तयार कपड्यांवर ५ टक्के कर होता. असे अनेक बाबतीत होते. खाण्याचे पदार्थ, आयुर्वेदिक औषधे सुटी विकली, तर कर कमी; पण तीच पॅकबंद करून विकली, तर कर जास्त! अशा अनेक अर्थशून्य तरतुदी जुन्या पद्धतीत होत्या. संबंधित उत्पादक आणि विक्रेते त्या विरोधात सतत तक्रारी करीत होते. पण, त्याची दखल घेतली गेली नाही. जीएसटीच्या धोरणात आणि आकार पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करताना त्याचा विचार झाला याबद्दल म्हणूनच आता समाधान व्यक्त होत आहे. कर भरण्याची प्रक्रिया आणि परताव्याची मागणी यातही सुरुवातीला खूपच क्लिष्टता होती. परताव्याच्या मागण्या कितीतरी महिने तशाच पडून राहत होत्या. उलट, करभरणा करण्यास काही तासांचा विलंब झाला, तरी कर विभागाच्या नोटिसा येऊन धडकत होत्या. देशातला उत्पादक किंवा व्यापारी जमाखर्च किंवा ताळेबंदाचा तज्ज्ञ नाही. त्याची सगळी शक्ती व्यापाराचे व्यवस्थापन आणि वृद्धीसाठी लागलेली असते. त्यामुळे, कर भरण्याची तांत्रिकता, त्यासाठी आवश्यक संगणकीय ज्ञानाची गरज याने तो पुरता त्रस्त झाला होता. जीएसटी प्रणाली ही सरकार किंवा व्यापाऱ्यांपेक्षा सनदी लेखापालांच्याच हिताची आहे अशी टीका त्यामुळेच झाली होती. पण, सर्व्हरबाबतच्या अडचणी, सतत बदलणारे नियम यामुळे खरे तर सनदी लेखापालही मेटाकुटीला आले होते. जीएसटी ०.२ ने याबाबतीत किती सुलभता आणली आहे, हे अद्याप स्पष्ट नाही. पण, सरकारच्यावतीने केल्या गेलेल्या निवेदनाचा सूर पाहता याबाबतच्या आवश्यक सुधारणाही केल्या असतील, अशी आशा आहे. कर आकारणी, कर भरणा आणि कर विभागाकडून होणारी तपासणी यात तफावत आली, तर दाद कुठे मागायची? हाही प्रश्न होता. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर. राज्या-राज्यांतील करांच्या दरफरकातील त्रास मोठ्या उत्पादकांना सहन करावा लागत होता. २०२५ च्या अखेरीपर्यंत राष्ट्रीय पातळीवर अशा अपिलीय न्यायाधीकरणाचे कार्यान्वयन करण्याचे आश्वासन त्यादृष्टीने खूपच महत्त्वाचे ठरणार आहे. बहुतांश जीवनावश्यक बाबींच्या करश्रेणीत बदल होणार असल्याने कर घटणार आहेत. परिणामी सरकारच्या उत्पन्नातही घट होणार आहे. अर्थ विभागाच्या अंदाजानुसार सुरुवातीला ही घट सुमारे ४७ हजार कोटी रुपयांची असेल. भारताच्या अर्थव्यवस्थेचा एकूण आकार बघता ही घट अगदी किरकोळ आहे. दुसरे, कर कमी झाल्याने खरेदी-विक्रीत जी वाढ होईल आणि वाढत्या उलाढालीने जे अधिक कर उत्पन्न मिळेल, त्यात ही घट भरून निघेल, असाही अर्थ विभागाचाच विश्वास आहे. विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांनी आर्थिक वर्षाच्या अधेमध्ये केलेल्या या कर कपातीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. विद्यमान दराने कर उत्पन्न गृहीत धरून राज्यांनी आपले अर्थसंकल्प बेतले असल्याने त्यांचे सगळेच गणित बिघडेल, अशी तक्रार आहे. पण, वाढत्या व्यवहारांचा फायदा त्यांनाही मिळेलच. घट फार राहणार नाही. बाजाराला नवसंजीवनी देण्यासाठी सरकारने त्यांचे कर्तव्य केले . पुढची जबाबदारी आता उत्पादक आणि विक्रेत्यांची आहे. कर कपातीचा फायदा त्यांनी ग्राहकाला दिला पाहिजे. ग्राहकांचा संतोष हाच आमचा फायदा हे ब्रीद तेव्हाच खरे होईल.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### बंधू भेट



साधी भेट जरी झाली
तरी होत आहे चर्चा
खरंच भूमिका ठरली
गेम करतील कोणाचा

नातेसंबंध जपण्यासाठी
कधीतरी भेटलं पाहिजे
सुसंवाद वाढविण्यासाठी
काहीतरी केलं पाहिजे

ही बंधू भेटीची बातमी
बघा ती हेडलाईन होते
कोण ये कुणाच्या कामी
तो आगामी काळ सांगते

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अहं कुणाचाही
कुणी घेत नाही ।
कुणी देत नाही
मूल्य त्याला ॥

अहंकार चढे
ज्याच्या ज्याच्या माथी
त्याची त्याची ख्याती
नष्ट झाली ॥

अहंकार असे
गोचीडासारखा ।
चिकटेसारखा
परतून ॥

गोचिडा समान
अहंकार ठेचा
तर कायामचा
नष्ट होतो ॥



## राज मंथन

राजकुमार भीतकर
मो. 8329594360

# काँग्रेसला ओहोटी





भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या देशावर जवळपास ७० वर्षे राज्य केले, अनेक सामान्य कार्यकर्त्यांना मोठं केलं आणि गावाच्या सरपंचापासून ते मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचण्याची संधी दिली. एकेकाळी काँग्रेसचे प्राथमिक सदस्यत्व मिळविणे ही गौरवाची बाब समजली जात असे. परंतु २०१४ नंतर केंद्रात आणि राज्यात भाजपप्रणीत महायुती सत्तेत आल्यानंतर देशाचे आणि राज्याचे राजकीय गणितच बदलले. या बदलत्या राजकारणाचा सर्वांत मोठा फटका काँग्रेसला बसला असून, पक्षाला आता मोठी ओहोटी लागली आहे. ही ओहोटी केवळ राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरच नाही, तर यवतमाळ जिल्ह्यासारख्या एकेकाळच्या बालेकिल्ल्यातही दिसून येत आहे. पक्षाची खरी ताकद असलेले आणि काँग्रेसला तळागाळापर्यंत पोहोचविणारे दुसऱ्या फळीतील नेतेच आता पक्ष सोडून जात आहेत, ही काँग्रेससाठी केवळ चिंतेची नाही, तर धोक्याची घंटा आहे. दिल्लीतील हायकमांडने या 'शिलेदारां'च्या पक्षत्यागामागील कारणांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

नुकतेच काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, ज्यांच्याकडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या 'संघटनात्मक आणि प्रशासकीय' कामाची जबाबदारी होती, ते बंजारा आणि बहुजन समाजाचे आक्रमक नेते म्हणून ओळखले जाणारे, शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे आणि कायद्याच्या लढाईतही पारंगत असलेले देवानंद पवार यांनी काँग्रेसला अखेरचा 'रामराम'केला आहे. कालच त्यांनी याबाबत पत्रकार परिषद घेऊन घोषणा केली. त्यांच्या या पक्षत्यागामुळे जिल्ह्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. देवानंद पवार यांच्यापाठोपाठ, ज्यांचा कार्यकर्त्यांमध्ये मोठा जनाधार आहे आणि कृषी व सहकार क्षेत्रातील जाणकार नेते म्हणून ज्यांची ओळख आहे, असे कळंब तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रवीण देशमुख हेसुद्धा काँग्रेस सोडण्याच्या मार्गावर असल्याची चर्चा सुरू आहे. या दोन मोठ्या नेत्यांची पक्षातील 'एक्झिट' जिल्हा काँग्रेससाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. जिल्ह्यातील ही गळती अचानक सुरू झालेली नाही. याची बीजे गेल्या काही वर्षांपासून रोवली जात होती. मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी उमरखेडचे माजी आमदार विजय खडसे यांनी पक्षांतर्गत घुसमटीला कंटाळून काँग्रेसचा त्याग करत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत प्रकाश पाटील देवसरकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश चव्हाण यांसारख्या नेत्यांनीही पक्ष सोडला. विजय खडसे यांना काँग्रेसने उमेदवारी नाकारल्याचे कारण त्यावेळी पुढे आले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वीच काँग्रेसच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांनी पक्षाच्या प्रस्थापित नेतृत्वाविरोधात एल्गार पुकारला होता. आपला आवाज पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचावा, यासाठी यवतमाळात एक 'चिंतन बैठक' सुद्धा आयोजित करण्यात आली होती. यात जिल्ह्यातील दुसऱ्या फळीतील जवळपास सर्वच प्रमुख नेत्यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. मात्र, दिल्लीत बसलेल्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांपर्यंत हा आवाज पोहोचलाच नाही किंवा पोहोचूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अखेरीस, जिल्ह्यातील प्रस्थापित नेते अर्थात मोघे, ठाकरे आणि पुरके यांच्या नेतृत्वाला, काँग्रेसमधील घराणेशाहीला आणि नेत्यांच्या पुत्रप्रेमाला कंटाळून दुसऱ्या फळीतील नेत्यांनी पक्ष सोडण्याचा निर्धार केला, असे चित्र आता स्पष्ट दिसत आहे. देवानंद पवार यांनी पक्ष सोडताना याच मुद्द्यांवर बोट ठेवत, जातीयवाद आणि पुत्रप्रेमात आकंठ बुडालेल्या नेतृत्वाला कंटाळून पक्ष सोडत असल्याचा थेट आरोप केला. कोणत्याही पक्षासाठी कार्यकर्ता हा कणा असतो आणि कार्यकर्त्यांची फळी हीच पक्षाची खरी शक्ती असते. मात्र, यवतमाळ जिल्हा काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांना आणि दुसऱ्या फळीतील नेत्यांना दुय्यम वागणूक मिळत असल्याची भावना तीव्र झाली आहे. जिल्ह्यातील काँग्रेसचे नेतृत्व प्रभावी असूनही, पक्षवाढीसाठी कोणतेही ठोस काम होताना दिसत नाही. पक्षाचे विविध सेल केवळ नावापुरते उरले असून, ते कुठेही क्रियाशील असल्याचे दिसत नाही. केवळ बैठकांना उपस्थित राहण्याचे सोपस्कार पार पाडले जात आहेत. शेतकऱ्यांचे आणि सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही मोठा नेता रस्त्यावरची लढाई लढायला तयार नाही, ही सर्वांत मोठी शोकांतिका आहे. नुकतेच जिल्ह्यातील उमरखेड, महागाव, पुसद आणि आणि या भागांत महापुराने थैमान घातले, परंतु काँग्रेसचे वरिष्ठ नेते त्या ठिकाणी फिरकलेसुद्धा नाहीत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर किंवा जनतेच्या समस्यांवर रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असे नेतृत्वच काँग्रेसकडे उरले नसल्याची टीका आता उघडपणे होत आहे. पहिल्या फळीतील नेत्यांची मुले केवळ राजकीय वारसा सांभाळण्यापलीकडे काही करताना दिसत नाहीत. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आणि जनतेमध्येही काँग्रेसच्या भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पक्षाला लागलेली ही गळती काँग्रेससाठी आत्मचिंतनाची वेळ असल्याचे दर्शविते. देवानंद पवार, प्रवीण देशमुख यांच्यासारखे जनाधार असलेले आणि कार्यकर्त्यांवर पकड असलेले नेते जर पक्ष सोडून जात असतील आणि पक्षश्रेष्ठी त्यांची दखलही घेत नसेल, तर येणारा काळ काँग्रेससाठी अधिक खडतर असेल. सध्या तरी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून दुसऱ्या फळीतील नेते आणि नगरपालिकेतील नगरसेवकही पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे. ही परिस्थिती पाहता, 'जिल्ह्यात काँग्रेस संपली की काय?' असा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी वेळीच जागे होऊन यावर उपाययोजना न केल्यास, एकेकाळी जिल्ह्याच्या राजकारणाचा अविभाज्य भाग असलेला हा पक्ष केवळ नावापुरता उरेल, हे निश्चित. आधीच काँग्रेसचे अनेक स्थानिक कार्यकर्ते आणि नेते भाजपचे मंत्री अशोक उईके व जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या नेतृत्वात भाजपमध्ये, तर शिवसेनेचे नेते आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वात शिंदे गटात सामील झाले आहेत. यामुळे दुसऱ्या फळीतील नेत्यांची स्थानिक पातळीवरील ताकद आधीच कमी झाली होती. त्यातच पक्षात राहूनही संधी मिळत नसल्याने, त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा हा निर्णय योग्य की अयोग्य, हे आज ठरवता येणार नसले तरी, याचे उत्तर मात्र येणारा काळच देईल.

**देवानंद पवारांचा भाजप प्रवेश: संधी की राजकीय अस्तित्वाची लढाई?**

देवानंद पवार हे केवळ एक नाव नसून बंजारा आणि बहुजन समाजाचे एक अभ्यासू नेतृत्व आहे. काँग्रेस पक्षात त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या मुंबई येथील कार्यालयात 'संघटन आणि प्रशासन' यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांना राजकारणाची उत्तम जाण आहे. माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी पक्षकार्यात स्वतःला झोकून दिले होते. एक शेतकरी आंदोलक आणि नेते म्हणून त्यांची ओळख असून, त्यांनी शेतकरी व बहुजनांच्या प्रश्नांवर अनेकदा रस्त्यावरील लढाई लढली आहे. वेळप्रसंगी न्यायासाठी कायदेशीर लढाई लढण्यातही ते तरबेज आहेत. असा हरहुन्नरी आणि आंदोलक नेता आता भाजपला मिळाला आहे. लकवरच ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात भाजपात प्रवेश करणार आहेत. मात्र, काँग्रेस आणि भाजप हे दोन भिन्न विचारधारेच्या ध्रुवावरील पक्ष आहेत. त्यामुळे, पवारांनी भाजपमध्ये जाण्याचा घेतलेला निर्णय अनेकांसाठी धक्कादायक आहे. भाजपची आजवरची नीती पाहता, दुसऱ्या पक्षातून आलेल्या नेत्यांना पक्षात प्रवेश दिला जातो, पण नंतर त्यांना केवळ 'बुजगावणे' बनवून ठेवले जाते, असा आरोप अनेकदा झाला आहे. एकेकाळी भाजपमध्ये असलेले नाना पटोले आणि माजी खासदार हरिभाऊ राठोड यांचे अनुभव फारसे सकारात्मक नव्हते. अशा परिस्थितीत, पवार भाजपमधील सक्रिय बंजारा नेतृत्वाची उणीव भरून काढतील आणि बहुजनांचा आवाज बनतील, ही अपेक्षा आहे. परंतु, त्यांना तशी संधी दिली जाईल का, हा खरा प्रश्न आहे. भाजपमध्ये माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्या वाट्याला जे आले, तसे देवानंद पवार यांचे होऊ नये, एवढीच अपेक्षा!



## विचारायण

साधना काळबांडे
9767993827

# पुढच्या पिढीसमोर वाढलंय काय?



प्रत्येक पिढी हे भविष्य असते. कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे हे भविष्य असल्याने या तरुण पिढीला निकोप वातावरण मिळणे गरजेचे आहे. प्रत्येक कुटुंबात जेव्हा एखादे मुलं वाढते तेव्हा त्या कुटुंबातील वातावरण, संस्कारानुसार त्याची शारीरिक, मानसिक वाढ होत असते. जसे संस्कार तसें विचार होतात. पुढे तेच मुलं एक पुढची पिढी म्हणून गणली जाते. मुलं चांगल्या विचारांचे निघाले तर घराचे नाव उज्वल होते आणि वाईट निघाले तर घरातील व्यक्तींनाच दोष दिला जातो. तेव्हा प्रत्येक कुटुंबं ज्याप्रमाणे मुलांवर संस्कार करून त्याला उत्तम नागरिक बनविण्याचा प्रयत्न करते. त्याप्रमाणे तरुण पिढीवर चांगले संस्कार करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. सहज विचार करतांना आपण बोलून जातो की आजची तरुण पिढीला झालंय काय? पण कधीच आपण असा विचार करीत नाही की या पिढीवर आपण कोणते संस्कार करीत आहोत किंवा त्यांना आपण कोणत्या वातावरणात त्यांच्या व्यक्तिमत्तवाला खतपाणी घालत आहोत. आजच्या पिढीला सभोवताली जे वातावरण मिळत आहे तेच संस्कार त्यांच्यावर होत आहे. आजची पिढी व्यसनही फॅशन म्हणून करते. पण स्वतः च्या शरीराचा ऱ्हास होतोय हेही त्यांच्या लक्षात येत नाही कारणं न व्यसन करणाऱ्याला मागासलेला समजणारे लोक त्यांच्या आजूबाजूच्या आहेत. एखाद्या क्षेत्रात काम करतांना त्या वातावरणात एखादि गोष्ट करणे हे या पिढीची मजबुरी असते. तेव्हा हे वातावरण त्यांना जगू देत नाही. दिवसेंदिवस वाढणारा भ्रष्टाचार असो वा छोटया कारणा वरून उदभवणाऱ्या दंगली असो यात तरुण पिढी पिसल्या जात आहे. कारणं जाळपोळ, तोडफोडी साठी सर्वात पुढे तरुण पिढी दिसते. अशा वेळी त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. छोटया छोटया कारणावरून मारपीट, खून होतांना दिसून येते. रस्त्यावर खून, मारपीट करतांना भविष्याची या पिढीला तमा दिसून येत नाही. यश मिळविण्यासाठी शॉर्टकट चा मार्ग अवलंबून यश मिळते पण ते कायम टिकणारे नसते. हे त्यांना समजणारे विचार त्यांना द्यायला हवा.आज या तरुण पिढीला योग्य विचार आणि वातावरणाची गरज आहे. आज सामाजिक वातावरणही दूषित झाल्यासारखे आहे. जे पेरले तेच उगवते असे म्हणतात. जे या पिढीच्या डोळया समोर आहे तशेच हे तरुण वागतांना दिसतात. स्वतःची पोळी भाजण्यासाठी काही लोक या तरुण पिढीचा वापर करून घेतात आणि आंधळा विश्वास ठेवून ही पिढी त्याप्रमाणे वागते.

आपण कोणाचे भले करून स्वतः चे मात्र नुकसान करून घेतो. स्वतः चे भविष्य अंधःकारमय करतो याची समज आजच्या पिढीला येणे गरजेचे आहे. आज या देशाला, समाजाला सतर्क पिढीची गरज आहे. आपले कशात भले आहे हा विचार तसेच सकारात्मक विचार त्यांच्या कडे असणे गरजेचे आहे. आणि ही सर्व जबाबदारी समाजाची प्रत्येक कुटुंबाची आहे. भारताची अस्मिता जपणारी पिढी हवी आहे. अंधाधुंद अनुकरण पश्चिमा त्य लोकांचे करणे आणि आपल्याच समाजाला, देशाला वाईट म्हणणे ही जणू आज फॅशन झाली आहे. देशाला जपणे, त्यासाठी योग्य निर्णय घेणे ही समज येणे म्हणजे स्वतः बरोबर इतरांचे हित जपने होय.

चांगला आचारविचार आपण आज दिला तर ही पिढी त्या पुढील पिढीला सक्षम बनवेल. कुठे तरी एक वाचलेली गोष्ट छोटी असली तरी खूप काही सांगून जाते. एक राजा आपल्या राज्यात वेषांतर करून फिरायचा. एका ठिकाणी एक वयोवृद्ध एका बगीच्या झाड लावतांना दिसतो. ज्या बगीच्यात आधीच खूप सारी फुला फळाची झाडे असतात. राजाला नवल वाटते. न राहून तो विचारतो. तेव्हा तो मनुष्य सांगतो... ''मी जीवनभर फळे खाल्ली. ती झाडे मी लावलेली नव्हती. पण आस्वाद मी घेतला. येणाऱ्या पिढीला फळे खायला मिळावी हिच माझी इच्छा आहे आणि माझी जबाबदारी आहे. अशी जबाबदारी आपणही या तरुण पिढीसाठी पार पाडावी. निकोप वातावरणात या पिढीला वाढू आणि रुजू द्यावे म्हणजेच ही पिढी पुढच्या पिढीला योग्य तयार करू शकेल म्हणजे प्रत्येक कुटुंबाणे, समाजाने आपली जबाबदारी ओळखावी. बस आजच्या तरुणांना एवढेच सांगावेसे वाटते...

कोणी काही म्हणो.... की

**मी एक टेंबा**
**घेवून येतो**
**तू सुद्धा एक**
**घेवून ये**
**मी एक घर**
**पेटून देतो**
**तू सुद्धा पेटून दे**
**पण....**
**हातात टेंबा घेणारे**
**सिंहासनावर बसत**
**नसतात**
**सिंहसनावर बसणारे**
**कधीच हातात टेंबा**
**घेवून दिसत नसतात**



## मागोवा

शरद शेगोकार
मो. 70205 75933

# अल्पवयीन मुलींवर अत्याचार वाढले; मुलींच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर!



गणपती विसर्जनाचा दिवस... संपूर्ण अकोला शहरात उत्साह, भक्तिभाव आणि मंगलमय वातावरण. ढोल-ताशांच्या गजरात, गजर वाजत असताना सर्वत्र फक्त गणपती बाप्पा मोरया चा जयघोष. प्रत्येक घरातून कुटुंबीय गणरायाला निरोप देण्यासाठी निघालेले, शहरातील रस्ते भक्तांनी गजबजलेले. पण, या आनंदाच्या क्षणीच एका गरीब कुटुंबावर दुर्दैवाचे काळे ढग कोसळले. विसर्जनासाठी गेलेल्या या कुटुंबाच्या घरी एकटी असलेल्या अल्पवयीन मुलीवर एका विकृत प्रवृत्तीच्या पोलीस दफतरी नोंद असलेला अन्य धर्मीय दाखले बाज नराधमाने चाकूचा धाक दाखवत अमानुष अत्याचार केला. या घटनेने अकोला शहराच्या माथ्यावर लाजिरवाणे कलंक फासले असून, संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

ही घटना घडून आता पाच दिवस उलटून गेलेत, तरीही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेला नाही, हे चिंताजनक आहे. एरवी साधारण आरोपीला काही अवघ्या तासातच जेर बंद करणारे पोलीस या आरोपीच्या पाच दिवसानंतरही शोधात आहेत या पाच दिवसांत पीडित मुलगी आणि तिचे कुटुंब प्रचंड वेदनेतून जात आहे. हा प्रश्न फक्त एका गरीब समाजाच्या मुलीच्या न्यायाचा नाही, तर अकोल्यातील कायद्या सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. नागरिकांमध्ये प्रचंड संताप असून, पोलिस प्रशासनाचा गुन्हेगारांवरील वचक कमी झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. आपल्या देशात आज प्रत्येक दिवसागणिक महिलांवर, लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटना वाढत चालल्या आहेत. केवळ महानगरांमध्येच नाही, तर लहान शहरांमध्ये, गावागावातही अशा घटना समोर येत आहेत. सहा वर्षांची चिमुरडीही सुरक्षित नाही, हे आजच्या समाजाचे कटू वास्तव आहे. ही परिस्थिती केवळ दु:खदच नाही तर अत्यंत चिंताजनक आहे. अकोल्यातील ही घटना तशी पहिली नाही. गेल्या काही महिन्यांमध्ये शहरात आणि जिल्ह्यात अशा अनेक घटना घडल्या आहेत. पण, गुन्हेगारांना योग्य शिक्षा न झाल्याने त्यांचे मनोबल वाढत चालले आहे आणि अशा अमानुष घटना घडत आहेत. सतत अशा घटना घडत असताना गुन्हेगारांना पोलिस प्रशासनाची भीती वाटत नाही, हा खरा विचार करण्याचा मुद्दा आहे. पूर्वी पोलिसांची भीती हा शब्दच गुन्हेगारांसाठी पुरेसा होता. पण आज ती भीती संपली आहे. त्यामागे काही कारणे स्पष्ट दिसतात,प्रकरणांची तपासणी उशिरा सुरू होणे, पोलिसांवर राजकीय दबाव, पीडित गरीब कुटुंबातील असल्यास कारवाईत संथगती आरोपीचा पीडित मुलीच्या कुटुंबावर आर्थिक सामाजिक व राजकीय दबाव आरोपीला पळून जाण्यासाठी तपास यंत्रणेतील त्रुट्या आदी..अकोल्यातील घडलेल्या या घटनेतही तसाच अनुभव येत आहे. पाच दिवस उलटून गेलेत, तरी आरोपी अजूनही मोकाट आहे. गुन्हेगारांना पोलिसांची भीती न वाटणे, हा या घटनेचा सर्वात मोठा धोकादायक भाग आहे. या घटनेनंतर शहरातील काही तथाकथित समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नेहमीप्रमाणे फक्त निवेदने दिली, फोटोसेशन केले, सोशल मीडियावर पोस्ट टाकल्या. पण, पीडित मुलीच्या कुटुंबाला प्रत्यक्षात कोणतीही आर्थिक मदत किंवा कायदेशीर सहाय्य केले नाही.ही मुलगी अत्यंत गरीब कुटुंबातील आहे. विसर्जनासाठी गेलेल्या कुटुंबाच्या परतीनंतर त्यांच्यासमोर दु:खाचा डोंगर कोसळला. अशा परिस्थितीत या कुटुंबाला तात्काळ आर्थिक, मानसिक आणि कायदेशीर मदतीची गरज होती. या संदर्भात महिला मुलींचा कनवाळू म्हटला जाणारा महिला व बालकल्याण विभाग अक्षरशः झोपला असल्याचे चित्र दिसत आहे पण, घोषणांमध्ये मोठे शब्द आणि प्रत्यक्षात शून्य कृती हेच अकोल्यातील सामाजिक परिस्थितीचे चित्र आहे. कल्पना करा, जर हाच प्रकार एखाद्या श्रीमंत, बलाढ्य किंवा राजकीय प्रभाव असलेल्या कुटुंबातील मुलीसोबत घडला असता, तर काय झाले असते? चार तासांत आरोपींचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले असते.शहरभर धडाकेबाज कारवाईचे बोलबाले झाले असते. आरोपींच्या घरावर पोलिसांचा छापा पडला असता. टीव्हीवर सतत ब्रेकिंग न्यूज झळकत राहिल्या असत्या. पण या घटनेत पीडित मुलगी गरीब कुटुंबातील असल्यामुळे पोलिसांचा वेग कमी झाल्यासारखा दिसत आहे. हे केवळ प्रशासनासाठीच नव्हे तर संपूर्ण अकोला जिल्ह्यासाठी कलंकासमान आहे. अकोला शहरात गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि गुन्हेगारांना पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हाय डेफिनेशन कॅमेरे लावण्यात आले आहेत. यासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाले. पण प्रत्यक्षात या कॅमेऱ्यांचा उपयोग किती होतोय, हा प्रश्न आज प्रत्येक नागरिक विचारत आहे. अशा अमानुष घटनेनंतर हे कॅमेरे आरोपीचा शोध लावण्यात कितपत उपयोगी ठरले? जर आरोपी अजूनही फरार आहे, तर मग हे कॅमेरे फक्त शहराच्या सौंदर्यासाठीच बसवले आहेत का? पोलिसांनी या कॅमेऱ्यांच्या वापराबाबत पारदर्शक अहवाल जाहीर करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अकोल्याच्या कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी नुकतीच तळफदार आणि धडाडीचे अधिकारी अर्जित चांडक यांच्या हाती आली आहे. त्यांनी सुरुवातीला शहरातील काही प्रमाणात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवले. मात्र, ही घटना त्यांच्या कार्यकाळातील सर्वात मोठे आव्हान ठरणार आहे.

अकोल्यातील जनतेला त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. त्यांनी संपूर्ण जिल्ह्यातील असामाजिक तत्वांना शोधून त्यांना चांगला धडा शिकवला पाहिजे. आरोपींनी गुन्हा करण्यापूर्वी दहा वेळा विचार करावा, आपल्या कुटुंबाचे काय होईल? असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण व्हावा.

अर्जित चांडक हे नाव गुन्हेगारांच्या मनात भीतीचे प्रतीक बनले पाहिजे.जर ही घटना पोलिसांनी गांभीर्याने हाताळली आणि आरोपीला लवकरात लवकर पकडले, तर गुन्हेगारांना पोलिसांची ताकद दिसून येईल. यामुळे पोलिसांवरील नागरिकांचा विश्वासही पुन्हा दृढ होईल. या प्रकरणात केवळ पोलिसांवर अवलंबून राहून चालणार नाही. समाजातील प्रत्येक नागरिकानेही जागरूक राहणे आवश्यक आहे. संशयास्पद हालचाली दिसताच तात्काळ पोलिसांना कळवाव्या. पीडित कुटुंबाला आर्थिक, मानसिक आणि सामाजिक मदत करावी.

सोशल मीडियावर फक्त पोस्ट न टाकता प्रत्यक्ष कृतीतून सहभाग नोंदवावा.

शाळा, महाविद्यालये आणि गावोगावी महिलांच्या सुरक्षेसाठी जनजागृती मोहिमा राबवाव्यात. मुलांना लहानपणापासूनच चांगल्या संस्कारांचे शिक्षण द्यावे.गुन्हेगारांना समाजातून बहिष्कृत करावे. त्यांना कुठेही आसरा मिळू नये, अशी परिस्थिती निर्माण करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे.

अकोला शहर हे शांतताप्रिय आणि संस्कृतीशील शहर म्हणून ओळखले जाते. पण, काही असामाजिक प्रवृत्तीचे लोक या शहराची प्रतिमा कलंकित करत आहेत. आता वेळ आली आहे की पोलिसांनी या गुन्हेगारांना धडा शिकवला जावा.

अकोल्यात गुन्हा केला, तर अर्जित चांडक यांची पोलिसांची टीम तुम्हाला जिथे लपलेत तिथून ओढून आणेल, अशी भीती प्रत्येक गुन्हेगाराच्या मनात निर्माण झाली पाहिजे.

ही घटना केवळ एका गरीब मुलीवरील अन्याय नाही, तर संपूर्ण अकोल्याच्या कायदा सुव्यवस्थेची परिक्षा आहे.आरोपीला तात्काळ पकडा.फास्ट-ट्रॅक कोर्टात प्रकरण चालवा. आरोपीला कठोर शिक्षा द्या, फाशीची शिक्षा द्या.भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी ठोस उपाययोजना करा.

जर अर्जित चांडक यांनी हे आव्हान स्वीकारले आणि अकोल्यात गुन्हेगारांसाठी पोलिसांची भीती पुन्हा निर्माण केली, तर ही घटना शहराच्या इतिहासात न्यायासाठीच्या लढ्याचे प्रतीक ठरेल. अकोल्यातील प्रत्येक नागरिकाची ही सामूहिक जबाबदारी आहे की अशा अमानुष घटनांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी एकत्रितपणे लढावे. हीच वेळेची एकमुखी मागणी आहे.

# करिश्मा कपूरच्या मुलांची हायकोर्टात धाव




दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या तब्बल ३०,००० कोटी रुपयांच्या मालमत्तेवरील वादात एक नवीन ट्विस्ट आला आहे. बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरच्या दोन्ही मुलांनी त्यांच्या संपत्तीतून वाटा मिळवण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. करिश्मा ही संजय यांची दुसरी पत्नी होती. संजय व करिश्माला समायरा व कियान ही दोन अपत्ये आहेत. ई-टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार, समायरा व कियान भावंडांनी त्यांची सावत्र आई प्रिया कपूर (संजय कपूरची तिसरी पत्नी) हिने त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेवर पूर्ण नियंत्रण मिळवण्यासाठी बनावट मृत्युपत्र बनवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत दिवाणी खटला दाखल केला आहे.

समायरा व कियान यांनी कायदेशीर पालक म्हणून त्यांच्या आईच्या (करिश्मा कपूर) माध्यमातून वडिलांच्या संपत्तीच्या विभाजनाविरुद्ध कोर्टाने मनाई आदेश द्यावा, अशी मागणी केली आहे. तक्रारीनुसार, वडिलांच्या मृत्यूच्या वेळी त्यांच्या मालमत्तेबद्दल पूर्ण माहिती नव्हती, असा मुलांचा युक्तिवाद आहे. त्यांना माहीत असलेल्या मालमत्तेची प्रत त्यांनी जोडली आहे, पण डिफेंडंट क्रमांक १ (प्रिया कपूर) हिने संपत्तीचे तपशील लपवल्याचा आणि मालमत्तेची संपूर्ण रक्कम उघड न केल्याचा आरोप केला आहे.वडील संजय कपूर यांचे १२ जून २०२५ रोजी विंडसर, यूके येथे पोलो खेळत असताना निधन झाले, तेव्हापर्यंत त्यांच्याशी जवळचं नातं होतं. त्यांच्याबरोबर प्रवास करायचो, सुट्ट्यांमध्ये फिरायला जायचो आणि बिझनेसबद्दलही माहिती होती, असा युक्तिवाद मुलांनी केला आहे.

प्रिया कपूरने संजय कपूर यांचे मृत्युपत्र नसल्याचा दावा केल्याचा आरोप मुलांनी केला आहे. त्यावेळी संजय कपूरची सर्व मालमत्ता आर.के. फॅमिली ट्रस्टच्या ताब्यात असल्याचं प्रियाने म्हटलं होतं. नंतर २१ मार्च २०२५ या तारखेला प्रियाने एक दस्तऐवज सादर केला, ते संजयचे मृत्युपत्र असल्याचा दावा प्रियाने केला, त्यामुळे ते बनावट असू शकतं, असा संशय मुलांनी व्यक्त केला आहे.दरम्यान, संजय कपूर यांच्या संपत्तीसंदर्भातील कायदेशीर वादात अनेक जणांचा समावेश आहेत.

# ‘दशावतार’मधील ‘रंगपूजा’ ही भैरवी प्रेक्षकांच्या भेटीला




मराठी सिनेसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असलेला ‘दशावतार’ चित्रपट १२ सप्टेंबरला रिलीज होणार आहे. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचे वेध प्रेक्षकांना लागले आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशातील अनमोल ठेवा असलेल्या दशावतार परंपरेला मोठ्या पडद्यावर भव्यतेने मांडणाऱ्या या चित्रपटातील हृदयस्पर्शी ‘रंगपूजा’ ही भैरवी नुकतीच रसिकांच्या भेटीस आली आहे. या गाण्यातून एका निस्सीम कलावंताची कलेवरील नितांत श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाची भावना मांडली गेली आहे. हे गीत म्हणजे कलावंताच्या रंगभूमीवरील कलाप्रवासाला भावपूर्ण अभिवादन आहे. विशेष म्हणजे गीतकार गुरु ठाकूर, गायक अजय गोगावले आणि संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र हे त्रिकुट प्रथमच या गाण्यात एकत्र आलं असून हे गाणं या चित्रपटाचं, नायक बाबुली मेस्त्रीच्या आयुष्याचं मर्म मांडतं.

गुरु ठाकूर यांची अर्थपूर्ण शब्दरचना , त्याला अजय गोगावले यांचे आर्त स्वर यामुळे गाण्याला अनोखा आयाम मिळाला आहे. तर ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांच्या सुमधुर सुरावटींनी गाण्यात खास रंगत आणली आहे.

गायक अजय गोगावले म्हणाले, ‘’दशावतार नाटकांमध्ये जितके नांदीला महत्व आहे तितकेच ‘रंगपूजा’ ह्या भैरवी भैरवीला! भैरवी झाल्याशिवाय नाटकातील कुठलाही कलावंत आपल्या चेहऱ्यावरील रंग उतरवत नाही. म्हणूनच ‘दशावतार‘ चित्रपटातील ही ‘रंगपूजा’ ही भैरवीसुद्धा तितकीच महत्त्वपूर्ण आहे. गुरु ठाकूरच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली ही भैरवी प्रत्येक कलाकाराचं मर्म आहे.

# ‘कमळी’चा लूक पाहून प्रेक्षक झाले खूश, पण मालिकेत येणार वेगळाच ट्विस्ट



‘कमळी’ मालिकेत सध्या अन्नपूर्णा आजींमुळे कमळी आणि तिच्या मैत्रिणींना कबड्डी खेळण्याची संधी मिळाल्याचा सीक्वेन्स चालू आहे. कामिनीच्या हस्तक्षेपामुळे मुख्याध्यापक सुरुवातीला फक्त अनिकाच्या टीमला कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी देतात. ‘कमळी’च्या टीमला या स्पर्धेत एन्ट्री मिळणार नाही असा निर्णय मुख्याध्यापक परस्पर कामिनीशी बोलून घेतात. याशिवाय ‘कमळी’ला कॉलेज सोडून जा असंही सांगितलं जातं.अचानक आलेल्या संकटांमुळे ‘कमळी’ पूर्णपणे खचून जाते. पण, एका क्षणानंतर आता रडून उपयोग नाहीये, आपण आपला हक्क पुन्हा मिळवला पाहिजे या विचाराने ‘कमळी’ परत सरांची भेट घ्यायला जाते. यावेळी कामिनी ‘कमळी’ला कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्याचा हक्क नाहीये असं निक्षून सांगते पण, याचवेळी कॉलेजमध्ये अन्नपूर्णा आजीची एन्ट्री होते. ‘कमळी’ला जाब विचारणारी तू कोण आहेस? कॉलेजमधील निर्णय बदलण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला असा प्रश्न अन्नपूर्णा आजी मुख्याध्यापकांना विचारतात. यावेळी प्रिन्सिपल सर कामिनी आजीकडे बोट दाखवतात. यामुळे अन्नपूर्णा आजी भयंकर संतापते. ती कमळीच्या पाठिशी ठामपणे उभी राहते आणि तिला आणखी एक संधी द्या, तिची वेगळी टीम या स्पर्धेत सहभागी होईल असं सर्वांना सांगते.आता येत्या काळात प्रेक्षकांना ‘कमळी’ मालिकेत आणखी एक ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. कमळी कार्यक्रमानिमित्त घरात सजावट, रोषणाई करत असते. इतक्यात ती चिकटपट्टी मागते. यावेळी तिचं लक्ष नसतं, हृषी तिचा आवाज ऐकून लगेच चिकटपट्टी घेऊन घेतो आणि कमळीचा तोल जाऊन ती पडणार इतक्यात हृषी तिला सावरतो.आता हृषी आणि कमळीला एकत्र पाहिल्यावर नयनतारा आधीच भडकलेली असते. त्यात अनिका सुद्धा हृषीच्या आईचे कमळीविरोधात कान भरते. नयनताराला समोर पाहताच दोघेही जागच्या जागी स्तब्ध होतात. तर, दुसरीकडे नयनताराच्या मनात हृषी-कमळीच्या नात्याबद्दल शंका निर्माण होते. खरंतर, सध्या या दोघांच्या मनात असं काहीच नाहीये.

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल आणि तुमच्या बुद्धिमत्तेची आणि क्षमतेची प्रशंसा होईल.

**वृषभ:** आज तुम्ही तुमची दिनचर्या व्यवस्थित ठेवण्यासाठी वेळापत्रक बनवाल आणि त्यानुसार काम केल्यास तुम्हाला निश्चितच फायदा होईल.

**मिथून :** आजचा दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे. आज तुमचे व्यावसायिक व्यवहार सुरळीत सुरू राहतील.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्ही नवीन काम सुरू करण्यास खूप उत्साहित असाल. आज तुमची काही समस्या दूर होईल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज व्यवसायात खूप जबाबदाऱ्या आणि कामाचा ताण असेल.

**कन्या :** आज तुम्हाला एखाद्या कायदेशीर समस्येवर तोडगा मिळेल, ज्यामुळे तुमच्या मनावरील ओझे हलके होईल.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. आज तुम्ही व्यवसायात चांगले पैसे कमवाल आणि तुमचे व्यावसायिक संबंधही मजबूत होतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल. काही कार्यक्रमांमुळे खर्च थोडा जास्त होईल.

**धनु :** आज तुम्ही तुमच्या करिअर आणि अभ्यासाबाबत सतर्क राहाल. आरोग्याच्या दृष्टीने आजचा दिवस चांगला असेल, तुम्हाला ताजेतवाने वाटेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल राहणार आहे. आज तुम्ही तुमची कामे पूर्ण करण्यासाठी तुमच्या कुटुंबाची मदत घेऊ शकता,यामुळे तुम्हाला धैर्य मिळेल.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्हाला व्यवसायात दुप्पट नफा मिळवण्याची उत्तम संधी मिळेल आणि व्यवसायातील अडथळे दूर होतील.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे.येणाऱ्या काळात ही गुंतवणूक चांगले फायदे देईल. महत्त्वाची कामे सहजपणे पूर्ण कराल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 156



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
कट्टी, कावा, कोमा, खार, डव, तग, तार, दाब, नत्र, नीत, पय, पार, भाट, भाल, भास, मन, माशी, मोह, यम, रत, रव, वर्म, वाम, समा, सवा, हम, ज्ञान

**तीन अक्षरी**
अभद्र, उगम, कपट, गुराखी, गुलाम, चातक, तलाव, द्वारका, नरेश, नमन, नलगे, परीघ, पारधी, मेनका, यमक, रमण, वसूल, वानवा, शासक, शासन, सकल, सजणे, समुद्र, सरशी, सराव, साहस, हनन, हमला

**चार अक्षरी**
आश्वासन, कतवार, कलकल, कानशील, कालवड, खासदार, घनदाट, घनघोर, चवचाल, चंद्रमुखी, डरकाळी, तकदीर, तपशील, तपोवन, तलवार, दासगणू, द्वारपाल, धामधूम, परमाणू, पत्रकार, मधूमेह, वनवास, सकळीक, सायकल, सिंहासन, सूत्रधार

**पाच अक्षरी**
घसरपट्टी, परवडणे, मनधरणी, रतनबाव, शासनपत्र, हरिशचंद्र

**सहा अक्षरी**
जनगणमन, तपासनीस

**अन्य अक्षरी**
गड आला पण सिंह गेला, नरसिंहावतार

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 537



### आडवे संकेत

१) विशेषत: पथ्य म्हणून उपवास करणे, अचपन झाल्याने जेवणाला खाडा देणे, पार जाणे
३) एक रक्तशोषक जंतू, शरीरातील अशुद्ध रक्त काढून टाकण्यासाठी या जंतूचा उपयोग करतात
४) कामात आळस करणारा, कामचुकार कामात हयगय करणारा
५) आरती करतांना लावावयाचा तूप वातीचा दिवा
८) गोड बोलणे, एक वेद
९) फुलांतील रज:कण
१०) धक्का, धसका, वचक
१२) योग्यवेळी योग्य गोष्ट सुचणे, हजरजवाबीपणा
१४) घोड्यावर बसलेला
१५) एक विदेशी मद्य प्रकार
१६) विद्येची देवता
१८) शिवाजी महाराजांचे कोंढाणा किल्ला जिंकण्याचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता आपल्या मुलाचे ठरलेले लग्न पुढे ढकलीत तानाजीने काढलेले उद्गार
२३) चावी, किल्ली
२४) सर्व (हिं)
२५) लहानसे तबक
२६) वृत्तपत्रात नियमित प्रकाशित होणारे एक भविष्य विषयक सदर
२८) साल, संवत्सर
३०) संशय (अरबी)
३२) भांडवल, व्यवसायात गुंतविलेला पैसा, साठा
३३) श्रीकृष्णाने करंगळीवर पेललेला पर्वत
३५) महाभारतातील एक महाकाय व बलिष्ठ पांडव
३६) धूळ, कण
३७) हस्त, हात
३९) मारलेला, हत पावलेला
४०) निवडणूकीत आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मत देणे
४३) काजळ
४५) असुर, राक्षस
४६) भगवान शिव, शंकर
४७) करंगळीची शेजारी
४९) मुख, तोंड
५०) कानोसा, पावलाच्या हालचालीचा आवाज
५१) कर्णेंद्रिय
५२) संमति, स्वत:ची इच्छा, आवड
५४) गीत गायन
५५) जादुटोण्याचा एक प्रकार, जादुगरी, हातचलाखीचा एक प्रकार
५६) धाडस, धैर्य
५८) आंब्यातील बी
५९) रवाना करणे, पाठविणे
६०) पसारा, कामाची रगडा, पुष्कळ चिखल
६१) नम्र, वाकलेला
६२) वजन, ओझे
६३) थोर सत्पुरुषाची प्रतिवार्षिक श्राद्धतिथि
६४) मोहोर, जुन्या काळचे सोन्याचे नाणे

### उभे संकेत

१) मोठया पोटावरून पडलेले श्री गणेशाचे नाव
२) नळी
३) पाण्यात बुडून मरण पत्करणे
४) सदोदित कामात व्यग्र असलेला
५) निराश्रित, आश्रय नसलेला
६) ओळ, पंगत
७) दृष्टि
८) दुधावरील मलाई
११) उसण, एकदम तीव्र वेदना उठणे
१३) एक रंग प्रकार
१४) पंधरावे नक्षत्र
१६) सजीव, चेतनायुक्त
१७) हिंदू धर्मातील एक मंगलचिन्ह
१८) सुस्त, ऐदी
१९) लघुत्तम साधारण विभाज्यचे संक्षिप्त रूप
२०) तपकीर
२१) पहाटे पहाटे आरवून आपले अस्तित्व जाणवून देतो तो
२२) फसविणे, फसविल्या जाणे
२३) कौशल्य, चातुर्य, चमत्कार
२७) भ्यालेला. घाबरलेला
२८) ज्याला जीव आहे असा
२९) मोठा आवाज ऐकल्याने बधिरता येणे (एक वाक्प्रचार)
३१) मनात येताच क्षणी केलेल्या दानाने अधिक पुण्य मिळते या अर्थाचा एक वाक्प्रचार
३३) संध्याकाळी गुरे घरी परतण्याची घटिका ही लग्नाला फार मंगलकारक समजतात
३४) माप, परिमाण
३८) जीभ, जिव्हा
३९) वजनाने कमी असलेला, निम्न प्रतीचा
४१) देणगी
४२) पति स्वामी
४४) अपकर्ष, खाली खाली जाणे
४७) इतिहासकालीन अकबर पुत्र सलीमची प्रेयसी
कमी बोलणारा
५१) कष्टाची कामे करणारा, श्रमिक
५३) प्रशंसा, स्तुती
५४) गुरांना चरण्यासाठी राखून ठेवलेले कुरण
५६) रथ हांकणारा
५७) सरकारचे शिक्कापत्र

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

महत्त्वाचे

## पातुर शहरांमध्ये सकल ओबीसी संघटनेकडून आरक्षण एल्गार मोर्चा

**पातूर:**येथे सकल ओबीसी आरक्षण एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पातुर तालुक्यातील सकल ओबीसी बांधव उपस्थित होते. सकल ओबीसीच्या वतीने राज्यात उपोषण धरणे मोर्चा साखळी उपोषण इत्यादी मार्गाने सरकारचे लक्ष सकल ओबीसी समाजाच्या मागण्याकडे वेधण्यात येत आहे. ओबीसीच्या वतीने राज्यात विविध मागण्यांचे निवेदन माननीय तहसीलदार साहेब पातुर यांना देण्यात आले मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई दयावी. मुलामुलींसाठी असलेली ओबीसी शिष्यवृत्ती १००% मुलामुलींना देण्यात यावी महाज्योती संस्थेकरिता एक हजार कोटी रुपयाची तरतूद करण्यात यावी. म्हाडा व सिडको तर्फे बांधून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाचा समावेश करण्यात यावा. अनुसूचित जाती व जमाती प्रमाणे ओबीसी, विजा भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकऱ्यांना १००% सवलतीवर योजना राज्यात सुरू करण्यात याव्यात. महाराष्ट्र शासनाचा दिनांक २ सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय नुसार हैदराबाद गॅझेटियर मधील मराठ्यांच्या नोंदी विचारात घेऊन कुणबी प्रमाणपत्र देणारा शासन निर्णय त्वरित रद्द करावा.

## साहित्य अकादमीकडून लेखक बाबाराव मुसळे सह कवी शिरसाट आमंत्रित

**वाशीम :** नवी दिल्ली येथील साहित्य अकादमी आयोजित साहित्य मंचमध्ये वाशीम येथील लेखक बाबाराव मुसळे व कवी मोहन शिरसाट यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या साहित्य मंचचे आयोजन साहित्य अकादमी आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमान विद्यमाने डॉक्टर पंजाबराव देशमुख सभागृहामध्ये दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता करण्यात आलेले आहे. साहित्य अकादमी ही देशातील २४ भाषांमध्ये प्रतिष्ठेचे अकादमी पुरस्कार देते आणि पुस्तके प्रसिद्ध करीत असते. तसेच देशभर साहित्योत्सव आयोजित करीत असते. प्रादेशिक प्रतिभावंत साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे या साठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या अंतर्गत 'साहित्य मंच' या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते.
अमरावती येथील ''साहित्य मंच' कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मराठीतील सुप्रसिद्ध कवी प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर भूषविणार आहेत. तसेच वाशीम येथील कथा-कादंबरीकार बाबाराव मुसळे आणि अमरावती येथील सतीश तराळ कथाकथन करणार आहेत. तसेच या कार्यक्रमात अमरावती येथील कवयित्री डॉ. शोभा रोकडे आणि वाशीम येथील कवी मोहन शिरसाट कविता सादर करणार आहेत.

# अंबाडीच्या महिलांचा दारूबंदीसाठी थेट एसपी कार्यालयावर एल्गार!

## राष्ट्रवादीच्या नेत्या क्रांती धोटे यांच्या नेतृत्वात महिलांनी गाठले अधीक्षक कार्यालय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १० :** तालुक्यातील अंबाडी येथील ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर करूनही अवैध दारूविक्री सुरूच असल्याने, संतप्त महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा क्रांती धोटे यांच्या नेतृत्वात थेट पोलिस अधीक्षक कार्यालय गाठले. पोफळी पोलिसांच्या निष्क्रियतेविरोधात एल्गार पुकारत त्यांनी दारूबंदीसाठी सहकार्य करण्याची मागणी केली.
अंबाडी येथे १२ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत गावातील महिलांनी एकजुटीने पुढाकार घेऊन संपूर्ण दारूबंदीचा महत्वपूर्ण ठराव मंजूर केला



होता. यानंतर, गावातील अवैध दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीविरोधात पोफळी पोलिस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली. मात्र, अनेक दिवस उलटूनही पोलिसांनी या तक्रारीची कोणतीही दखल घेतली नाही. गावात अवैध दारूविक्री राजरोसपणे सुरूच राहिल्याने आणि स्थानिक पोलिस प्रशासनाकडून निराशा पदरी पडल्याने महिलांचा संयम अखेर सुटला आणि त्यांनी हा लढा वरिष्ठ पातळीवर नेण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा क्रांती धोटे यांच्या नेतृत्वात शेकडो महिलांनी थेट यवतमाळ येथील पोलिस अधीक्षक कार्यालय गाठून आपला एल्गार पुकारला. दारूच्या व्यसनामुळे गावातील संसार उद्ध्वस्त होत आहेत. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे, आता गावातील लहान मुलेही व्यसनाच्या आहारी जात असून, त्यांचे संपूर्ण भविष्य धोक्यात आले आहे, अशी संतप्त आणि गंभीर भावना क्रांती धोटे यांनी पोलिस अधीक्षकांसमोर व्यक्त केली. पोलिस अधीक्षकांना निवेदन देऊन, ग्रामसभेच्या लोकशाही मार्गाने घेतलेल्या निर्णयाचा आदर करावा आणि गावातील अवैध दारूविक्री कायमस्वरूपी बंद करण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने सहकार्य करावे, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. यावेळी क्रांती धोटे यांच्यासोबत संदेश राठोड, अंबाडीचे सरपंच दादाराव धुमाळे, यादवकुळे आणि गावातील अनेक महिला भगिनी उपस्थित होत्या. महिलांचा आक्रमक पवित्रा आणि समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन, पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून आजच्या आज सहकार्य करण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजास आरक्षण द्या!




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मानोरा , दि. १० :** हैदराबाद गॅझेटनुसार महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाज हा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट होता. देशाच्या सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांनी या गॅझेटला ऐतिहासिक शासकीय पुरावा मान्यता दिलेली आहे.संत तपस्वी धर्मगुरू रामराव महाराज यांनी आरक्षणाचा मुद्दा वेळोवेळी शासनाकडे आंदोलनाची भूमिकेतून माडत अनेक वेळा पंतप्रधान सह मुख्यमंत्री यांना भेटून समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नाची पूर्ती करण्यासाठी दि १७ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय मानोरा येथे संजय महाराज यांच्या नेतृत्वात बंजारा समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे.

ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे महाराष्ट्रातील बंजारा समाजास अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे, अशी मागणी समाजाने मागील अनेक दशकांपासून सातत्याने केली आहे.
सन १९१८ च्या हैदराबाद गॅझेटनुसार आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यांमध्ये बंजारा समाजास अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा या राज्यांशी रोटी-बेटी-बोटी व्यवहार असून, सामाजिक व सांस्कृतिक नातेसंबंध दृढ आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाज आणि आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटकातील बंजारा समाज हे एकाच वंशाचे, सगे-सोयरे मानले जातात. वरील सर्व गोष्टींचा विचार करून, महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाजास देखील आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यांच्या धर्तीवर अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात यावे, यासाठी भारत सरकार यांना शिफारस करण्यात यावे अन्यथा उपरोक्त न्याय मागणीसाठी राज्यभर आंदोलन केले जाणार असल्याची प्रतिक्रिया निवेदनकर्त्यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली. संभाव्य आंदोलनाचे निवेदन प्रशासनाला देतेवेळी संजय महाराज, रमेश महाराज, गोर सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष गोपाल चव्हाण, तालुका अध्यक्ष सुनील राठोड, माजी सरपंच दिलीप चव्हाण,शेतकरी नेते मनोहर राठोड, माजी पंचायत समिती सदस्य अभिषेक चव्हाण, राष्ट्रीय बंजारा परिषद श्याम राठोड,राष्ट्रीय बंजारा परिषद वसंतराव राठोड,विशाल राठोड, धीरज राठोड,रोशन चव्हाण,अरविंद चव्हाण, बी टी चव्हाण,पवन राठोड , किशोर नाईक गिर्डा,मधुसूदन राठोड,नितीन राठोड,विनोद चव्हाण,मखराम पवार,भानुदास जाधव,रामनाथ राठोड, काशीराम राठोड,आशिष राठोड,रमेश पवार ,किशोर राठोड,रामराव चव्हाण,नेमीचंद राठोड,प्रकाश राठोड,बाळू राठोड,गणेश जाधव, महेश राठोड आदींची उपस्थिती होती.

## ग्रामीण रुग्णालयाला पॉयझन सक्शन मशीन लोकार्पित

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट , दि. १० :**९ ते १५ सप्टेंबर दरम्यान संपूर्ण देशभरात जेसीआय चा जेसी सप्ताह साजरा होत असतो. जेसीआय अकोटचा एस एस खरोटे सुवर्णकार जेसी सप्ताह२०२५ ची सुरुवात ९ सप्टेंबरला स्थानिक सोमवारवेस येथील सिद्धिविनायक मंदिरामध्ये गणपती बाप्पाच्या महाआरतीने सुरूवात झाली.



त्यानंतर ग्रामीण रुग्णालय अकोटला पॉयझन सक्षन मशीन लोकार्पित करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष डॉक्टर कृष्णाजी बजाज. सचिव देवानंदजी झाडे. सप्ताह प्रमुख शिरीषजी घाटोड. अजयजी अडोकार, अंचल अधिकारी प्रवीणजी बनसोड प्रकल्प प्रमुख मोहित गांधी उपस्थित होते मुख्य अतिथी म्हणून डॉ. अजय आसोले म्हणाले या बहुपयोगी मशीन द्वारा सामान्य रुग्णांचे प्राण वाचवण्यास मदत होईल. दुसरे प्रमुख अतिथी जितेंद्रजी चावडा यांनी आपल्या भाषणात जेसीआयकोट असे सामाजिक उपक्रम नेहमीच राबवित असल्याचे सांगितले. याप्रसंगी बहुसंख्येने जेसी बांधव तथा समाज बांधव उपस्थित होते.

## कोजबीची ग्रामसभा वादळी, प्रश्नांना उत्तरे देई तिसराच व्यक्ती!

### अतिक्रमणाच्या प्रश्नावरून नागरिक आक्रमक, तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वैरागड, दि. १० :** 'नाव मोठे, लक्षण खोटे' या उक्तीप्रमाणे, लोकशाहीचा पाया मानली जाणारी कोजबी येथील ग्रामसभा, ग्रामपंचायत प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे पूर्णपणे वादग्रस्त ठरली. नागरिकांनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने, तसेच त्रयस्थ व्यक्तींनी सभेत हस्तक्षेप केल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.
आरमोरी पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या कोजबी ग्रामपंचायतीची ग्रामसभा ९ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. ऑगस्ट महिन्याची सभा कोरमअभावी तहकूब झाल्याने, या सभेकडे गावकऱ्यांचे विशेष लक्ष लागले होते. सभेला महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी पिण्याचे पाणी, नाली, रस्ते, वीज आणि सोनपूर व कोजबी येथील अतिक्रमणासारख्या गंभीर विषयांवर प्रश्नांची सरबत्ती केली. मात्र, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि अधिकारी नागरिकांच्या एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. याउलट, प्रशासनाकडून नागरिकांच्या समस्या सोडवण्याऐवजी केवळ टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. ग्रामसभेत घेतले जाणारे ठराव केवळ कागदावरच मर्यादित राहतात आणि त्यांची अंमलबजावणी होत नाही, अशी तीव्र नाराजीही नागरिकांनी व्यक्त केली. ग्रामपंचायतीचा संपूर्ण कारभार नियोजनशून्य असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्याकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे, अशी टीका सामाजिक कार्यकर्त्यांनी केली. लोकशाहीच्या मंदिरातच जर लोकांच्या आवाजाची किंमत नसेल, तर दाद मागायची कुठे, असा हताश सवाल नागरिक विचारत आहेत. आता या गंभीर प्रकरणांची दखल वरिष्ठ कार्यालयांकडून घेतली जाईल की नाही, याकडे संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**अंधेर नगरी, चौपट राजा**

ग्रामसभेदरम्यान प्रशासनाचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला. नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाशी संबंध नसलेली एक त्रयस्थ व्यक्ती पुढे येत होती. इतकेच नव्हे, तर एक अधिकारी चक्क शिपायाला बोलावून उत्तर विचारत असल्याचे दिसले. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यप्रणालीवर संशयाचे धुके निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**सहनशीलतेचा अंत**

ग्रामपंचायत प्रशासनाच्या वेळकाढू धोरणाला आणि निष्क्रियतेला नागरिक आता विटले आहेत.

### आश्वासनांचे गाजर

सोनपूर येथील अतिक्रमणाचा प्रश्न दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. यासाठी नागरिकांनी २८ दिवस आंदोलनही केले होते. आमदार रामदास मसराम यांच्या जनता दरबारात प्रश्न मांडल्यावर, गटविकास अधिकारी आरेवार यांनी आबादी जागेचे मोजमाप करून प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ग्रामपंचायत प्रशासनाने कोणताही पाठपुरावा केला नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

## मिरवणुकीत अडथळा निर्माण करणाऱ्या युवकावर गुन्हा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पुसद, दि. १० :** गणेश विसर्जन मिरवणुकीत अडथळा निर्माण करून गावात शांतता कशी राहते ते पाहतो, अशी धमकी देणाऱ्या युवकावर पुसद ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून, दिपक सुभाष काळसरे असे या युवकाचे नाव आहे.
महागाव तालुक्यातील काळी दौ. येथे ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात आणि शांततेत सुरू होती. मिरवणूक मुंगसाजी महाराज मंदिराजवळ आली असता, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी श्रीकृष्ण मंडळाच्या सदस्यांना मिरवणुकीला गती देत पुढे जाण्यास सांगितले. मात्र, यावेळी मंडळासोबत असलेल्या दिपक सुभाष काळसरे (वय अंदाजे २७, रा. काळी दौ.) याने पोलिसांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करत आक्रमक पवित्रा घेतला आणि सर्वांसमोर अडथळा निर्माण केला. आम्ही आमची गाडी अजिबात पुढे काढणार नाही. तुम्ही आम्हाला डीजे लावू दिला नाही. आता गावात शांतता कशी नांदते तेच मी पाहतो, अशी धमकीवजा भाषा वापरत त्याने जाणीवपूर्वक मिरवणुकीत व्यत्यय आणला आणि उपस्थित भाविकांमध्ये तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
सार्वजनिक शांतता भंग करणे आणि कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा आणण्याच्या या गंभीर प्रकाराची पोलिसांनी तात्काळ दखल घेतली. याप्रकरणी प्रोबेशनरी पोलिस उपनिरीक्षक रवी चव्हाण यांनी पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. त्यावरून त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस दल अत्यंत सतर्क असताना, अशा प्रकारे सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. हा गुन्हा अदखलपात्र असल्याने, या प्रकरणात आरोपीवर पुढील कारवाई करण्यासाठी पोलिस आता न्यायालयाची रीतसर परवानगी घेण्याच्या प्रक्रियेत आहेत. न्यायालयाच्या परवानगीनंतरच या प्रकरणाची पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल आणि त्यानुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसचा (श.प.) सुरक्षा विधेयकाला विरोध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कारंजा, दि. १० :**राज्य सरकारकडून आणण्यात आलेल्या सुरक्षा विधेयक विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कारंजा येथे तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या विधेयकामुळे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, वैयक्तिक स्वातंत्र्यावर व शांततेत आंदोलन करण्याच्या लोकशाही हक्कांवर गदा येणार असल्याचे निवेदनात



नमूद करण्यात आले. उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देताना दिलीप पाटील रोकडे, तालुका अध्यक्ष ओबीसी सुमित पाटील,युवक जिल्हाध्यक्ष भुजंगराव वाकळे,जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ नागरिक सेल श्रीधर पाटील कानकिरड जिल्हा मध्यवर्ती बँक उपाध्यक्ष, ज्योतीताई गणेशपुरे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वाशिम,डॉ. अशोक मुंदे ,अजय पाटील रंगे,किरण पाटील ठाकरे,रोशन पाटील वाकळे,शुभम वाकळे,विनोद वाकळे,मनोज खाडे,चंद्रकांत पाटील, नितीन पाटील गाडगे,अमोल तायडे,युवराज पाटील किरण पाटील ठाकरे किरण पाटील ठाकरे तुळशीराम तायडे संकेत नाकले दिनेश वाडेकर शुभम बोनके, अजय राठोड कार्यकर्त्यांनी सह्या केल्या.

मागणी

## गोर सेनेचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

# बंजारा समाजाला अनुसूचित जमातीत समाविष्ट करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १० :** जुने ऐतिहासिक दस्तऐवज आणि विविध आयोगांच्या शिफारशींचा आधार घेत, दिग्रस येथील गोर सेना शाखेने बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या (एसटी) यादीत समाविष्ट करण्याची मागणी पुन्हा एकदा जोरकसपणे मांडली आहे. या मागणीचे निवेदन बुधवारी (दि. १०) तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आले.
महाराष्ट्रातील बंजारा समाजावर वर्षानुवर्षे घटनात्मक अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत, गोर सेनेने आपल्या प्रमुख मागण्या शासनापुढे ठेवल्या आहेत. त्यांच्या मते,



सेंट्रल प्रोव्हिन्स बेरार, नागपूरच्या शिफारसी आणि हैदराबादच्या गॅझेटनुसार बंजारा तत्सम जमातीला अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट करण्यात आले होते. या ऐतिहासिक अधिसूचनेची अंमलबजावणी करून, तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या शासनाने घेतलेल्या भूमिकेचा सन्मान करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच, राज्याच्या शेजारी असलेल्या कर्नाटक, आंध्र आणि तेलंगणा या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही संविधानिक न्याय देऊन, सर्व सवलती व योजना लागू कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. समाजाची ओळख अधिक स्पष्ट आणि एकसंध करण्यासाठी, जनगणनेमध्ये विविध नावांऐवजी 'गौर (बंजारा)' या एकाच नावाने समाजाची नोंदणी करावी, अशीही एक महत्वाची मागणी करण्यात आली आहे. राज्य शासनाने या सर्व मागण्या मान्य करून, त्याबाबतची स्पष्ट शिफारस केंद्र सरकारकडे करावी, अन्यथा समाजाला आपल्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन उभारावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. या मागणीमुळे राज्यातील आरक्षणाचा गुंतागुंतीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गोर सेनेने शासनाकडे प्रमुख घटनात्मक मागणी केली आहे. बंजारा समाजाच्या (विजा-अ) टक्केवारीचा समावेश, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (२) नुसार अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारीत स्वतंत्रपणे करावा. राज्य शासनाने याबाबतची स्पष्ट शिफारस तातडीने केंद्र सरकारकडे पाठवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. इतिहासाची साक्ष, न्यायाची आस ही मागणी ऐतिहासिक दस्तऐवजांवर आधारित आहे. सेंट्रल प्रोव्हिन्स बेरार, नागपूरच्या शिफारसीनुसार आणि हैदराबादच्या गॅझेटनुसार बंजारा जमातीला अनुसूचित जमातीच्या यादीत समाविष्ट केले होते.

### समाजाची नोंद गौर (बंजारा) नावाने करा

महाराष्ट्र शेजारील कर्नाटक, आंध्र आणि तेलंगणा या राज्यांमध्ये बंजारा समाजाला मिळणाऱ्या सवलती व योजना महाराष्ट्रातही लागू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. एकाच समाजाला वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळा दर्जा मिळणे हा घटनात्मक अन्याय आहे, तो दूर करावा. तसेच, जनगणनेत समाजाची नोंद विविध नावांऐवजी 'गौर (बंजारा)' याच एका नावाने करावी.

## यवतमाळकरांच्या सेवेत सदोदित उपलब्ध राहीन-डॉ. अनिल बत्रा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १० :** स्थानिक वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातापदी नुकतीच निवड झालेले सुपुत्र डॉ. अनिल बत्रा यांचा, बाबा हरदासराम सेवा मंडळ आणि सिंधी समाजातर्फे सहकुटुंब भावपूर्ण सत्कार करण्यात आला. समाजाच्या पाठबळामुळेच हे यश मिळाल्याचे सांगत, यवतमाळकरांच्या सेवेत सदैव उपलब्ध राहण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.
वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठातासारख्या महत्वपूर्ण पदावर निवड झाल्याबद्दल गोधडीवाला धाम परिवारातर्फे आयोजित या कार्यक्रमात, डॉ. बत्रा यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. 'समाजाचा मी कायमस्वरूपी ऋणी राहीन,' असे भावोद्गार त्यांनी काढले. या सत्कार समारंभाला सिंधी समाजातील कार्यकर्ते विजय लखानी, प्रकाश बत्रा, रवी



छत्तानी, सुशील अंबरतानी, रमेश आहुजा, हरिराम छत्तानी, अनिल अंबारतानी, गोपाल खट्टर, सतीश बत्रा, राजेश शहाणी, प्रा. वीरेंद्र तलरेजा, कैलास बजाज, विशाल गाबडा, जगत जेठवानी, शिव जाधवानी, रवी होतवानी आदी मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सत्काराने डॉ. बत्रा भारावून गेले.

मणप्पुरम | घर फायनान्स लि.

मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
फॉर्मर्ली मण्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
CIN : U65923KL2010PLC039179
नोंदणीकृत कार्यालय: IV/470A (जुने) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलपद त्रिशूर, केरळ 680567 कॉर्प ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक 301 ते 315, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र.
फोन नंबर: ०२२-६६२११०००, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

**ताबा सुचना (स्थावर मालमत्तेसाठी)**

तर, अधोस्वाक्षरी करणारा व्यक्ती मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड ("MAHOFIN") चा अधिकृत अधिकारी असल्याने, तो सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट * [अधिनियम], २००२ (५४ ऑफ २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकाराचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याजाची परतफेड करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे. कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधोस्वाक्षरी करणारा व्यक्तीने सदर नियमांच्या कलम १३(४) [अधिनियम] च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३(४) अंतर्गत त्याला/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी संबंधित प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असेल:

| क्र. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक/शाखा | ज्या हितसंबंधासाठी स्थापन करण्यात आले आहे त्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | मागणी पाठविण्याची सूचना आणि थकबाकीची तारीख | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | नलिनी रतनपाल जाधव, रतनपाल गुजब्रव जाधव, रिना संगपाल जाधव, संघपाल गुजब जाधव, / MHL00500006152/Akola | मौजे - सुकाळी (वरखेड) येथील घराची मालमत्ता क्रमांक ९३ एकूण ५१६ चौ.फूट बांधकामासह, ग्रामपंचायत सुकाळी (वरखेड) ता. बार्शीटाकळी जिल्हा, अकोला, महाराष्ट्र, पिन: ४४४००६ आणि मौजे सुकाळी (वरखेड) येथील घराची मालमत्ता क्रमांक २६३ एकूण ४३५ चौ.फूट - बांधकामासह, ग्रामपंचायत सुकाळी (वरखेड) ता. बार्शीटाकळी जि., अकोला, महाराष्ट्र, पिन: 444006. पूर्व-मालमत्ता क्रमांक 93 - श्री. बाबुराव जाधव व मालमत्ता क्रमांक 263 - श्री. प्रदिप जाधव, पश्चिम-मालमत्ता क्रमांक 93 - श्री. बाळकृष्ण लांडे व मालमत्ता क्रमांक 263 - श्री. बाबुराव जाधव व मालमत्ता क्रमांक 263 - श्री. श्री. श्री. श्री. श्री. श्री. श्री. श्री. श्री. गजानन येवतकर आणि मालमत्ता क्रमांक २६३ शासकीय रस्ता, उत्तर-मालमत्ता क्रमांक ९३ - शासन. रस्ता व मालमत्ता क्रमांक २६३ -श्री. प्रदिप | ११-०६-२०२५ आणि रु.४२६३२७/- | ०६-०९-२०२५ |

तारीख: ११ सप्टेंबर २०२५ | ठिकाण: महाराष्ट्र | अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

## महत्त्वाचे

### पीएनबीकडून ऑलिंपियन अभिषेक आणि सुखजीत सिंग यांचा सन्मान

**मुंबई :** भारतातील पंजाब नॅशनल बँकेकडून (पीएनबी) भारताचे दोन हॉकी स्टार्स ऑलिंपियन आणि अर्जुन पुरस्कार विजेते अभिषेक आणि सुखजीत सिंग यांचा सन्मान करण्यासाठी एक विशेष सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. अभिषेक यांना अलीकडेच आशिया चषक २०२५ मध्ये ''टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडू'' म्हणून निवडण्यात आले आहे. हे दोन्ही खेळाडू पीएनबीचे कर्मचारी तसेच पीएनबी हॉकी संघाचे वरिष्ठ सदस्य आहेत. बँक हॉकीतील प्रतिभावान खेळाडू घडवण्यासाठी एक हॉकी अकादमीही चालवते.हा समारंभ नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता, जिथे पीएनबीचे एमडी आणि सीईओ अशोक चंद्र यांच्याकडून खेळाडूंचा सन्मान करण्यात आला आहे. या कार्यक्रमात दोन्ही हॉकी विजेत्यांसोबत एक संवादात्मक सत्रदेखील आयोजित करण्यात आले होते.पॅरिस २०२४ चे ऑलिंपियन, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२२ चे रौप्यपदक विजेते, आशियाई खेळ २०२२ चे सुवर्णपदक विजेते आणि आशियन चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ चेही सुवर्णपदक विजेते असलेले अभिषेक भारताच्या सर्वात गतिमान (डायनॅमिक) फॉरवर्ड खेळाडूंमध्ये उभे राहिले आहेत.

### दुबईची खेळपट्टी कोणासाठी फायदेशीर ठरणार?

**नवी दिल्ली :**आशिया चषक २०२५ स्पर्धेला दमदार सुरूवात झाली आहे. स्पर्धेतील पहिल्या लढतीत अफगाणिस्तानने हाँगकाँगचा ९४ धावांनी धुव्वा उडवला. स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात भारत आणि यूएई हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे आहे. तो पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून येणार आहे. भारतीय संघाने याआधी यूएईविरूद्ध झालेल्या सामन्यात ९ गडी राखून विजय मिळवला होता. हे दोन्ही संघ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दुसऱ्यांदा आमनेसामने येणार आहेत. दरम्यान दुबईची खेळपट्टी कोणाला साथ देणार? जाणून घ्या.याआधी झालेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत फिरकी गोलंदाजांना चांगलीच मदत मिळाली होती. मात्र, यावेळी खेळपट्टीवर गवताचं प्रमाण अधिक असल्याचं सांगितलं जात आहे.

# भारत-पाक सामन्याची क्रेझ संपली?

## भारत आणि पाकिस्तान सामन्याची तिकिटे अजूनही पूर्णपणे विकली गेलेली नाही

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी



भारत विरूद्ध पाकिस्तान सामना पाहण्यासाठी क्रिकेट चाहते आतुरतेने वाट पाहत असतात. हे दोन्ही संघ जेव्हा जेव्हा आमनेसामने येतात, तेव्हा क्रिकेट चाहत्यांना थरारक सामना पाहायला मिळत असतो. हे दोन्ही संघ कुठल्याही द्विपक्षीय मालिकेत आमनेसामने येत नाहीत. दोन्ही संघ केवळ आयसीसीच्या स्पर्धेत आणि आशिया चषकात आमनेसामने येत असतात. त्यामुळे क्रिकेट चाहते भारत- पाकिस्तान सामन्याच्या तिकीटांची आतुरतेने वाट पाहत असतात. तिकीटांची ऑनलाईन विक्री सुरू होताच, अवघ्या काही मिनिटात तिकीटं सोल्डआऊट होतात. मात्र, आशिया चषक २०२५ स्पर्धेत उलट चित्र पाहायला मिळालं आहे.

आशिया चषक २०२५ स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरूवात झाली आहे. भारत- पाकिस्तान सामन्याचा थरार येत्या १४ सप्टेंबरला रंगणार आहे. हा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये रंगणार आहे. सामना सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. मात्र, अजूनही या सामन्याच्या तिकीटांची विक्री झालेली नाही. आशिया चषक २०२५ स्पर्धेतील हा प्रमुख सामना आहे. पण या महत्वाच्या सामन्याच्या तिकीटांची विक्री न झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.तिकीट विक्री करणाऱ्या ऑनलाईन साईटवर अजूनही तिकीटं उपलब्ध आहेत. ज्या तिकिंटाची किंमत अडीच लाख रूपये इतकी आहे. या महागड्या तिकिटासह गाडी पार्क करण्याचा पास, अनलिमिटेड जेवण आणि व्हिआयपी लाऊंच सारख्या सुविधा मिळतात. इतरवेळी या तिकिटांची किंमत जास्त असते. तरीदेखील ही तिकीटं अवघ्या काही मिनिटात सोल्ड आऊट होत असतात. मात्र, यावेळी असं काहीच झालेलं नाही.काही दिवसांपूर्वी भारत-पाकिस्तान सामना होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र भारत सरकारने अनुमती दिल्याने हा सामना होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. या सामन्याला भारतीय क्रिकेट चाहत्यांकडून विरोध केला जात आहे. एप्रिल महिन्यात पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये हल्ला करून निष्पाप भारतीयांचा जीव घेतला होता. त्यामुळे भारत-पाकिस्तान सामन्याला विरोध केला जात आहे. अनेक दिग्गज खेळाडूंनी देखील या सामन्याला विरोध केला होता.

## पृथ्वी शॉ वर आकारण्यात आला १०० रूपयांचा दंड!

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी



भारताचा युवा स्टार फलंदाज पृथ्वी शॉ ने काही दिवसांपूर्वी मुंबई क्रिकेट असोसिएशनची साथ सोडून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून खेळण्याचा निर्णय घेतला. या संघाकडून खेळताना त्याने पहिल्याच सामन्यात दमदार शतक झळकावलं. मात्र यावेळी तो मैदानावरील कामगिरीमुळे नव्हे, तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. काही महिन्यांपूर्वी पृथ्वी शॉ छेडछाड प्रकरणात अडकला होता. पृथ्वी शॉ ला सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सपना गिलच्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी वारंवार संधी दिली गेली. असं असतानाही त्याने आपला जबाब नोंदवला नाही. आता सत्र न्यायालयाने त्याच्यावर कारवाई केली आहे. जाणून घ्या काय आहे संपूर्ण प्रकरण.

सत्र न्यायालयाने पृथ्वी शॉ वर १०० रूपयांचा दंड आकारला आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सपना गिलने त्याच्यावर धक्काबुक्की आणि छेडछाड करण्याचे आरोप केले होते. या प्रकरणात न्यायालयाने पृथ्वी शॉ ला अनेकदा आपली बाजू मांडण्याची संधी दिली. असं असतानाही त्याने आपला जबाब न नोंदवल्याने न्यायालयाने त्याच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १६ डिसेंबरला न्यायालयाची पुढची तारीख असणार आहे. या तारखेला हे प्रकरण नेमकं कोणत्या दिशेने जाईल याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.हे प्रकरण १५ फेब्रुवारी २०२३ ला अंधेरीतील एका पबमध्ये घडलं होतं. सपना गिलने असा दावा केला आहे की, पृथ्वी शॉ ने सेल्फीसाठी नकार दिला होता. त्यानंतर तिचा मित्र शोभित ठाकूरचा मोबाईल हिसकावून फेकून दिला. जेव्हा ती या प्रकरणात मध्ये पडली. त्यावेळी तिच्यावर हल्ला केला.

## अफगाणिस्तानने हाँगकाँगला चारली धूळ

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी



१८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हाँगकाँगला अफगाणिस्तानसमोर कोणतेही आव्हान उभे करता आले नाही. हाँगकाँगच्या एकाही खेळाडूला मोठी धावसंख्या उभारता आली नाही आणि डाव ९४ धावांमध्येच गुंडाळला गेला आणि ९४ धावांनी हा सामना जिंकला आहे. अफगाणिस्तानने संपूर्ण झंझावाती खेळी करत हाँगकाँगचा संपूर्ण संघ केवळ ९४ धावांमध्ये गारद केला आहे.

अफगाणिस्तान आणि हाँगकाँगच्या संघात आज पहिला सामना खेळवला गेला आणि अफगाणिस्तानने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीमध्ये आपण निपुण असल्याचे दाखवून दिले आहे. हाँगकाँगच्या संघाला कुठेही श्वास घ्यायला जागा न देता धडाधडा त्यांचे खेळाडू अफगाणिस्तानच्या गोलंदाजांनी तंबूत परत पाठवले आणि ९४ धावांच्या मोठ्या फरकाने हा सामना जिंकून पॉईंट्स आपल्या खात्यात जमा केले आहेत.

पॉवरप्लेमध्ये त्यांनी चार विकेट गमावल्या आणि फक्त २३ धावा केल्या. आशिया कप २०२५ च्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानने दिलेल्या १८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या हाँगकाँगने दुसऱ्याच चेंडूवर विकेट गमावली. अंशुमन राठ खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. तर दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ५ धावा काढून झिशान अली पॅव्हेलियनमध्ये परतला. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या अफगाणिस्तानने सेदिकुल्लाह अटलच्या नाबाद अर्धशतकी खेळीच्या मदतीने २० षटकांत १८८ धावा केल्या आणि हाँगकाँगला विजयासाठी १८९ धावांचे लक्ष्य दिले.

## युएईच्या गोलंदाजाचे शुबमन गिलबरोबर खास कनेक्शन

नवी दिल्ली : दि. १० प्रतिनिधी

भारतीय संघ युएईविरूद्ध सामन्याने आशिया चषक स्पर्धेच्या मोहिमेला सुरूवात करणार आहे. भारताची या सामन्यासाठी प्लेईंग इलेव्हन कशी असणार यावर सर्वांच्या नजरा आहेत. दरम्यान युएईचा संघ प्रथमच आशिया चषक खेळण्यासाठी उतरला आहे. यामध्ये काही भारतीय वंशाचे खेळाडूदेखील आहेत. त्यापैकी एका गोलंदाजाने शुबमन गिलबरोबरची त्याची आठवण सांगितली आहे.

युएईच्या ताफ्यात अनेक भारतीय वंशाचे खेळाडू आहेत. ज्यामध्ये सिमरनजीत सिंगदेखील खेळताना दिसणार आहे. जो मूळचा पंजाब लुधियाना येथील आहे. युएईकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यापूर्वी तो पंजाबकडून क्रिकेट खेळला आहे. त्याने भारताचा कसोटी कर्णधार शुबमन गिलबरोबरची त्याची आठवण सांगितली आहे.या सामन्यापूर्वी, यूएईचा डावखुरा फिरकी गोलंदाज सिमरनजीत सिंग शुबमन गिलला लहानपणापासून ओळखतो. ३५ वर्षीय सिमरनजीत सिंग म्हणाला, ''मी शुबमनला तो लहान असल्यापासून ओळखतो, पण तो मला आता ओळखत असेल नाही कल्पना नाही. ही २०११-१२ ची गोष्ट आहे. तो पण तेव्हा ११-१२ वर्षांचा असेल. आम्ही सकाळी ६ ते ११ दरम्यान पंजाब क्रिकेट अकादमीमध्ये सराव करायचो आणि त्यावेळेस शुबमन त्याच्या वडिलांबरोबर यायचा. मी अतिरिक्त वेळ गोलंदाजीसाठी थांबायतो आणि तेव्हाच मी बरेचदा त्याला नेट्समध्ये गोलंदाजी केली आहे.

## अनाया बांगर लग्नासाठी उत्सुक; म्हणते, 'लग्नासाठी ३०-४० हजार जणांनी घातली मागणी'

मुंबई : दि.१० प्रतिनिधी



अश्नीर ग्रोवरचा राईज अँड फॉल हा रिॲलिटी शो सध्या तुफान चर्चेत आहे. हा शो सुरू होऊन अवघे ३ दिवस झाले आहेत. अवघ्या ३ दिवसात या शो ची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. या शो मध्ये अनाया बांगरने देखील सहभाग नोंदवला आहे.

भारताचे माजी क्रिकेटपटू संजय बांगर यांचा मुलगा आर्यन बांगरने लिंगबदल शस्त्रक्रिया केल्यानंतर अनाया बांगर म्हणून आपली नवी ओळख निर्माण केली आहे. अवघ्या काही महिन्यात ती प्रचंड लोकप्रिय झाली आहे. आता राईज अँड फॉल या शो मध्ये बोलताना तिने, मुलं तिच्यासोबत लग्न करण्यासाठी किती उत्सुक आहेत याबाबत खुलासा केला आहे. शो मध्ये तिने आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. आता तिने आपल्या लग्नाबद्दल मोठा खुलासा केला आहे. आर्यनची अनाया झाल्यानंतर तिला अनेकांनी लग्नासाठी विचारलं. तिने राईज अँड फॉल या शो मध्ये आकृती नेगीसोबत बोलताना याबाबत खुलासा केला. आकृतीसोबत चर्चा करताना अनाया म्हणाली की, मी खरं सांगते, कमेंट सेक्शनमध्ये लोकं मला वाईट बोलतात. पण हिच लोकं मला प्रेमाने मेसेज करतात. सोशल मीडियावर अनेक तरूण माझ्यासोबत लग्न करण्यासाठी उत्सुक आहेत. मला सोशल मीडियावर हजारो मेसेज येतात. पण मी प्रत्येकाला उत्तर देऊ शकत नाही. आतापर्यंत ३० ते ४० हजार लोकांनी मला लग्नासाठी विचारलं आहे. मी लग्न करण्यासाठी खूप उत्सुक आहे. पण सर्वांशी संवाद साधण्यासाठी माझ्याकडे पुरेसा वेळ नाही.

'लग्नाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे अनाया बांगर तुफान चर्चेत आहे. या शो मध्ये ती फार काही बोलताना दिसून आलेली नाही. शांतीत क्रांती करत असलेल्या अनायाचा अंदाज चाहत्यांना खूप आवडतोय. ती सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. आता या शो मुळे तिच्या चाहत्यांना तिच्याबद्दल आणखी माहिती जाणून घ्यायला मिळणार आहे.

### सन फार्माची सूत्रे मराठी माणसाच्या हाती



**नवी दिल्ली :**देशातील औषध निर्मिती क्षेत्रातील आघाडीची कंपनी सन फार्मास्युटिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने जूनमध्ये कीर्ती गणोरकर यांच्या नावाची कंपनीचे नवे व्यवस्थापकीय संचालक म्हणून घोषणा केली होती. त्यानंतर १ सप्टेंबर २०२५ पासून कीर्ती गणोरकर यांनी व्यवस्थापकीय संचालक पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. यानंतर गणोरकर यांनी लिंक्डइन या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी कंपनीतील कामाला कशी सुरुवात केली आणि या पदापर्यंत ते कसे पोहोचले याचे वर्णन केले आहे. कीर्ती गणोरकर लिंक्डइनवर लिहिलेल्या आपल्या पोस्टला सुरुवात करताना म्हणाले की, ''मी इथे माझी पहिली पोस्ट लिहित आहे. आता माझा सन फार्मासोबतचा प्रवास कसा सुरू झाला याकडे वळूया. ती ९० च्या दशकाची सुरुवात होती आणि मला टाइम्स ऑफ इंडियामध्ये दिलीप संघवी यांच्या कार्यकारी सहाय्यक पदासाठी आलेली जाहिरात वाचायला मिळाली. मी तरुण आणि उत्साहित होतो.

# ट्रम्प दंडात्मक शुल्काचा जाच क्षणिकच

## जीएसटी सुधारणांनंतर तर परिणाम शून्यावर!

नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी



अनुदानापेक्षा शेतकऱ्यांना विक्री स्वातंत्र्य महत्त्वाचे भारताच्या 'जीडीपी' वाढीमध्ये कृषी क्षेत्रातून अजूनही किमान ०.५-०.७ टक्के जास्त योगदान मिळविता येऊ शकेल. यासाठी शेतकऱ्यांना कोणालाही, काहीही, कुठेही आणि केव्हाही विकण्याचा अधिकार दिला जायला हवा. शेतकऱ्यांना कृषी अनुदानापेक्षाही अशा प्रकारचे स्वातंत्र्य जास्त महत्त्वपूर्ण ठरेल. निसर्गाचा लहरीपणा आणि अनिश्चिततेला बळी पडणाऱ्या शेतकऱ्यांना विम्याचे सुरक्षा कवचही आवश्यक आहे, असे नागेश्वरन यांनी सुचविले.

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सुधारणांमुळे अमेरिकेने भारतीय मालावर लादलेल्या ५० टक्के वाढीव आयात शुल्काचे प्रतिकूल परिणाम भरून काढण्यास मदत होईल आणि चालू आर्थिक वर्षात 'जीडीपी' वाढीवर याचा निव्वळ परिणाम ०.२-०.३ टक्के इतकाच दिसेल, असे देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी बुधवारी येथे प्रतिपादन केले.

अमेरिकेतून होणाऱ्या निर्यातीवरील प्रतिकूल परिणाम हा देशांतर्गत मागणीत परिवर्तित होऊन खूप चांगल्या संतुलनाची भूमिका ही ताज्या जीएसटी सुधारणांमधून बजावली जाईल, असे नागेश्वरन यांनी सूचित केले. व्यवस्थापन व्यावसायिकांची राष्ट्रीय संघटना- 'एआयएमए'द्वारे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या आठवड्यात जीएसटी परिषदेने घेतलेल्या निर्णयानुरूप, नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून म्हणजेच येत्या २२ सप्टेंबरपासून जीएसटीमध्ये फेरबदल लागू झाल्यावर साबणापासून कार, शाम्पूपासून ते ट्रॅक्टर, टीव्ही आणि वातानुकूल यंत्रापर्यंत मध्यमवर्गीयांकडून वापरात येणारी जवळजवळ ४०० उत्पादने स्वस्त होतील.जीएसटी सुधारणांतून देशांतर्गत ग्राहक मागणीला चालना मिळेल आणि त्यामुळे भांडवल निर्मितीच्या मार्गात येणारी अनिश्चितता दूर होईल. नागेश्वरन म्हणाले, अमेरिकेला होणारी भारतीय वस्तूंची निर्यात ही गेल्या संपूर्ण वर्षात झालेल्या निर्यातीच्या जवळजवळ निम्मी ही चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या पाच महिन्यांत केली गेली आहे, हे दुर्लक्षिता येणार नाही. म्हणजेच, दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, या आर्थिक वर्षात, जसे गृहित धरले जात आहे तितका प्रतिकूल परिणाम संभवत नाही. किंबहुना ट्रम्प वाढीव शुल्काचा परिणाम तुलनेने मर्यादित असू शकतो. यालाच पुस्ती जोडताना नागेश्वरन यांनी विश्वास व्यक्त केला की, ट्रम्प शुल्काची घातक स्थिती दीर्घकाळ टिकण्याऐवजी क्षणिक आणि अल्पकालीन असेल. ''पण जर, विशेषतः २५ टक्के दंडात्मक शुल्काचा जाच आपल्या इच्छेपेक्षा जास्त काळ टिकला, तर त्याचे दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीचे परिणाम हे गुंतवणूक, भांडवल निर्मिती आणि अर्थव्यवस्थेतील एकूण भावनांबाबत अनिश्चितता निर्माण करणारे असतील. मात्र जीएसटी सुधारणा केवळ देशांतर्गत उपभोगाला चालना देतील इतकेच नाही तर त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ते ट्रम्प शुल्काच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीच्या परिणामांवर उताराही ठरतील.

## अमेरिकी टेक कंपनीकडून भारतात मोठी नोकरकपात

नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी

अमेरिकी तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनी ओरॅकलने भारतात नोकरकपातीस सुरुवात केली आहे, अशी माहिती सूत्रांनी मंगळवारी दिली. कृत्रिम प्रज्ञा अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजेंसमधील वाढत्या गुंतवणुकीमुळे जागतिक स्तरावर खर्च कमी करण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून हे पाऊल उचलण्यात आले असल्याचे बोलले जात आहे.

आतापर्यंत ओरॅकल क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर (ओसीआय) आणि ओरॅकल फायनान्शियल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर (ओएफएसएस) विभागांमध्ये कर्मचारी कपात झाली आहे. ज्याचा शेकडो कर्मचाऱ्यांवर परिणाम झाला आहे. कंपनीचे भारतात सुमारे ३०,००० कर्मचारी कार्यरत आहेत. गेल्या आठवड्यात, भारतातील ओरॅकल फायनान्शियल सर्व्हिसेस सॉफ्टवेअरमधील (ओएफएसएस) अनेक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले, असे या घडामोडींशी संबंधित सूत्रांनी सांगितले. प्रभावित कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांचा पूर्ण पगार, ओरॅकलमधील प्रत्येक वर्षाच्या सेवेसाठी एक महिन्याचा मूळ पगार आणि देय ग्रॅच्युइटी आणि रजा रोखीकरणाची रक्कम यासह समाविष्ट असलेले 'सीव्हेरन्स पॅकेज' देण्यात आले.एम४ किंवा मॅनेजर लेव्हल ४ ते आयसी१ किंवा वैयक्तिक योगदानकर्ता लेव्हल १ पर्यंतच्या सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले.

**खळबळ** | कंपनीचे शेअर्स १.७ टक्क्यांनी घसरले

## आयफोन १७ लाँच होताच ॲपलच्या गुंतवणूकदारांचे ५ लाख कोटी रुपयांचे नुकसान

नवी दिल्ली : दि.१० प्रतिनिधी



स्मार्टफोन क्षेत्रातील दिग्गज कंपनी ॲपलने काल, ९ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या बहुप्रतिक्षित 'अवे-ड्रॉपिंग' लाँच इव्हेंटमध्ये त्यांच्या नवीन आयफोन्सचे अनावरण केले. याचसोबत कंपनीने नवीन एअरपॉड्स प्रो ३ आणि ॲपल वॉच ११ देखील सादर केले आहेत. यावेळी कंपनीने आयफोन १७ सिरीजमधील चार मॉडेल्स सादर केले आहेत. यात आयफोन १७, आयफोन १७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्स आणि आयफोन १७ एअर यांचा समावेश आहे.

दरम्यान आयफोन १७ सिरीजसह आयफोन एअर, नवीन वॉच मॉडेल्स एअरपॉड्स प्रो ३ लाँच केल्यानंतर काही मनिटांतच अमेरिकन शेअर बाजारात ॲपलचे बाजारमूल्य ६०.५५ अब्ज डॉलर्स (५.३४ लाख कोटींहून अधिक रपुये) कमी झाले आहे. कंपनीचे शेअर्स सुमारे १.७ टक्के घसरून २३४ डॉलर्सवर आल्यामुळे कंपनीचे बाजारमूल्य ३.५३ ट्रिलियन डॉलर्सवरून सुमारे ३.४६ ट्रिलियन डॉलर्सवर आले. या वर्षी कंपनीच्या शेअर्समध्ये ६.५ पेक्षा जास्त घसरण झाली आहे.रम्यान कंपनीने यावेळी आयफोन १७ ला ६.३ इंचाचा मोठा डिस्प्ले दिला आहे. ॲपलने पहिल्यांदाच नॉन-प्रो आयफोनमध्ये प्रो-मोशन तंत्रज्ञान वापरले आहे. याचबरोबर ग्राहकांना पाच रंगाचे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत.याचबरोब, प्रो मॉडेल्स डिझाइनमध्ये बदल करण्यात आला आहे. याची बॉडी ॲल्युमिनियमची असणार असून, ज्यामुळे आयफोन १७ प्रोला आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी मिळाली आहे.

'आयफोन १७ प्रो आणि आयफोन १७ प्रो मॅक्स सादर करत आहोत, जे आतापर्यंतचे डिझाइन केलेले सर्वोत्तम आयफोन मॉडेल्स आहेत. फोनसाठी हीट-फोर्ज्ड ॲल्युमिनियम युनिबॉडी वापरली आहे. ज्यामुळे बॅटरीची क्षमता आणि टिकाऊपणा वाढणार आहे'', असे ॲपलने लाँचवेळी म्हटले आहे.या कार्यक्रमात कंपनीने ॲपल वॉच सिरीज ११ ही लाँचे केले. यामध्ये स्लीप ट्रैकिंग, हार्ट रेट, ब्रीदिंगसह आणखी नवीन आरोग्यविषयक वैशिष्ट्ये आहेत. वॉचमध्ये हायपरटेंशन किंवा उच्च रक्तदाब यांचा अंदाज घेण्यासाठी नवीन अल्गोरिदम असणार आहे. तसेच बॅटरी क्षमताही २४ तास चालेल इतकी आहे.

# १५ आक्षेपकर्ते अनुपस्थित, 'हद्दबदल' बाबत ६० सूचना

## प्रारुप प्रभाग रचनेच्या हरकतींवर सुनावणी पूर्ण, लवकरच अंतिम प्रक्रिया जाहीर होणार

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी

**नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर मगाविण्यात आलेल्या हरकती व सूचनांवर मंगळवारी महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात सुनावणी पूर्ण झाली.**



राज्याच्या नगरविकास विभागाने या सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केलेले महाराष्ट्र महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या समक्ष व नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत सुनावणी पूर्ण झाली. यावेळी 'हद्दबदल' बाबत ६०, मतदारयादी व विधानसभानिहाय प्रभाग रचना १६, व्याप्तीतील नावाबाबत २५, तर आरक्षणाबाबत ७ आक्षेप प्राप्त झाले होते.

**१५ आक्षेपकर्ते अनुपस्थित**

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना २३ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात आली होती. यावर गेल्या ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. एकूण ११५ आक्षेपकर्ते यांनी हरकती व सूचना दिल्या होत्या. सुनावणी दरम्यान यातील १५ आक्षेपकर्ते अनुपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उपायुक्त विजया बनकर, उपायुक्त मिलिंद मेश्राम, नगर रचना विभागाचे उप संचालक गिरीश गोडबोले, ऋतुराज जाधव, कार्यकारी अभियंता सुनील उईके, रितेश लोखंडे आदी उपस्थित होते. या हरकती व सूचनांचे चार गटामध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. यात प्रभागांच्या हद्दीबाबत आक्षेप, मतदार यादी व विधानसभा निहाय प्रभागरचना करण्याबाबत आक्षेप, व्याप्तीतील नावाबाबत हरकती व आरक्षणाबाबत हरकतींचा समावेश होता. यावेळी हरकत घेणाऱ्यांचे आक्षेप सविस्तरपणे नोंदविण्यात आले. सकाळी ११ वाजता सुनावणीला सुरुवात झाली आणि सायंकाळी ६.३० वाजता सुनावणी प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली. संपूर्ण सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मनपाचे सहायक आयुक्त श्याम कापसे, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, निवडणूक विभागाने अनंत नागमोते, आनंद वराडपांडे, सागर पवार, मकरंद सातपुते, किशोर मोगलेवार, जीवराज काळे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. प्रारुप प्रभाग रचनेवर आक्षेप घेतल्यानंतर सुनावणीसाठी बोलाविण्यात आलेल्या व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. (कंसातील आकडा प्रभाग क्रमांक) भावना संतोष लोणारे (२), ॲड. आकाश लालवानी (९), दीपक अरोरा (९), तुषार उर्फ सुबोध छाया मिलिंद साखरे (७), रविंद्र जनबंधू (६ व ७), कल्पना राजा द्रोणकर (७), दीपक रामदास खोब्रागडे (७), चेतन तरारे (७), शेखर पाटील (२), असलम खान मुल्ला (६), विद्यासागर त्रिपाठी (४), मोहन ठाकरे (४), आसिफ शेख (७), वामन पारवे व हेमंत नंदनवार (२०), रिजवान अन्सारी (८ व १९), अंकित अशोक नायक (१९), मोहम्मद वकील शाहीद (८), जावेद अख्तर शमीम अख्तर (८), अनुपकुमार शिवदासजी कठाणे (१९) , राशिद शेख ईस्त्राईल शेख (१९), शमीम भाहा (८), दीनानाथ खरबीकर (८ व १९), नवजीत सतीश सोनी (८), निशाद इंदुरकर (९), जितू नारनवरे (११), राजेश परतेकी (१३ व १४), सत्यम सोडगीर (१४ व १५), गजानन चकोले (३६ व १६), हितेश मुंदाफळे (३२), महेश बोरीकर (१७), अनिता संजय तिडके (३१), धीरज चव्हाण (१८), कृष्णाभाऊ एनप्रेडीवार (३७), किशोर पलांदूरकर (२० व २१), सुनील पडोळे (२२ व २७), उमाकांत महाजन बावनकर (२१), अनिल राजगिरे (२१ व ५), चंद्रशेखर पौनीकर (२२), दुनेश्वर पेठे (२३), अभिजीत वंजारी (२३,२६, २७ व २९), महेश ठाकरे (२३), जितेंद्र (बंटी) कुकडे (२६),प्रशांत ढोले सागर लाडेकर, नरेश शाहू, धनराज वडीचार, भावेश कुहीकर, (सर्व प्रभाग क्रमांक २६), विजय झलके (२८), प्रवीण बेलेकर (२६), प्रतीक बावनकर (२७), हेमंत पाडे (२६),राजेश अंबुलकर (२६), अविनाश कुंभलकर (१८ व २७), दीपक खोब्रागडे (६), नितीन वासनिक (९),प्रदीप सूर्यवंशी (१०), प्रमोद ठाकूर, प्रमोद सिंग ठाकूर (सर्व प्रभाग क्र. १०). यासोबतच इरफान काजी (१९), पारेंद्र पटले (३८), प्रकाश भोयर (३८), सिंधू रामाजी उईके (५), मंगेश सातपुते (५), निलेश बोरकर, कृष्णा खोपडे, सचिन माथाळे,(४),राजू कोटांगले (१), भावना संतोष लोणारे (२), राजेश नंदेश्वर (१), सतीश पाली (२), मंगेश सातपुते (२०), रामाजी उईके (५) , घनश्याम निखारे (५), मंसूर खान (३), मोहम्मद इरशाद गुलाम कादर शेख (६),सुधाकर लांजेवार (३), योगेश आमगे (३) याशिवाय संजय चावरे (५), जनहित मंच एज्युकेशन अँड सोशल वेल्फेयर सोसायटी (६), अनिकेत येरखेडे (२), दिलीप गौर (२), ॲड. मॅक्स बोधी (६), मोहम्मद इब्राहिम (६), वामन लांजेवार (५),नेताजी गजभिये (५), सुनील दांडेकर (३६), उत्तम शेवडे (३३), चंद्रकांत धांडे (३१), ज्ञानेश्वर ठाकरे (२१), अविनाश ठाकरे (३५), राजेंद्र सोनकुसरे, योगेश लांजेवार, राजेश्वर सिंह (१२), अभिजीत झा (१२), रिझवान रुमवी (१२), युगलकिशोर विदावत (१२) व तीर्थराज नेताम (१२ व १४) यांचा समावेश होता.

## महत्वाचे

### शस्त्र बाळगणारा अटकेत

**नागपूर:** कळमणा पोलिसांनी घातक शस्त्र बाळगणाऱ्याला अटक केली. ही कारवाई ९ सप्टेंबरच्या रात्री ९ वाजता करण्यात आली
कळमणा ठाण्याचे तपास पथक गांधीबाग परिसरात गस्त घालत असताना गुलशन नगर येथील बोगद्याजवळ काळ्या रंगाचा शर्ट घातलेला इसम शस्त्रासह गोंधळ घालत असल्याची माहिती मिळाली त्यावरून घटनास्थळ गाठले असता सदर इसमाने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेत चाकू जप्त करण्यात आला. चौकशीत अरमान कैसर अली शेख (परवेझ नगर) असे आरोपीचे नाव पुढे आले कारवाईत त्याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४/२५, सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दोन लाखांची चोरी

**नागपूर :** घरात कुणी नसताना अज्ञाताने कपाटातून ७० ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेले. ही घटना मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. तक्रारदार प्रीती सतीश मसराम (बैरामजी टाउन, आदिवासी नगर सदर) ९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता घराला कुलूप न लावता जवळच्या हनुमान मंदिरात पूजा करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी अज्ञात चोराने उघड्या दारातून घरात प्रवेश करून बेडरूममधील कपाटातून ७० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (अंदाजे २ लाख ८० हजार) चोरून नेले. सदर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३८० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### इसमाचा अकस्मात मृत्यू

**नागपूर:** सक्करदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनोळखी इसमाचा अकस्मात मृत्यू झाला. माहितीनुसार, सक्करदरा ठाण्याच्या हद्दीत ९ सप्टेंबर दुपारी २.१५ वाजता मोठा ताजबाग, शाही मशीद गेट क्र. तीनजवळ अंदाजे ५५ वर्षे वयाचा अज्ञात व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला उपचारासाठी मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. हा व्यक्ती परिसरात नेहमीच बेवारस स्थितीत फिरत असल्याचे सांगण्यात आले. तक्रारदार गुलाम मोहम्मद कासम शेख यांनी दिलेल्या सूचनेवरून पोलिस उपनिरीक्षक बनकर यांनी सक्करदरा ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

### 'पौर्णिमा दिना' निमित्त जनजागृती

**नागपूर:** महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजिल फाउंडेशनच्या वतीने मंगळवारी 'पौर्णिमा दिनानिमित्त' पंचशील चौक येथे रात्री उर्जा बचतीच्या संदर्भात जनजागृती करण्यात आली. माजी आमदार प्रा.अनिल सोले यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या अभियानाला व्यापारी आणि नागरिकांनी उदंड प्रतिसाद दर्शवित आहेत. 'स्वच्छ भारत नागपूर'चे ब्रँड अँबेसिडर व ग्रीन व्हिजिल फाउंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, मेहुल कोसुरकर, बिष्णुदेव यादव, प्रिया यादव, श्रीया जोगे,पार्थ जुमडे, पिनाकी बानिक,सुरभी जयस्वाल, शीतल चौधरी यांचा सहभाग होता. पंचशील चौक परिसरातील व्यावसायिक, दुकानदार, नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या अभियानात स्थानिक नागरिकांनी देखील मनपाला सहकार्य केले.

# अजनी,पोलिसांकडून 'कॉम्बिंग ऑपरेशन'

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्या गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी गुन्हे शाखा आणि अजनी पोलिसांनी संयुक्तपणे 'कॉम्बिंग ऑपरेशन' राबवले. अजनी ठाण्याच्या हद्दीतील रामेश्वरी, राहाटेनगर टोली याठिकाणी धडक मोहीम राबवण्यात आली.

सूत्रांनुसार, पोलिसांची ही विशेष मोहीम ९ सप्टेंबरच्या रात्री ८ वाजतापासून ते १० सप्टेंबरच्या पहाटे १ वाजेपर्यंत चालले. अवैध दारूविक्री, शस्त्रे, अंमली पदार्थ बाळगण्यासह विक्रेते, जुगार खेळणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय पाहिजे आरोपी, फरार आरोपी, सराईत घरफोडी करणारे, वाहन चोरी करणारे,शरीराविरुद्ध गुन्हे करणारे गुन्हेगार यांना तपासण्यात आले आणि त्यांचा अभिलेख अद्ययावत करण्यात आला.

**राहत्या ठिकाणी तपासणी**

एकूण २७ गुन्हेगारांची त्यांच्या राहत्या ठिकाणी तपासणी करण्यात आली यात पाहिजे आरोपी, फरार आरोपी, सराईत घरफोडी करणारे, अवैध दारू विक्री करणारे, वाहन चोरी करणारे, एम.पी.डी.ए. रिलीझ आणि शरीराविरुद्ध गुन्हे करणारे सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगार होते. ही धडक मोहीम वसंत परदेशी, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर, राहुल माकणीकर, पोलिस उप आयुक्त (डिटेक्शन), अभिजीत पाटील, सहा. पोलिस आयुक्त (गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत गुन्हे शाखातील पथके आणि अजनी ठाण्यातील एकूण २० अधिकारी व ५० अंमलदार यांनी संयुक्त सहभाग घेतला.

# कृषी समृद्धी योजना प्रभावीपणे राबवा

## जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांचे आवाहन

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी



वातावरणातील सततच्या बदलांमुळे येणाऱ्या विविध आपत्तींना तसेच घटती उत्पादकता यांना तोंड देणे शक्य व्हावे याकरिता शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी 'कृषी समृद्धी' योजना शासनाने हाती घेतली आहे. ही योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यात यावी. या योजनेद्वारे शेतकऱ्यांचा शाश्वत विकास व्हावा,यासाठी भर दिला जाणार असून,यातून त्यांना अधिक सक्षम करता येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आज आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. सदर योजनेअंतर्गत उत्पादकता, शाश्वतता आणि उत्पन्न वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख कृषी गुंतवणूक क्षेत्रांना प्राधान्य दिले जाणार आहे. हवामान बदल, अनुकूल शेती पद्धतीस प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये सूक्ष्म सिंचन, हवामान अनुकूल बियाणे, पिकांचे वैविध्य, जमिनीची सुपीकता याशिवाय काटेकोर शेती, यंत्रसामुग्री सेवा, डिजिटल शेती, कृषि हवामान सल्ला सेवा, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी म्हणाले. निर्यात वृद्धीच्या दृष्टीने गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जाईल. जिल्हानिहाय खातेदार संख्या, योजनेची सुरळीत अंमलबजावणी आणि दीर्घकालीन अवलंब सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचारी आणि शेतकऱ्यांसाठी क्षमता बांधणीवर भर देण्यात येईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी व अंमलबजावणी करण्यात येईल. निर्यात वृद्धीसाठी गुंतवणुकीस प्रोत्साहन दिले जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी शिबीर

## मनस्विनी फाऊंडेशनतर्फे आयोजन



नागपूर ,दि. १० प्रतिनिधी

मनस्विनी फाऊंडेशनच्या वतीने हडस सीबीएसई शाळेत विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

दंत तपासणी उपक्रमाचा मुख्य उद्देश शालेय स्तरावरच दंत आरोग्याचे महत्त्व पटवून देणे असा होता. दात आणि हिरड्यांची काळजी लहानपणापासूनच गरजेचे आहे. अगदी वेळीच तपासणी केल्यास आणि जागरुकता राखल्यास दंतरोगांना केवळ प्रतिबंध होत नाही, तर मुलांमध्ये आयुष्यभर चांगल्या सवयी विकसित होतात. याआधारे हडस सीबीएसई शाळेत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात डॉ. खुशबू अग्रवाल, डॉ. श्रुती चौरागडे यांनी सुमारे १०० विद्यार्थ्यांची तपासणी केली. तसेच, मुलांना आवश्यक मार्गदर्शन व उपचारासाठीच्या सूचना देण्यात आल्या. शिबिरात नीलम बोवाडे, प्राजक्ता गंगाखेडकर, योगिता देशमुख, इंद्राणी रॉय चौधरी उपस्थित होत्या.

# १०० अंगणवाड्या 'स्मार्ट इंटेजिलंट' व्हाव्यात

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी



ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनेतून अनेक बदल सुरू आहेत. 'स्मार्ट इंटेलिजंट व्हिलेज' तयार होत आहेत. आपल्या जिल्ह्यात सातनवरी हे पहिले 'स्मार्ट इंटेलिजंट' गाव म्हणून नावारुपास आले आहे. या धर्तीवर सर्वच गावांनी बदलासाठी सिद्ध झाले पाहिजे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील किमान ५० ग्रामपंचायती सातनवरीसारख्या व्हायला पाहिजेत.

यासाठी विविध योजना, जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यासोबतच अंगणवाड्या अधिक दर्जेदार व्हाव्यात वडधामना येथील अंगणवाडी आदर्शवत आहे. किमान १०० अंगणवाड्या वडधामनासारख्या करण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. जिल्हा परिषदेमार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा आणि आदर्श ग्रामपंचायत अधिकारी व आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पावनगाव आणि खुर्सापार या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला.

वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार आशीष देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार टेकचंद सावरकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत) कपिलनाथ कलोडे यांच्यासह ग्रामसेवक, सरपंच, बचत गट प्रतिनिधी आदी उपस्थित होते. पुढील पाच वर्षांत अधिकाधिक खर्च हा शिक्षणावर खर्च होईल. सर्व पाणीपुरवठा योजना सुरळीत व्हाव्यात प्रत्येकाला पिण्याचे पाणी शुद्ध मिळावे. जिल्ह्यात अनेक कोल्हापुरी बंधारे नादुरुस्त असून, जलसंधारणवर काम करण्याची गरज आहे. नवीन बंधारे निर्मितीचा प्रस्ताव न पाठविता जुने बंधारे दुरुस्त करण्यात यावेत. पुढील १५ वर्षांचा जल पुर्नभरणाचा विचार होण्याची गरज असल्याचे पालकमंत्री बावनकुळे म्हणाले.

आमदार देशमुख यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिलनाथ कलोडे यांनी आभार मानले.

# रामटेक येथे किसान समृद्धी मेळावा, प्रदर्शनी

## मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, श्री श्री रविशंकर यांची उपस्थिती

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी



रामटेक शहरात येत्या १२ सप्टेंबरला भव्य शेतकरी समद्धी महोत्सव आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी महोत्सवाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अर्थ व कृषी राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत रामटेक येथील नेहरू मैदानात १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.४५ वाजता मेळाव्याचा शुभारंभ होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून परमपूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकर (संस्थापक, आर्ट ऑफ लिव्हिंग) यांची उपस्थिती राहणार आहेमहोत्सवाला २५ हजार लोकांची उपस्थिती अपेक्षित असून, सभामंडप उभारणीच्या कामाला वेग आलेला आहे. कृषी मेळाव्यासह प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. सेंद्रीय शेती उत्पादने, विविध पशुधन, गोविज्ञान व अनुसंधान केंद्र देवलापार, माती परीक्षण, कृषी यांत्रिकीकरण व विविध उपकरणे, पीएमएफएम योजनेअंतर्गत निर्मित कृषी उत्पादने याविषयांच्या स्टॉल्सवरून शेतकऱ्यांना अत्याधुनिक माहिती मिळणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण ११७ देशांत श्री श्री रविशंकरजी यांच्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या माध्यमातून होणार आहे. रामटेकच्या पावनभूमीत श्री श्री रविशंकरजी यांचे आगमन ही रामटेक व परिसरासाठी अतिशय आनंदाची बाब असून, याचे साक्षीदार होण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राज्यमंत्री जयस्वाल यांनी केले आहे.

## रक्तदान उपक्रम... नागपुरातील ७० मंडळांचा पुढाकार

# गणेशोत्सवात २००२ युनिट रक्त संकलन

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी

**महानगरपालिकाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत मनपा आरोग्य विभागाने केलेल्या आवाहनाला शहरातील ७० गणेशोत्सव मंडळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याशिवाय मंगळवारी झोनअंतर्गत ईदनिमित्त रक्तदान करण्यात आले.**



मनपा मुख्यालयासह सर्व सार्वजनिक मंडळांमधील शिबिरांमधून एकूण २००२ युनिट रक्त संकलित करण्यात आले आहे.

मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांच्या नेतृत्वात झोन स्तरावर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून मनपा पॅनलमधील रक्तपेढी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, डागा येथील रक्तपेढी आणि शहरातील इतर खासगी रक्तपेढीच्या सहकार्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये शिबिर राबविण्यात आले.

दरम्यान, गणेशोत्सव मंडळांमधील रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंगळवारी झोनमधील गणेशोत्सव मंडळांमध्ये तसेच ईदनिमित्त देखील आयोजित आठ शिबिरांमधून सर्वाधिक १००८ युनिट रक्त संकलित करण्यात आले. या कामगिरीबद्दल झोनचे झोनल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अतिक उर रहमान खान व त्यांच्या नेतृत्वातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांनी मंडळांचे अभिनंदन केले असून, आभार देखील मानले आहे.

# नागपूर शहरासाठी 'हेल्दी स्ट्रीट्स पॉलिसी'

नागपूर ,दि. १० प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिका आणि आयटीडीपी (इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलिसी) यांच्या वतीने शहरातील रस्त्यांना अधिक सुरक्षित, हिरवे आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी शहराची पहिले 'हेल्दी स्ट्रीट्स' धोरण तयार करण्यात येत आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात नागरिकांच्या सोयीकरिता विविध उपाय योजना राबविल्या जात आहेत. याचाच एक भाग म्हणून सदर धोरण तयार होत आहे. पदपथ,सुरक्षित सायकलसाठी सुविधा, सुरक्षित चौक आणि चालणे, सायकलने प्रवास करणे व सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देणारे रस्ते विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. मागील काही खाजगी वाहनांची संख्या अधिक वाढल्यामुळे शहर अधिक सुरक्षित करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग बांधवांना हे सोयीस्कर होणार आहे.मुख्य रस्त्यांवर वाहने अनेक वेळा ५० किमी/तास पेक्षा जास्त वेगाने चालतात. हे धोरण अशा सर्व वापरकर्त्यांसाठी सुरक्षित, सर्वसमावेशक आणि कार्यक्षम रस्त्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 12th NEET /JEE /MHT- CET STATE BOARD
8th, 9th, 10th STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,
Mrs. Anjali mam 9404845492

## महत्त्वाचे

### खून प्रकरणात रणजित वाघ दोषी

**अकोला :** सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाजलेल्या खून प्रकरणात जिल्हा न्यायाधीश २ अकोला श्रीमती पहाडे यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी रणजित वाघ यास दोषी ठरवण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा क्रमांक ५१९/२०१८ अंतर्गत भा. दं. सं. कलम ३०२ (खून), ४५२ (घरात घुसखोरी), ४५० (गंभीर घरफोडी) व ५०६ (धमकी) या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात दीर्घकाळ चाललेल्या साक्षी व पुराव्यांनंतर न्यायालयाने आज बुधवारी आरोपी रणजित वाघ याला दोषी ठरवले. येत्या १२ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षा सुनावण्यात येणार असून सर्वांचे लक्ष या शिक्षेकडे लागले आहे. या खटल्यात सरकारी बाजूचे काम ॲड. गिरीश देशपांडे यांनी प्रभावीपणे मांडले. तर तपास सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याकडून करण्यात आला होता.

### नागरिकांच्या मागणीवरून आज शिबीर

**अकोला :** महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पाणीपट्टी कर भरणे तसेच बिला संदर्भातील काही तक्रार असल्यास त्याचे निराकरण करणे अधिक सोईचे व्हावे. याकरिता मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशावरून दक्षिण झोन अंतर्गत बुधवार, १० सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत सिंधी कॅम्प येथे एक दिवसीय शिबीराचे (कॅम्प) आयोजन करण्यात आले होते. नागरिकांच्या मागणीनुसार उद्या, गुरुवारी त्याच ठिकाणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

### शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणी प्रमाणपत्र वितरणाचे आदेश

**अकोला :** एनसीईआरटी द्वारा राज्यातील शिक्षकांना २ ते १२ जून २०२५ दरम्यान वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर शिक्षकांकडून ४० दिवसाचे गृहकार्य पूर्ण करून घेण्यात आले मात्र, प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र त्यांना देण्यास कुचराई करण्यात आली. परिणामी सदर शिक्षक श्रेणी सुधारणा लाभ घेण्यापासून वंचित होते. शिक्षकांना प्रमाणपत्र वितरित करण्याची मागणी विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे यांनी शिक्षण आयुक्त व संचालक यांच्याकडे केली होती. प्रमाणपत्र वितरित करण्याचे आदेश दि.१० सप्टे २०२५ ला सहसंचालक यांच्या डिजिटल स्वाक्षरीसह निर्गमित करण्यात आले आहेत.

# शेतकरी- बेरोजगारांच्या प्रश्नांवर अकोल्यात जनआंदोलन - प्रदेशाध्यक्ष आ.शिंदे

## सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांवर दबावतंत्र

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** राज्यात सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांवर दबावतंत्राचा वापर सुरु आहे. अतिवृष्टीमुळे शेतकरी तर बरोजगारीमुळे तरुण हतबल झालेला आहे. त्याचप्रमाणे अकोला जिल्ह्यात मे महिन्यापासून पाऊस सुरु आहे. पेरणीनंतर अतिवृष्टी झाली. मात्र भरीव मदत अद्यापही शेतकऱ्यांना मिळाली नाही, रिक्त पदाचा मोठा अनुशेष आहे .त्यामुळे दिवाळीच्या सुमारास अकोल्यात शेतकरी व बेरोजगारांच्या प्रश्नांवर जनआंदोलन उभारणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.शशीकांत शिंदे यांनी दिली. ते. शासकीय विश्रामगृह येथे बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर आ.शशिकांत शिंदे पहिल्यांदाच अकोल्यात दौऱ्यावर आले होते. कार्यकर्त्यांचा मेळावा आटोपल्यावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यांच्या समवेत माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, गुलाबराव गावंडे, डॉ.संतोष कोरपे, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, पंकज गावंडे, बुढण गाडेकर आदी उपस्थित होते. यावेळी आ.शिंदे पुढे म्हणाले की, अकोल्यातील पक्ष पदाधिकाऱ्यांशी संवाद साधल्यानंतर येथील सत्ताधारी पक्षावर जनतेच्या मनात रोष असल्याचे लक्षात आले. सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल पूर्ण क्षमतेने अद्याप सुरू झाले नाही. सोयाबीन कापूस उत्पादक शेतकरी कायम अडचणीत असून भावा सोबतच झालेल्या नुकसानीचा परतावा देखील योग्य मिळत नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे आगामी काळात जनआंदोलन उभारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच जनसुरक्षा विधेयकाचा विरोध म्हणून आज संपूर्ण राज्यभर आंदोलन उभारले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. त्याशिवाय राज्य शासनाने कामगारांच्या कामाचे बारा तास केल्याचा निर्णय हा दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले तसेच राज्यातील सनदी अधिकारी हे दडपणाखाली काम करत असल्याचा आरोप देखील त्यांनी सरकारवर केला. गेल्या अधिवेशनात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती मात्र अद्याप सरकारने त्याकडे लक्ष दिले नसून १५ सप्टेंबर रोजी महाविकास आघाडीच्या नाशिक येथील मोर्चात सरकारला जाब विचारणार असल्याचे ते म्हणाले.

### सत्ताधाऱ्यांवर जनता नाराज

अकोल्यातील जनता सत्ताधाऱ्यांवर नाराज आहे. आज झालेल्या आढावा बैठकीत महिला वर्गाने केलेले आरोप त्यांच्यावरील नाराजी सिधद करणारे आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत जनताच सत्ताधाऱ्यांना धडा शिकवेल असे आ.शिंदे म्हणाले. आगामी निवडणुंकासाठी अध्याप महाविकास आघाडीत चर्चा झाली नसल्याचे त्यांनी सांगीतले.

### तर बेरोजगारी वाढेल

नविन कामगार कायद्यात बारा तासाचे नियोजन करणयात आले आहे. यामुळे कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होणार असून बेरोजगारीत देखील वाढ होणार आहे. त्यामुळे या कायद्याला आमचा विरोध आहे. याबाबत आम्ही मुखयमंत्र्यासोबत चर्चा करु अन्यथा कामगारांना घेवून जनआंदोलन उभारु.

# घरगुती वादातून इसमाची निर्घृण हत्या

## पातूर तालुक्यातील अंबाशी येथील घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. १० :** घरगुती वादातून एकाच निर्घृणपणे खून करण्यात आल्याची घटना पातूर तालुक्यातील ग्राम अंबाशी येथे घडल्याने परिसरात खळबळ उडाली. प्राप्त माहितीनुसार पातूर तालुक्यातील ग्राम अंबाशी येथे आज दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी घरगुती वादाचे हाणामारीत रूपांतर होऊन एकाचा खून झाला आहे. घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की अंबाशी येथील रहिवासी असलेल्या छाया हिवराळे हिचा विवाह अकोला तालुक्यातील कानशिवणी येथील रहिवासी असलेल्या नागेश पायरुजी गोपणारायण (वय ४० वर्ष) याच्याशी झाला असून सद्यस्थितीत तो पातूर तालुक्यातील असोला फाटा येथे राहत असून पतीचे माहेर असलेल्या अंबाशी येथील घरी आला असता नागेश व त्याच्या सासुरवाडीतील मंडळींमध्ये घरगुती वाद झाले असून वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असता नागेश पायरुजी गोपणारायण याचा काठ्या,चाकू व कुऱ्हाडीचे वार करून खून करण्यात आला. दरम्यान पातूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार हनुमंत डोपेवाड, चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे,पोहेकॉ. तारासिंग राठोड,वसंत राठोड, वसीमोद्दीन शेख, शंकर बोरकर, अनिता, वसीम शेख, अनिल ठाकरे, अकरम पठाण यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना करिता सर्वोपचार रुग्णालय अकोला येथे पाठविला असून पुढील तपास पातूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार हनुमंत डोपेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पातूर पोलीस करीत आहेत.

# १५० किलो गोमांस जप्त, दोघांना अटक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** ऑपरेशन प्रहार अंतर्गत बोरगाव मंजू पोलिसांनी कसाबपुरा परिसरात केलेल्या कारवाईतून कत्तलीसाठी बांधून ठेवलेले दोन बैल आणि तब्बल १५० किलो गोमांस जप्त केले. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून जवळपास ९५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून कसाबपुरा येथील ठिकाणी छापा टाकण्यात आला. या छाप्यात आरोपी अब्दुल रहीम शेख छन्नु (४२) व मोहम्मद शोएब अब्दुल शहीद (२४) दोन्ही रा. कसाबपुरा, बोरगाव मंजू) यांच्या ताब्यातून दोन गोवंश जातीचे बैल, १५० किलो गोमांस, दोन सुरे व एक कुऱ्हाड असा एकूण ९५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या जनावरांमध्ये पांढऱ्या रंगाचा मोठ्या शिंगांचा, आठ वर्षांचा बैल (किंमत सुमारे ३० हजार रुपये) आणि कथीया रंगाचा कानावर बिल्ला असलेला आठ वर्षांचा बैल (किंमत सुमारे ३५ हजार रुपये) यांचा समावेश आहे. याशिवाय आठ पोत्यांमध्ये भरलेले अंदाजे १५० किलो गोमांस (किंमत ३० हजार रुपये) देखील मिळून आले. या प्रकरणी पोउपनि रविंद्र धुळे यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात अप.क्र. २९३/२०२५ कलम ५, ५(अ), ५(३), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सह प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम व भारतीय दंड संहितेतील कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी.सी. रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पो.नि. अनिल गोपाळ, पोउपनि रविंद्र धुळे, पोउपनि मनोज उघडे, पोहेकॉ प्रमोद गोपनारायण, पो. कॉ. अनिल अंबिलकर, पो.कॉ. जुनेद जट्टावाले, पो.कॉ. अक्षय देशमुख, पो.कॉ. सुदिप राऊत, पो.कॉ. विष्णु साखरे, मपोका पुजा भोकरे व मपोका अश्विनी मनोहर यांनी सहभाग घेतला.

# कचरा संकलनाचा ठेका की उधळपट्टी!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १० :** शहरात कचरा संकलनाचा ठेका दिल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कंपनीने १ सप्टेंबरपासून काम सुरू केले असले, तरी पहिल्याच आठवड्यात गोंधळ आणि अव्यवस्था दिसून येत आहे. कंपनीचे काम संथगतीने सुरू असल्यामुळे शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

गल्लीबोळांबरोबरच कौलखेड, जुना आरटीओ रोड, सिंधी कॅम्प यासारख्या मार्गावरही कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत.

महापालिकेने कचरा उचलण्याचा ठेका दिला असून यावर खर्च दुपटीने वाढला आहे. ठेकेदाराला काम दिल्यापासून शहरातील कचऱ्याची समस्या वाढली आहे. नियमित घंटागाडी येत नसल्याने उघड्यावर कचरा टाकला जात आहे. यापूर्वी महापालिका स्वतः कचरा संकलनावर १२ लाख रुपये खर्च करीत होती. आता ठेकेदाराला २७ लाख ५५ हजार रुपये द्यावे लागणार आहेत. डोअर टू डोअर कचरा उचलण्याचे काम महापालिकेने नागपूर येथील अर्बन एनवायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड यांना दिले असून १ सप्टेंबरपासून ठेकेदार कचरा उचलत आहे. महापालिकेच्या १०० घंटागाड्या ठेकेदाराला सोपविण्यात आल्या आहेत. ठेकेदाराला दीड लाख घरातून १४० मेट्रिक टन कचरा उचलण्याचे दैनंदिन टार्गेट असून १० दिवसात झालेली अवस्था पाहता सर्वत्र कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. महापालिकेला कचरा उचलण्यासाठी महिन्याकाठी १२ लाख रुपये खर्च येत होता. याच कामासाठी महापालिकेला आता २७ लाख ५५ हजार रुपये खर्च करावा लागणार आहे. हा खर्च दुपटीने वाढला असून कचऱ्याची समस्या जैसे थे असल्याचे चित्र दिसून येत आहे. उलट आता कचऱ्याचे अधिक ढीग दिसून येत आहेत.

### ठेकेदाराचे खिसे भरण्याचे काम

१०० वाहने महापालिकेची असून केवळ ५० वाहने ठेकेदाराची राहणार आहेत. हे कमी म्हणून की काय वरून महापालिकाच महिन्याला २७ लाख रुपये ठेकेदाराला देणार आहे. कुणाच्या सांगण्यावरून आयुक्त यांनी हा निर्णय घेतला असा सवाल उपस्थित होत आहे.

# सराफा दुकानातून महिलांनी केली सोन्याची चोरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १० :** शहरातील जुना कपडा बाजार परिसरातील पटवी ज्वेलर्स या सराफा दुकानात सोन्याची चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तीन अज्ञात महिलांनी आभूषण बघण्याच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून सोन्याचे दागिने चोरले. हा संपूर्ण प्रकार दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, पोलिसांनी चोरट्या महिलांना अवघ्या काही तासांत ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी तिन्ही महिला ग्राहक असल्याचे भासवून पटवी ज्वेलर्समध्ये आल्या. त्यांनी दुकानदाराला विविध प्रकारचे दागिने दाखविण्याची मागणी केली. दागिने पाहण्याच्या दरम्यानच महिलांनी दुकानदाराचे लक्ष विचलित करून सोन्याचे दागिने चोरून नेले. काही वेळानंतर दुकानदाराला चोरीची शंका आली आणि त्याने तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेजमध्ये तिन्ही महिला दागिने चोरतानाचे स्पष्ट दृश्य आढळले. घटनेची माहिती त्वरित पोलिसांना देण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज च्या आधारे शोधमोहीम राबवून तिन्ही महिलांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना सिटी कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून पुढील तपासणी पोलीस निरीक्षक व कर्मचारी करीत आहेत.या कारवाईमुळे शहरातील सराफा व्यापाऱ्यांनी पोलिसांचे कौतुक केले असून, अशा घटना रोखण्यासाठी दुकानदारांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. सीसीटीव्हीमुळे पुन्हा एकदा उघड झाले की, गुन्हेगार कितीही शक्कल लढवली तरी पोलिसांच्या नजरेतून सुटणे अशक्य आहे.

# औद्योगिक अडचणी सोडविण्यास प्राधान्य: जिल्हाधिकारी

**अकोला :** अकोल्यातील औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमण, सुरक्षिततेच्या समस्या आणि इतर अडचणी तातडीने सोडविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, उद्योग व रोजगार वृद्धीसाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिली. जिल्हाधिकारी मीना यांनी आज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसरातील विविध उद्योगांची पाहणी केली. यानंतर अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सभागृहात आयोजित बैठकीत त्याा बोलत होत्या. या वेळी संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, सचिव नितीन बियाणी, उद्योग सहसंचालक नीलेश निकम, उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बन्सोड, भागवत अनवणे, प्रसन्न रतपारखी, नवीन कृपलानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## कृषी — तेलबिया संशोधन विभागाचा स्तुत्य उपक्रम!

# खरीप पिकांमधील किड-रोग व्यवस्थापन विषयावर शेतकरी - शास्त्रज्ञ संवाद!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १० :** बार्शीटाकळी तालुक्यातील मौजे जलालाबाद येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत तेलबिया संशोधन विभागाच्या वतीने नुकताच शेतकरी - शास्त्रज्ञ संवाद आयोजित करण्यात आला. खरीप हंगामात उद्भवणाऱ्या किड व रोग व्यवस्थापन यासोबतच पिकांचे परिपूर्ण नियोजन कसे करावे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमाचे मार्गदर्शन वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ डॉ. संतोष गहुकर यांनी केले. कार्यक्रमात विशेषतः सोयाबीन, तूर व कापूस पिकांवरील किड-रोग व्यवस्थापन, तसेच सोयाबीनच्या शेंगा परिपक्व होताना घ्यावयाची काळजी यावर शेतकरी बांधवांसोबत चर्चा करण्यात आली.

शेतकरी - शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून विद्यापीठाचे शास्त्रज्ञ प्रत्येक महिन्याला थेट शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन मार्गदर्शन करतात, तर काही शेतकरी स्वतः विद्यापीठात येऊन तज्ज्ञांचे ज्ञान ग्रहण करतात. त्यामुळे हे व्यासपीठ शेतकऱ्यांचे खरे हक्काचे ज्ञानमंच ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

कार्यक्रमात डॉ. प्रशांत माने (कीटकशास्त्रज्ञ) यांनी सोयाबीन व तूर पिकांवरील कीड व्यवस्थापन, डॉ. मंजुषा गायकवाड (वनस्पती रोग शास्त्रज्ञ) यांनी रोग व्यवस्थापन तर डॉ. भरत फरकाडे (कृषी विद्यावेत्ता) यांनी खत व्यवस्थापन या विषयावर प्रत्याक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन केले. या सभेला जलालाबाद येथील निवृत्ती केशवराव थोरात, शंकर ठाकरे, महादेव ठाकरे, अभिमान जाधव, गोविंदा थोरात तसेच वाघजई येथील दिनेश शेंडे, सुरेश शेंडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक व १२ तास कामाचा निर्णय रद्द करा - भाकप-आयटकची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १० :** राज्य सरकारने पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर केलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटनाविरोधी व लोकशाहीस बाधक असून, संविधानिक अधिकारांवर गदा आणणारे आहे. त्यामुळे हे विधेयक तत्काळ मागे घ्यावे, तसेच कामगारांच्या ८ तासांच्या कामाच्या वेळेऐवजी १२ तास काम करण्याचा निर्णय रद्द करावा, या दोन प्रमुख मागण्यांसाठी दिनांक १० सप्टेंबर रोजी भाकप-आयटकतर्फे राजेश्वर मंदिर मागील रस्त्यावर जोरदार निदर्शने करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदनाद्वारे राज्यपाल व मुख्यमंत्री यांना या मागण्यांचे निवेदन पाठवण्यात आले. या विधेयकाविरोधात राज्यभरातून तब्बल १३ हजार हरकती दाखल झाल्या असून, त्यापैकी ९,५०० हरकती कायदा रद्द करण्याच्या बाजूने आहेत. तरीही सरकारने या हरकतींची दखल न घेता कायदा मंजूर केला. हा कायदा नक्षलवाद रोखण्यासाठी नसून, सरकारवर टीका करणाऱ्या सामाजिक संघटना, कार्यकर्ते, पत्रकार, यूट्यूबर्स, शेतकरी व कामगारांना गप्प करण्यासाठी असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

कामगारांच्या १२ तास कामाच्या निर्णयामुळे कामगारांचे आरोग्य धोक्यात येईल तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होईल. ८ तास कामाच्या वेळेसाठी जगभरात झालेल्या ऐतिहासिक चळवळींचा अपमान हा निर्णय करीत असल्याचे भाकप-आयटकने म्हटले.

आंदोलनात कॉम्रेड नयन गायकवाड, कॉम्रेड रमेश गायकवाड, कॉम्रेड सुरेखा ठोसर, ज्योती ताथोड, मायावती बोरकर यांच्यासह महिला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आंदोलनकर्त्यांनी जनसुरक्षा विधेयक रद्द करा, १२ तास कामाचा निर्णय मागे घ्या अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला.

## महत्त्वाचे

### तामशी येथे शिक्षक दिन साजरा!



**बाळापूर** : ०६ सप्टें रोजी जि प शाळा तामशी येथे मोठ्या हर्षउलासात विद्यार्थ्यांनी एक दिवस गुरुजी होउन आपल्याच वर्गातिल मुलाना शिकवीतान आनंद व्यक्त केला तर शिक्षकानी सुद्धा विद्यार्थ्यांचा आनंद दुगूनी केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक वागणूक देणारे डॉ. राधाकृष्ण सर्वपल्ली याना यावेळेस खऱ्या अर्थाने आदरांजली देण्याचे काम शाळेतिल शिक्षक करीत आहेत सर्वप्रथम शाळे मध्ये डॉ. सर्वपल्ली यांच्या फोटोला हार अर्पन करून पुजा करण्यात आली नंतर काही विद्यार्थ्याने सर्वपल्ली यांच्या जिवनावर भाषाने केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्र प्रमुख माधव काळे हे होते आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक गजानन चिंचोलकर केशव घाटोळ किशोर श्रीनाथ बहादुरकर कविता ठेंबरे या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केशव घाटोड यांनी केले तर आभार ठोसर यांनीमानले.

## निधन वार्ता

### संतोष भुते



**दानापूर** : येथील प्रतिष्ठित नागरीक संतोष नामदेव भुते यांचे वडील नामदेव तुकाराम भुते यांचे दि. ०९/०९/२०२५ रोजी रात्री ९.३० वा वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन भाऊ, दोन बहिणी, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### दारकाबाई दुतोंडे



**दानापूर** : येथील सुरेश सोनाजी दुतोंडे यांची आई ग. भा. दारकाबाई सोनाजी दुतोंडे यांचे दि.१०/०९/२०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असा आप्त परिवार आहे.

# मार्केटचा राजा मोरया गणेशोत्सव मंडळाचा आदर्श

## कर्कश ध्वनी मुक्त : बाप्पाच्या मिरवणुकीने वेधले लक्ष!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**मानोरा, दि. १० :** डीजेचा दणदणाट आणि लेझर लाईट्सचा झगमगाट बाजूला ठेवून, मानोराच्या मार्केटचा राजा मोरया गणेशोत्सव मंडळाने यावर्षी पारंपरिकतेचा आणि पर्यावरणाचा आदर्श घालून दिला आहे. मंडळाने मातीची इको-फ्रेंडली गणेशमूर्ती स्थापन केली होती, तर विसर्जन मिरवणुकीत ताल-मृदंगाचा जयघोष, पावली, रिंगण आणि अश्व असे पारंपरिक खेळ सादर करून एक वेगळीच छाप पाडली. या अनोख्या उपक्रमामुळे पोलीस प्रशासनानेही मंडळाचे कौतुक करत सत्कार केला.

पर्यावरणाचा संदेश देणारी मूर्ती आणि सजावट यंदा मार्केटचा राजाने पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन शाडूच्या मातीची गणेशमूर्ती तयार केली होती. ही मूर्ती केवळ नैसर्गिक घटकांपासून बनलेली नव्हती, तर तिला आकर्षक रूप देऊन वारीची सुंदर थीम साकारण्यात आली होती. यामुळे बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला पर्यावरण संरक्षणाचा संदेश मिळत होता. देखाव्यातील साधेपणा आणि पारंपरिकता याची सर्वांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

डीजेमुक्त मिरवणूक आणि पारंपरिक पावली आजच्या काळात विसर्जन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट आणि लेझर लाईट्सची रोषणाई ही नित्याची बाब बनली आहे. मात्र मार्केटचा राजा मंडळाने यापासून पूर्णपणे फारकत घेतली. डीजेच्या कर्कश आवाजाला फाटा देत, मंडळाने हरिनामाचा गजर करत, पारंपरिक हरिपाठ मंडळ घेऊन विसर्जन मिरवणूक काढली. या मिरवणुकीत ताल-मृदंगाचा जयघोष, उत्साही पावली, अश्व आणि फुगड्यांचा फेर पाहून उपस्थित नागरिक आणि पोलीस प्रशासनही मंत्रमुग्ध झाले. हा पारंपरिकतेचा जागर पाहून अनेकांनी मंडळाच्या या सकारात्मक भूमिकेचे कौतुक केले.

### पोलीस प्रशासनाकडून गौरव

मंडळाच्या या अनोख्या आणि आदर्शवत उपक्रमाची दखल पोलीस प्रशासनानेही घेतली. विसर्जन सोहळ्यावेळी पोलिसांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार केला. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी, ''इतर मंडळांनीही मार्केटचा राजा मंडळाचा आदर्श घेऊन पारंपरिक आणि पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा,'' असे आवाहन केले. मंडळाच्या या उपक्रमाने समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे, ज्यामुळे भविष्यात अनेक मंडळे अशा सकारात्मक बदलाची सुरुवात करतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### इतर मंडळांना प्रेरणा

मार्केटचा राजा मंडळाने केवळ उत्सव साजरा केला नाही, तर तो एका सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून साजरा केला. पर्यावरणाची काळजी घेणे आणि आपली संस्कृती जपण्याचे महत्त्व त्यांनी कृतीतून दाखवून दिले. त्यांचे हे पाऊल निश्चितच इतर मंडळांना अशा विधायक कार्याची प्रेरणा देईल आणि गणेशोत्सव खऱ्या अर्थाने सामाजिक एकोप्याचा आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचा उत्सव बनेल अशी अपेक्षा आहे.

## तेल्हारा तालुक्यामध्ये सेवा पंधरवडा होणार साजरा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**तेल्हारा, दि. १० :** महसूल व वन विभागाचे शासन निर्णयान्वये अकोला मा. जिल्हाधिकारी वर्षा मीना, व अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांचे जन्मदिन दि, १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि, २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीमध्ये तेल्हारा तालुक्यात सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे, पंधरवाड्यात पहिल्या टप्प्यामध्ये दि, १७ ते २२ सप्टेंबर पर्यंत पांदणरस्ते, ग्रामीण भागात जाण्याचे गाडी मार्ग व पायमार्ग शेतावर जाण्याचे मार्ग यारस्त्याचे सिमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देणे बाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेल्या दि. २९ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

तेल्हारा तालुक्यातील सर्व १०८ गावांमध्ये या अभियान अंतर्गत तेल्हारा तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्राम महसूल अधिकारी, ग्राम सेवक, महसूल सेवक व त्यागावचे पोलीस पाटील यांच्या मदतीने स्थानिक नागरिकासह गाव नकाशावर उपलब्ध असलेले वापरात असलेले परंतु गाव नकाशावर नसलेले तसेच शिवरस्ते अशा सर्व प्रकारच्या रस्त्याची दि. १० सप्टेंबर २०२५ पासून पाहणी करून नोंदणी करण्यासाठी शिवार फेरी आयोजित करण्यात आलेली आहे.सदर यादी तयार झाल्यानंतर गावनिहाय तयार करण्यात आलेली रस्त्याची प्राथमिक यादी दि. १५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये सर्व ग्रामस्थांच्या माहितीसाठी व ग्राम सभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल, सभेच्या मान्यतेनंतर अंतिम झालेल्यानुसार भूमी अभिलेख विभागामार्फत सीमांकन करून अतिक्रमण असल्यास ते निष्कासित करून प्रत्येक रस्त्याला विशिष्ट सांकेताक कोड देण्यात येईल त्याच्या नोंदी सातबारा निस्तारपत्रक वाजिबउल अर्ज, गाव नमुना नंबर, १ (फ) मध्ये घेण्यात येतील. तरी तेल्हारा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या अभियानामध्ये शिवार फेरी मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## अमिनपुर येथे तलाठी पोहचले शेतकऱ्यांच्या बांधावर

### पंचनाम्यासाठी गुडघ्यावर पाण्यातून काढला मार्ग

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**मुंडगाव, दि. १० :** अकोट तालुक्यातील अमीनपुर शेत शिवारात शेतीचे नुकसान झाले आहे या नुकसानाची शेतकऱ्यांना मदत व्हावी यासाठी अमिनपुर येथील तलाठी वाळके हे घोगा नाल्यातून गुडघाभर एवढ्या पाण्यातुन शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शेतकऱ्यांच्या शेतातील बांधावर पोहचले. खरोखर काही तलाठी हे आजच्या स्थितीत एकाच जागी बसुन पुर्ण शेतीचा सर्वे करून बसतात परंतु जिवाची पर्वा न करता केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी अमीनपुर येथील तलाठी वाळके हे घोगा नाल्यातील पाण्यातुन रस्ता पार करत अमीनपुर शेत शिवारातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीचे अतिवृष्टी मुळे तसेच नदी काठी व नाल्या काठी असलेल्या शेताची पाहणी करून झालेल्या नुकसानीचे बाबतीत वरिष्ठांकडे अहवाल सादर करणार आहेत. हे पाणी वाहत असताना पाण्यात पाय ठेवताच पायाखालची वाळू सरकत जाते.त्यामुळे या घोगा नाल्यातील टोंगड्या एवढ्या पाण्यातुन कोणीच पुढे जाण्यासाठी धजावत नाही. तसेच या नाल्याच्या पाण्याला या परिसरातील जनता सुद्धा घाबरते मात्र अमीनपुर येथील तलाठी वाळके यांनी कशाचीच पर्वा न करता केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी अमीनपुर शेत शिवारातील सर्व शेत जमीनीचे सर्वेक्षण करून झालेल्या नुकसानीचा अंदाज आपल्या वरिष्ठांकडे सादर केला आहे.त्या साठी तलाठी वाळके यांच्या सोबतीला अमिनपुर शेत शिवारातील शेतकरी शेषराव सरकटे, नागोराव सरकटे, अयुब खा, सलीम खा, अब्दुल कारिस, शांताराम म्हैसने ,रमेश भेले, शे गफ्फार, रमेश कडोते, पत्रकार स्वप्निल सरकटे हे सुद्धा सदर तलाठ्या सोबत फिरत नुकसानीचे पंचनामे करण्यास मदत केली. तेव्हा अशा तलाठ्याचे कितीतरी कौतुक केले तरी थोडे आहे.

## पातूर नंदापूर येथे गणेश उत्सव मिरवणूक शांततेत संपन्न



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातुर नंदापूर, दि. १० :** येथे दोन गणेशोत्सव मंडळ आपल्या गणपतीची स्थापना करतात महात्मा फुले गणेशोत्सव मंडळ, एकता गणेशोत्सव मंडळ या दोन्ही मंडळांनी बारा दिवस गणपतीची पूजा अर्चना करून ९ तारखेला आपल्या बाप्पाला निरोप दिला दोन्ही गणपती समोर सकाळी ११ वाजता पासून महाप्रसादाचे आयोजन केले होते.दुपारी ५ वाजता दोन्ही मंडळांनी मिरवणुकीसाठी प्रस्थान केले. ढोल ताशाच्या गजरात महिला मंडळी व तरुण मंडळींनी नाचण्याचा आनंद घेतला. रात्री दहा वाजता मिरवणुकीची सांगता झाली. मिरवणुकीमध्ये गावातील तरुण, नागरिक, महिला मंडळ यांनी भाग घेतला होता. पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे, बीड जमादार चव्हाण, सर्व पोलीस स्टॉप यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता मिरवणूक शांत मय वातावरणात संपन्न झाली.

## सोयाबीन पिकावर बुरशीचा प्रादुर्भाव!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**बाळापूर, दि. १० :** सतत पाउस पडल्याने सोयाबिन पिकावर मोठ्या प्रमाणात रोग दिसत असल्याने कृषी विभागाने तालुक्यातिल खिरपूरी येथे कार्य शाळेचे आयोजन करून एरियल ब्लाईट बुरशी व येलो मोझाईक ह्या बुरशी चा प्रादुर्भाव आढळत असून अवघ्या दहा दिवसात सोयाबीन पूर्ण पने बाधित होण्याचा धोका जाणवतो. एरियल ब्लाईट ही बुरशी हवा पाणी जमीन माती ई माध्यमातून फैलाव होत असल्यामुळे पाणी जर सतत चालू राहिले तर मोठ्या प्रमाणात नुकसान संभाव्य आहे, कपाशी या पिकाला सुद्धा मर रोग होऊ शकतो. त्यावर तात्काळ पायरोक्लोस्ट्रोबीन (२०% डब्लूजी) १ ग्रॅम (किंवा ३७५-५०० ग्रॅम प्रति हेक्टर) किंवा फ्लुक्सापायरोक्साड अधिक पायरीक्लोस्ट्रोबीन (संयुक्त बुरशीनाशक) ०.६० मिलि (किंवा ३०० मि.लि. प्रति हेक्टर) किंवा पायरोक्लोस्ट्रोबीन अधिक इपॉक्सिकोनॅझोल १.५ मिलि (किंवा ७५० मि.लि. प्रति हेक्टर) याची फवारणी करावी. खीरपुरी शेत शिवारातील सुरेश रामकृष्ण मेहरे दत्ता वासुदेव जामोतकार निलेश बळीराम कवडकर निवृत्ती मार्तंड आखरे या शेतकऱ्यांचे सोयाबीन क्षेत्रे बाधित झाले असून यावेळी पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ मा. प्रकाश घाटोळ तालुका कृषी अधिकारी मा.सागर डोंगरे, मंडळ अधिकारी धनभर कृषी सहाय्यक शलाका महाले ई प्रत्यक्ष प्रादुर्भाव ग्रस्त शेतांना भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केलं.

## आवास योजनेच्या मस्टरमध्ये लाखोचा गैरप्रकार

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**साखरडोह, दि. १० :** येथील ग्रामपंचायत २०२१ ते २०२२ मध्ये गावातील घरापासून वंचित असलेल्या लोकांची घरकुलाची यादी मंजूर केली. त्यानंतर घराचे बांधकाम पूर्ण केले. बांधकामाची रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाले. परंतु रोजगार हमी योजनेअंतर्गत रक्कम त्यांना मिळालीच नाही.

त्यामुळे गावातील अनेकांनी ग्रामपंचायत सरपंच सचिव तसेच पंचायत समिती मधील बांधकामाचे अभियंता, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना भेटून अनेकांनी तोंडी तक्रारी अधिकाऱ्यांना अवगत केल्या. परंतु आतापर्यंत सुद्धा त्यांना मस्टर ची रक्कम प्राप्त झाली नाही.

गेल्या दोन वर्षापासून अनेक लोकांनी आपल्या घराचे बांधकाम पूर्ण केले त्या बांधकामाचे पूर्ण रक्कम काहींना प्राप्त झाली. परंतु रोजगार हमी योजने अंतर्गत जॉब कार्ड धारकांची नावे घरकुल आवास योजनेतील लाभार्थी यांनी ग्राम रोजगार सेवक यांना दिली असता त्याने यामध्ये गोंधळ केला. रोजगार सेवकाने आपल्या जवळच्या लोकांचे जॉब कार्ड व त्यांचे बँकेच्या पासबुकची झेरॉक्स आपल्याजवळ ठेवून त्यांच्या खात्यामध्ये मस्टर ची रक्कम अदा करण्यात आली. ग्राम रोजगार सेवक आपल्या मर्जीतील लोकांना जॉब कार्ड च्या खात्यामध्ये ही रक्कम अदा करीत आहेत. घरकुल आवास योजनेची रोजगार हमी अंतर्गत असलेली रक्कम २६४०० असून या रकमेवर गेल्या अनेक वर्षांपासून हा रोजगार सेवक डल्ला मारत आहे.

**अभियान** | **शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग**

# शिवार फेरी व शेतरस्त्यांची पाहणी

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**




**अकोट, दि. १० :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे निर्देशानुसार अकोट तालुक्यात शेतरस्ते कायमस्वरूपी मोकळे करून नोंदणीकृत ठेवण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली आहेत.या उपक्रमाचा भाग म्हणून दिनांक ९ सप्टेंबर रोजी सोनबर्डी ते मुंडगाव, कासोद, शिवपुर, राजूरवाडी आगासखेड येथे शिवार फेऱ्या आयोजित करण्यात आल्या होत्या. कासोद-शिवपुर येथे घेण्यात आलेल्या शिवार फेरीत नकाशावर असलेले,अतिक्रमणित तसेच चालू शेतरस्त्यांची तपासणी करण्यात आली. या फेरीसाठी अकोट उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, अकोट तहसीलदार डॉ.सुनील चव्हाण,नायब तहसीलदार मनोज मानकर,सुभाष सावंग, अकोलखेड मंडळ अधिकारी पी.ए.होपळ, अकोट मंडळ अधिकारी गणेश भारती, ग्रामसेवक अनंत मोहोकार, घुगे ग्राम महसूल अधिकारी, शिवपुर तलाठी राजाभाऊ खामकर, रामापूर तलाठी जयश्री धवने, पोलिस पाटील विजय पाटील खवले, कोतवाल पवन गावंडे, निकिता तायडे, हर्षवर्धन, शिवपाणंद शेतरस्ता चळवळचे सतिश बोंद्रे, कृषिसहायक रामकृष्ण गायकवाड सरपंच किशोर आवारे, तसेच गावातील शेतकरी बांधवांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गजानन बोंद्रे, नंदकिशोर बोंद्रे, प्रभूदास ताराम, गोपाल ताराम, सिद्धेश्वर आंधळे, रामा सहारे, शादुल्ला शेख, मनोहर सोलकर, वामन बोंद्रे, राजू सहारे, दिपक ताराम, नियजोद्दीन शेख,गजानन गडगोळे आदींसह अनेक शेतकरी उपस्थित होते. या फेरीत एकूण १६ शेतरस्त्यांची पाहणी करण्यात आली. राजूरवाडी व आगासखेड येथे दुपारी १ वाजता शिवार फेरी घेण्यात आली. या वेळी गावातील सर्व शेतरस्त्यांची माहिती घेण्यात आली व गावकऱ्यांना त्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर ई-पीक पाहणी करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला.या फेरीत प्रभारी ग्राम महसूल अधिकारी महेश सरकटे, मंडळ अधिकारी शेरेकर,महसूल सेवक चेतन वडाळ, पोलीस पाटील, सरपंच, महसूल मित्र तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

**या मोहिमेत शिवार पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करून ज्या रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक किंवा वाजिब उल अर्जामध्ये नाही त्यांची नोंद घेणे,शेतावर जाण्यासाठी संमतीपत्र मिळवणे,रस्ता अदालत आयोजित करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे तसेच रस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे अशी कामे करण्यात येणार आहेत.प्राथमिक टप्प्यात अकोला जिल्ह्यातील ५२ गावे निवडण्यात आली असून त्यातील २४८ रस्त्यांना संकेतांक क्रमांक देऊन सीमांकन पूर्ण केले जाणार आहे.याशिवाय,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार असून या अभियानाचा समावेश त्या उपक्रमाशी करण्यात आला आहे.**

## विद्यांचल द स्कूल अकोट येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात

**दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी**




**अकोट, दि. १० :** दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यांचल द स्कूल अकोट येथे शिक्षक दिन (गुरुत्व)मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या वेळेसच्या कार्यक्रमाला गुरु-प्रभव म्हणजेच गुरुचा असर हि थीम ठेवण्यात आली होती. ४ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल आदर व्यक्त केला.याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन दिनाचे आयोजन करण्यात आले होते.त्यात सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या संचालिका सारिका भुतडा यांच्या प्रास्ताविकाने झाली. यामध्ये शिक्षकांचे महत्व,त्यांची भूमिका व उद्देश विशद करण्यात आला.शिक्षकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत शाळेत संगीत, नृत्य, गाणी, प्रश्नमंजुषा, इत्यादी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांचा आपल्या शिक्षकांबद्दलचा आदर पाहून सर्व शिक्षकांना आपण शिक्षक असल्याचा अभिमान वाटत होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सहकाऱ्यांचे अभूतपूर्व मार्गदर्शनही लाभले. यामध्ये विनायक दाते, आशिष पंडागडे, रोहित नलोडे व प्रियदर्शनी दास यांनी नृत्यात मोलाची भूमिका बजावली. तर संगीत मध्ये धिरज अढाऊ, अभिजित वंडाळे, गौरव सुरतने, कु.श्रद्धा वानखडे, आदींनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन स्नेहल रावणकार, संकेत मुळे, धनश्री बन्ने, मृदुला सिन्हा, दिपक कांबळे व नेहा अग्रवाल ह्यांनी पार पाडले.शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ५ सप्टेंबर २०२५ रोजी शाळा व्यवस्थापनाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर शाळेत आयोजित केलेला कार्यक्रम पाहणे दुर्मिळ आहे. शिक्षक दिनानिमित्त शाळा व्यवस्थापनातर्फे दिवसभर शाळेत शिक्षकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये संगीत, नृत्य आणि गीत गायन, खेळ आयोजित करण्यात आल्या होत्या. सकाळी ८.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरू होता. संस्थेचे अध्यक्ष नरेश भुतडा हे प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर उपस्थित होते ज्यांच्या हस्ते सन्मानचिन्हे व भेटवस्तू देण्यात आल्या. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शनाची जबाबदारी निलेश बरेठीया यांनी पार पाडली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
अकोला, गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com


महत्त्वाचे

## विसर्जनादरम्यान वाहून गेलेल्या तरुणाचा अखेर मृतदेह मिळाला

**मानोरा :** तालुक्यातील सेवादास नगर (वरोली) तांड्यातील मृत्युंजय राजेश राठोड हा गणपती विसर्जनादरम्यान अरुणावती नदीच्या प्रवाहात वाहून गेला होता त्याचे शव पिंजर येथील शोध व बचाव पथकाच्या अथक प्रयत्नानंतर दिग्रस तालुक्यातील मोरखेड गावाजवळील नदीपात्राच्या पुलात आढळून आला आहे ज्यास बचाव पथकातील सदस्यांनी बाहेर काढले. मृत्युंजय राजेश राठोड हा आपल्या घरात बसविलेल्या घरगुती गणपतीच्या मूर्तीच्या विसर्जनासाठी अरुणावती नदीपात्रात काल सकाळी उतरला होता. श्री गणपती विसर्जनादरम्यान मृत्युंजय राठोड सोबत दुर्दैवी घटना घडून तो पाण्याच्या ओढ्यात वाहून गेला होता. स्थानिक नागरिकांनी तथा महसूल व पोलीस प्रशासनाच्या वतीने काल सायंकाळपर्यंत वाहून गेलेल्या तरुणाचे शोध कार्य सुरू होते. अकोला जिल्ह्यातील पिंजर येथील संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथक सायंकाळी दाखल झाले होते ज्यांच्यासोबत तालुका आपदा नियंत्रण प्राधिकारी डॉ. संतोष येवलीकर हे सुद्धा उपस्थित होते. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस तालुक्यात असलेल्या मोरखेड येथील नदी पात्रावरील पुलात मृत्युंजय राठोड याचे मृत शरीर शोध पथकाच्या हाती लागले.

## हैदराबाद गॅझेट प्रमाणे बंजारा समाजाला एस.टी. सवलतीचे आरक्षण द्या



**मंगरुळपीर :** मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने मंगरुळपीर येथील तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे. मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते. त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने मंगरुळपीर तहसिलदार यांच्या मार्फत निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी मार्फत केली आहे.

## अनसिंग पोलीस स्टेशनमध्ये महाप्रसाद उत्साहात



**अनसिंग :** गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनसिंग पोलीस स्टेशन गणपती मंडळाच्या वतीने आयोजित महाप्रसाद कार्यक्रम आज दि. १० सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सकाळपासूनच भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. गणपती बाप्पाच्या जयघोषात भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी, गावातील मान्यवर तसेच महिला, युवक व लहानग्या मुलांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. धार्मिक वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमामुळे भाविकांमध्ये श्रद्धा व भक्तीची भावना अधिक दृढ झाल्याचे जाणवले.

# पावसामुळे सिताफळ उत्पादक आर्थिक संकटात






❑ मी तिन वर्षापुर्वी १ एकर सिताफळ बागेची लागवड केली होती मला या बागेपासून दीड ते दोन लाख रुपयाचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती परंतु सततच्या पावसाने ६० टक्के सीताफळ झाडांचे गळुन पडले असून जे उर्वरित सिताफळ आहेत तेही पाण्याने खराब होत आहे त्यामुळे लावलेला खर्चही निघत नाही प्रशासनाने या सिताफळ बागेचे पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी.

**- रवी चव्हाण,**
शेतकरी, पवारवाडी



❑ माझी साडेतीन एकर सिताफळांची बाग आहे. यावर्षी ढगफ ुटी सदृश्य पाऊस पडल्याने सिताफळ बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी.

**- अतुल पवार,**
शेतकरी, पवारवाडी

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० :** वाशिम जिल्ह्यात पारंपरिक पिकाला फाटा देत शेतकरी फळबागा कडे वळला. त्यातून संत्रा, आंबा ,पेरु, डाळिंब, सिताफळ या फळबागांची लागवड सुरू केली. मात्र या वर्षी सुरुवातीपासूनच वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने संत्रा आणी सिताफळ झाडांना फळधारणा झाली नाही. त्यामुळे फळ लागवड करणारे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा शेतकऱ्यांना शासनाने मदत करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे.
वाशिम जिल्ह्यात मध्ये संत्रा नंतर जे काही उत्पादन घेतले जाते ते सिताफळाच्या फळबागा मधुन. यावर्षी सिताफळाच्या बागेमधुन फारसे उत्पादन मिळणार नाही. या सिताफळाच्या झाडाची फुल धारणा झाली नाही. या वेळेस मोठ्या प्रमाणात मुसळधार पाउस पडला.आणी सततच्या पावसामुळे या सिताफळ बागाचे ६० टक्के फळ गळून गेली आहेत. उर्वरित ४० टक्के फळधारणा झाली परंतु सतत च्या पावसामुळे ती सुद्धा खराब होत आहेत. शेतकऱ्यांनी आजपर्यंत जो खर्च केला तो निघणार नसल्यामुळ शेतकऱ्यांचं मोठ अर्थिक नुकसान झालं आहे. शासनाने या सिताफळ बागेचे पंचनामे करून शेतकऱ्यांना अर्थिक मदत करावी. अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

## शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये भरपाईची मागणी



**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. १० :** गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस व सततच्या ओलाव्यामुळे कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांचे कापूस, सोयाबीन, उडीद, मूग यांसारख्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून त्यांच्या हातात आलेले पिकाचे स्वप्न पावसामुळे चुरगळले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने कार्यकर्त्यांनी तहसीलदार मार्फत
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामा करून प्रति हेक्टरी पन्नास हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ओलाव्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यांच्या हाताला पिकाचा फायदा न लागल्याने उपजीविकेचे संकट गडद झाले आहे. शासनाने तातडीने मदतीची घोषणा करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.
या निवेदनावर ज्योतिताई गणेशपुरे, श्रीधर पाटील कांनकिरड, तुळशीराम तायडे, अशोक पाटील ठाकरे, तालुका अध्यक्ष मनोज पाटील कानकिरड, युवा अध्यक्ष सुमित पाटील, सुनील कांबळे, मनोज कांबळे, सुमित पवार, बबनराव ठाकरे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

## नकाशावर असलेल्या पाणंद रस्त्यांची शेतकऱ्यांसमोर मोजणी

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी



**मानोरा, दि. १० :** शासन निर्णयानुसार विवादित रस्ते कायदेशीर करून घेण्यासाठी कोतवाल स्थानिक शेतकरी यांना घेऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी व मोजणीसाठी महसूल कर्मचारी यांनी मोहीम राबविली.
कारखेडा ते विठोली, कारखेडा ते देऊळवाडी, कारखेडा ते चिखली, कारखेडा ते धानोरा, कारखेडा ते यशवंत नगर,कारखेडा ते कार्ली, रामतीर्थ ते कारखेडा, तळप ते कारखेडा, कारखेडा ते गलमगाव या शासकीय नकाशावर असलेल्या रस्त्यांची मोजणी कोतवाल पोलीस पाटील आणि शेतकऱ्यांच्या उपस्थितीत ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी करून दिली. शासन निर्णयानुसार तालुक्यातील कारखेडा येथे नेमणुकीला असलेले ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांमधे उपरोक्त शासन निर्णयासंदर्भात जनजागृती करून त्यांची बैठक बोलावून व शासन निर्णयाची माहिती दिली. विवादित शेत रस्ते, पांदण रस्ते आदीबाबत या निर्णयानुसार सहभाग नोंदवून शासन निर्णयानुसार पात्र असल्यास असे रस्ते कायदेशीर करून घेण्यासाठी कोतवाल स्थानिक शेतकरी यांना घेऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी व मोजणीसाठी मोहीम राबविली.

## १३ विरुद्ध शून्य मतांनी अविश्वास मंजूर: बाजार समिती

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**मालेगाव, दि. १० :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. संतोष दत्तात्रय पोफळे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव , ९ सप्टेंबर रोजी झालेल्या विशेष बैठकीत १३ विरुद्ध शून्य मतांनी मंजूर करण्यात आला.
ही विशेष सभा मालेगाव येथील तहसील कार्यालयात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर होत्या. हा अविश्वास प्रस्ताव २८ ऑगस्ट रोजी जिल्हा निबंधक कार्यालयात दाखल करण्यात आला होता. एप्रिल २०२३ मध्ये पार पडलेल्या बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत आमदार अमित झनक व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक दिलीप जाधव यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने बाजार समितीवर वर्चस्व मिळवले होते. या बाजार समितीच्या १६ मे २०२३ रोजी झालेल्या सभापती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे गणेश उंडाळ यांची निवड झाली होती; परंतु त्यांनी ८ मे २०२५ रोजी राजीनामा दिला. त्यानंतर १९ मे २०२५ रोजी झालेल्या निवडणुकीत ॲड. संतोष पोफळे यांची बिनविरोध निवड झाली. सभापतीपद स्वीकारताना पोफळे यांनी एका महिन्यात राजीनामा देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र तीन महिने उलटल्यानंतरही त्यांनी राजीनामा दिला नाही. त्यामुळे असंतुष्ट संचालकांनी त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला. अविश्वास प्रस्तावावर संचालक उल्हासराव घुगे, गणेश उंडाळ, सुनीता चंदनशिव, अभिजित गीद, गजानन शिंदे, संदीप घुगे, राजेश इंगोले, वैशाली आदमने, उद्धव गोडे आणि विजय अंभोरे यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. प्रस्ताव दाखल करताना सर्व दहा सदस्य उपस्थित होते. विशेष बैठकीस अविश्वास प्रस्ताव दाखल करणारे सर्व संचालक, तसेच रवी भुतडा, विजयकुमार भुतडा आणि भूषण खाडे हे सदस्यही उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत अविश्वास प्रस्ताव १३ विरुद्ध शून्य अशा मतांनी मंजूर करण्यात आला.

## पोलिस स्टेशनच्या गणपतीचे शांततेत विसर्जन



**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**मानोरा, दि. १० :** येथील पोलिस स्टेशन मधील स्थापन केलेल्या गणपतींचे आज ९ सप्टेंबर रोजी शांततेत विसर्जन दुपारी २ वाजता करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे येथील पोलिस स्टेशन मध्ये श्री ची स्थापना करण्यात येते. शहरातील सार्वजनिक गणपतीचे विसर्जन दिनांक ७ सप्टेंबर रोजी झाल्या नंतर आज येथील गणपतीचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन मिरवणूक सकाळी ११ वाजता सुरू झाली.पारंपरिक वाद्य आणि पर्यावण पूरक पद्धतीने हे विसर्जन करण्यात आले. अरुणावती नदीच्या तीरावर असलेल्या गणपती मंदिर जवळ घाटावर दुपारी २ वाजता विसर्जन झाले. पोलिस निरीक्षक नैना पोहेकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. मिरवणुकीत सर्व पोलिस उप निरीक्षक राम सरोदे,अभिजीत बारे,विजय अजमीरे,सर्व जमादार, पोलिस कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते.

## टाळमृदंगाच्या गजरामध्ये गणरायांना निरोप

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी



**रिसोड, दि. १० :** रिसोड पोलिस स्टेशन मधील स्थापन केलेल्या गणपतींचे विसर्जन ८ सप्टेंबर रोजी पार पडले. यावेळी वडजी येथिल भजणी मंडळाने टाळमृदंगाच्या गजराने गणेश विसर्जनाला आगळी वेगळी रंगत आणली होती.
दरवर्षी प्रमाणे येथील रिसोड पोलिस स्टेशन मध्ये पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना यावर्षीही करण्यात आली होती. शहरातील सार्वजनिक गणपतीचे विसर्जन दिनांक ७ सप्टेंबर रोजी झाल्या नंतर आज येथील गणपतीचे विसर्जन करण्यात आले. या गणेश विसर्जन मिरवणूक दुपारी २ वाजता सुरू झाली. पर्यावण पुरक पद्धतीने ज्ञानगंगा वारकरी मंडळ वडजी व बॅन्जो या पारंपारिक वाद्यावर पोलीस व पत्रकार थिरकत या उत्सवात आनंद घेतला.सवड येथिल कबीर कुटी समोरील विहिरीमध्ये सायंकाळी सहा वाजता भावपुर्ण वातावरणात गणेशाचं विर्सजन करण्यात आले. यावेळी रिसोड पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण, अरुणा चव्हाण, यश चव्हाण परिवारा सह विघ्नहर्ताची आरती मध्ये सहभाग घेतला.
मिरवणुकीमध्ये गणेश विसर्जन सर्व पोलिस कर्मचारी वर्ग हिरव्या रंगाचा सलवार, पांढरा शुभ्र पायजमा, पांढरी टोपी या पारंपरिक पोशाख परीधान करीत सर्व पोलिस उपनिरीक्षक, जमादार,पोलिस कर्मचारी,महीला पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सतीश मांदळे, शितलकुमार धांडे, महादेव घुगे उपस्थित होते.

## महसूल सेवक पदाला चतुर्थी श्रेणीचा दर्जा द्या!

**मालेगांव :** महसूल सेवक (कोतवाल) पदास शासकीय चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्यात यावा, या मागणी ता.१० रोजी तहसीलदार रंजना गोरे यांना महसूल सेवक संघटनेच्या वतीने लेखी निवेदन देऊन केली आहे. महसूल विभागातील विवीध शासकीय धोरणे,शासन स्तरापासून गाव पातळीवरील तसेच महत्त्वाच्या योजना अंतिम घटकांपर्यंत पोहचवण्यासाठी महसूल सेवक कार्यरत असतो.तसेच शासनाचे विविध अभियान, आपत्ती, टंचाई, जनगणना, निवडणूका, राजशिष्टाचार, विविध प्रमाणपत्रे देणं,अशा अनेक बिन महसुली कामाची जबाबदारी हा महसूल सेवक पार पाडत असतो. तेव्हा महसूल सेवकांना इतर महसूल कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सेवा सुविधा देण्यासाठी चतुर्थी श्रेणीचा दर्जा द्यावा. अन्यथा ता.१२ सप्टेंबर पासून महसूल मंत्री महाराष्ट्र शासन यांच्या क्षेत्रामध्ये बेमुदत काम बंद,धरणे आंदोलन तसेच साखळी उपोषण करणार असल्याचे म्हटले आहे. यावेळी महसूल सेवक संघटनेचे विजय पांढरे, सुनील देवळे, बाबाराव शितोळे, संदीप तागड, अनुराधा काकडे, किर्ती शेंडगे,भारती आदमने, सुरेश पुंडगे,व सुवर्णा काठोळे उपस्थित होते.

गुन्हेगारी | वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यातील मोटारसायकली चोरी

## तब्बल १२ मोटारसायकल चोरी करणारी टोळी जेरबंद!

**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**रिसोड, दि. १० : गत काही दिवसांपासून वाशिम जिल्हा आणि आसपासच्या भागात मोटारसायकल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी.बी. पथकाला विशेष मार्गदर्शन करून तपासाला गती दिली. तांत्रिक पद्धतीने व गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू ठेवत अखेर रिसोड पोलिसांनी १२ मोटारसायकली चोरी करणारी टोळी जेरबंद केली.**



डी.बी. पथकाने ९ सप्टेंबर रोजी रिसोड येथून संशयित मयुर प्रवीण नवले (वय २१, रा. माणुसकी नगर, रिसोड) आणि गजानन उर्फ गणेश बळीराम गायकवाड (वय १८, रा. माणुसकी नगर, रिसोड) यांना ताब्यात घेतले. चौकशीत दोघांनी वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यातील ठिकाणांहून विविध मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या कबुलीजबाबावरून पोलिस स्टेशन रिसोड, वाशिम शहर, मेहकर, लोणार आदी ठिकाणांहून चोरी गेलेल्या एकूण १२ मोटारसायकली (किंमत अंदाजे ८.२५ लाख रुपये) जप्त करण्यात आल्या. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलिस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडली. या यशस्वी मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, हवालदार प्रशांत राजगुरू, तसेच सजय रंजवे, आशिष पाठक, रवी अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, सुनील तिवाले, प्रविण गोपनारायण आणि विश्वास चव्हाण यांचा मोलाचा सहभाग होता.

## गुणवत्तेचा स्तर उंचावल्या बद्दल शिक्षकांचा सत्कार



**दै. अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**वाशीम, दि. १० :** जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा देपूळ येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनायक गंगावणे यांच्या अध्यक्षतेखाली दि ८ ला सोमवारी साजरा करण्यात आला आहे, यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये विदर्भ बळीराजा प्रकल्प ग्रस्त कृती संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे गूरूजी , देविदास गंगावणे इत्यादीची उपस्थिती होती,
५ सप्टेंबरला सूट्टी असल्या कारणाने,दि ८ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर चांगल्या प्रकारे वाढविल्या बद्दल अध्यक्ष विनायक गंगावणे यांच्या वतीने मूख्यध्यापक राजेंद्र भोयर, अध्यापक एकनाथ महाले, मोहन देवळे, विनोद डोंगरे, करूणा वाळली, करूणा रूद्राक्षवार, सुचिता पारणकर, अश्विनी पाठक, इत्यादी शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी, ग्राम पंचायत सदस्य,भागवत गंगावणे, उपाध्यक्ष रहीसाबी शब्बीर शाह, सदस्य शिवाजी गंगावणे, वैशाली पेढेकर, आर्चे ना गंगावणे, दीपाली गंगावणे,किरण शेगोकार,शितल उंदरे, बालाजी जोजार अविनाश गंगावणे, राजेश भेंडेकर,मदन गंगावणे,अतिष गंगावणे, अरुण तागड इत्यादींची उपस्थिती होती.

## महत्त्वाचे

### मजूर सहकारी संस्थेवर काम वाटप प्रक्रियेत अन्याय

**वाशीम :** जिल्हा परिषदेमधील काम वाटप यंत्रणा राजकीय दबावात येत अन्य एजंसीला काम देवून मजुर कामगार संस्थेवर अन्याय करीत आहे . अशी तक्रार जिल्हा मजुर संघाने जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मजुर संघाने निवेदनात म्हटले की, शासनाच्या ग्राम विकास खात्याची कामे ऑन - लाईन टेंडरच्या माध्यमातून वाटप केली जातात. १५ लाखाच्या आतील कामे नियमानुसार मजुर सहकारी संस्थेस ३३ टक्के, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता संघटनेस ३३ टक्के आणि ओपन कंत्राटदारांना ३४ टक्के या प्रमाणात वाटप होणे गरजेचे आहे. मात्र, जिल्हा परिषदेची काम वाटप यंत्रणा राजकीय दबावात येवून अन्य यंत्रणेला प्राधान्य देतात. मजुर संस्थेला त्यांच्या हक्काची कामे न देता या प्रक्रियेमधून वगळल्या जात आहे. त्यामुळे मजुर संहकारी संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असून सदर संस्थेवर अवलंबुन असणाऱ्या घटकांवर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामुळे वरिष्ठांनी काम वाटप प्रक्रियेत पारदर्शकता आणून मजूर सहकारी संस्थेवर होत असलेला अन्याय दुर करावा. अन्यथा संघटनेस न्यायालयात जावे लागेल. असा ईशारा निवेदनात दिला आहे. निवेदनावर मजुर कामगार सहकारी संस्थेचे सुभाष खरात, रतनराव नरवाडे, संजय बनसोड, धनंजय पांढरे, दिलीपराव भगत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बंजारा समाजाला 'हैदराबाद गॅझेट' लागू करा

## आंध्र, तेलंगणाप्रमाणे अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. १० :** निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेट मध्ये गोरबंजारा, लंबाडा, लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा, लंबाडा जातींना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे. मात्र, १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह विदर्भ खानदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस टी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे . मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत दि. १० सप्टेंबर रोजी गोर सेनेच्या वतीने नायब तहसीलदार यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तहसील कार्यालयावर शेकडो बंजारा बांधव उपस्थित होते.

राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात दि. १० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार , महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते. मात्र, भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्चना कायद्याचा फटका महाराष्ट्रातील गोरबंजारा लमाण, लंबाडी यांना बसला असून मुळ आरक्षणाला मुकावे लागले आहे. यासाठी गोरबंजारा समाजाने सातत्याने संघर्ष पुकारला असून त्यांना न्याय देण्यासाठी बापट आयोग, इधाते आयोग, भाटीया आयोग, डिएनटी, एस टी आयोगाने महाराष्ट्रातील गोरबंजारा हा अनुसुचित जमातीचे आरक्षणाबाबत सकारात्मक शिफारशी करुनही त्यांना ते आरक्षण देण्यात आलेले नाही.

# मूर्तिजापूर शहरात पैशाच्या वादातून कुऱ्हाडीने हल्ला

### १ जण गंभीर जखमी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. १० :** पैशाच्या वादातून मूर्तिजापूर शहरात धक्कादायक घटना घडली आहे. फिर्यादी सुनिल जनार्दन खाडे वय ४५, रा. ग्रामसेवक कॉलनी यांच्यावर त्यांचेच मानलेले भाऊ गजानन देवीदास गुरदे रा. बॅक कॉलनी, मूर्तिजापूर याने कुऱ्हाडीने हल्ला करून गंभीर जखमी केले. घटना ९ सप्टेंबर रोजी दुपारी २.४५ वाजता ग्रामसेवक कॉलनीत घडली. पैशाच्या वादातून आरोपी गजानन गुरदे याने खाडे यांना शिवीगाळ करून डाव्या दंडावर कुऱ्हाडीने वार केला. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले आहे. फिर्यादीच्या जबानीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात कलम ११८ (१,) ३५२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून, गुन्ह्याचा तपास शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अरुण मेश्राम हे करीत आहेत.

# बच्चूभाऊंच्या भेटीत शेतकऱ्यांचा कर्जमुक्तीचा वज्र निर्धार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिरपूर, दि. १० :** ''शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार'' या सरकारच्या गाजावाजाने दिलेल्या आश्वासनाचा फुगाच निघाला असून आजही शेतकऱ्यांच्या हातात नोटिसा आणि जप्तीचे आदेशच येत आहेत. सततची नापिकी, अनियमित पाऊस आणि कर्जाच्या विळख्यात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांचा संयम आता सुटू लागला आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांची भेट घेऊन कर्जमुक्ती आंदोलन पुन्हा उभारण्याचा वज्र निर्धार व्यक्त केला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून अस्मानी-सुलतानी संकटामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. शेतीत केलेल्या खर्चाला भाव मिळत नाही, उत्पादन घटले आहे आणि बँकांच्या नोटिसांनी संसार पोखरला आहे. या पार्श्वभूमीवर हिरपूर येथील शेतकरी बच्चूभाऊंना भेटले. चर्चेत शेतकऱ्यांनी ठामपणे सांगितले की ''सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत, तर शेतकरी रस्त्यावर उतरेल आणि कर्जमुक्तीसाठी निर्णायक लढा उभारेल. अमरावती येथील बैठकीतही या विषयावर चर्चा झाली असून येत्या काही दिवसांत कर्जमुक्ती आंदोलनाची हाक देण्याचे संकेत दिले गेले.

# झोलेबाबा संस्थान येथे आज सभेचे आयोजन



**शेलुबाजार :** नजीकच्या श्रीक्षेत्र चिखली येथे संत झोलेबाबा पुण्यतिथी उत्सव कार्यक्रमाच्या नियोजना संबंधी चर्चा करण्यासाठी महत्त्वपूर्ण सभेचे आयोजन दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता करण्यात आले आहे. या सभेसाठी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी श्री संत झोलेबाबा संस्थान चिखली येथे उपस्थित रहावे. असे आवाहन श्री संत झोलेबाबा पुण्यतिथी महोत्सव समिती संस्थान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भरधाव दुचाकीची तरुणाला धडक

## मुर्तिजापूर शहरात अपघात, पोलिसांत गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १० :** शहरातील अकोला नाका परिसरात १० सप्टेंबर रोजी सकाळी १०.१५ वाजता झालेल्या अपघातात एक युवक जखमी झाला आहे.

फिर्यादी मंगेश महादेव वाकोडे वय ४७ रा. आरखेड यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते घरी जात असताना त्यांचे ओळखीचे प्रदीप गावंडे हे स्कुटी (क्र. एमएच २७ टीसी १२६) वरून जात होते. त्या वेळी दुचाकी (क्र. एमएच ३० बीक्यू ९९१५) चालकाने भरधाव वेग व निष्काळजीपणे वाहन चालवत मागून जोरदार धडक दिली. या अपघातात प्रदीप गावंडे यांना डोक्याला मार लागून सूज आली तसेच पायाला खरचटल्याने रक्तस्त्राव झाला. घटनेनंतर तत्काळ वैद्यकीय उपचार करण्यात आले. याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनला कलम २८१, १२५ बीएनएस सहकलम १८४ मोटार वाहन अधिनियम प्रमाणे दाखल करण्यात आला असून, पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजानन थाटे, अंमलदार शेख इरफानोद्दीन करीत आहेत.


## अकोला बाजारपेठ

प्रो.प्रा.शेखर आमले ।।श्री।। 8329775373 9823075978 8999718846
ॲग्रो निर्मीत सोलर झटका मशिन
झटका मशिन, झटका मशिन, क्लच वायर, इंसुलेटर, सोलर पॅनल, कॉर्नर, सिडस् ड्रिल, बॅटरी
एस.टी. ऑफिस समोर, मनिषा अपार्टमेंट, मंगरूळपीर रोड, अकोला

नामांकित कंपन्यांचे प्लायवुड,मायकाचे विक्रेता
KAUSHIK PLYWOOD
9359721411
खेतान गल्ली, गांधी रोड, अकोला.

अंबे स्पोर्टस वेअर & मॅन्युफॅक्चर
टी-शर्ट, लोअर, गेम पॅन्ट, ट्रॅक सूट, स्पोर्ट शूज चे होलसेल व रिटेल विक्रेता
ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळेल
राजू सिसोदिया
सिटी कोतवाली च्या मागे अकोला
मो :- ८३२९१११७००

साहु ब्रदर्स
।। साहु मंगलम ।।
उपलब्ध सेवा: बंकेट हॉल, लग्न समारंभ हॉल, पार्टी हॉल, स्टॅंडर्ड रुम्स, गार्डन, ओपन टेरिस
उपलब्ध सुविधा: ६५०० स्क्वेअर फुट मेन हॉल, ५००० स्क्वेअर फुट डायनिंग हॉल, १२ स्टॅंडर्ड रुम्स, ३००० स्क्वेअर फुट ओपन टेरिस, स्क्वेअर फुट गार्डन
9923299920, 9326887511,7841036909
मनोरथ कॉलनी, जवळ डाबकी रोड, अकोला

पर्सनल लोन, बिझनेस लोन, हाऊसिंग लोन, प्रोपर्टी लोन, इन्शुरन्स पॉलिसी
मेडिकल पॉलिसी सर्व पॉलिसी व लोन करून मिळेल
लोन एजंट
निशांत धूळ
मो. नं. ९३७०५०७६५२

LIC | IFFCO-TOKIO GENERAL INSURANCE
राजेश आनंदराव पोहरे
विमा प्रतिनिधी, कोड नं. 6159977, Mob: 9850823552
Education, Marriage, Investment, Pension, All Multipurpose Plan
Car, Jeep, Truck, Tractor, Bus, Mediclaim, Shop, House, All Type Of Insurance
मनो-आनंद इन्शुरन्स सर्विसेस
कार्यालय :- शाखा क्र. १ (९७७) राणी झाशी मार्ग, अकोला - ४४४००१
निवास :- गणेश नगर, डाबकी रोड, अकोला ४४४ ००२
email: dattatraypohare4@gmail.com

ग्लॅमर इंडस्ट्री मध्ये आपली छाप उमठवायची आहे का? तुमच्या आवडीला करिअर मध्ये रूपांतरित करा! ग्लॅमर इंडस्ट्री मध्ये करिअरची सुवर्ण संधी शिक्षणाची कोणतीही अट नाही
Hair City Hair & Makeup Academy
DIPLOMA IN HAIR DRESSING
मो :- ८९८३३५७३४८
रतनलाल प्लॉट चौक , अकोला

कन्हैया व्हिडीओ व्हिजन
केदार लोलगे 9689304622
फोटोग्राफी ॲन्ड व्हिडीओग्राफी
वेडिंग शुट, प्री वेडिंग शुट, सिनेमॅटिक शुट, एंगेजमेंट शुट, पोस्ट वेडिंग, कॅन्डीड शुट
मालेगांव, जि. वाशिम ४४४५०३

रत्नदीप ॲल्युमिनियम वर्क
स्लाइडिंग विंडो १२ (mm) ,टफन ग्लास, टावर ग्लास फिटिंग व सर्व प्रकारचे ॲल्युमिनियम चे कामे
संजय खंडेराव ९८९०५९२४३०
रत्नदीप खंडेराव ९८६०८५४९४१
पत्ता: शांतता नगर बाळापूर नाका अकोला

मो. ९६८९६३५०१३
जेन्टस स्पेशालिस्ट जय टेलर्स
शिलाई - ६०० ड्रेस

संचालक अमरदिप जंजाळ सर मो :- ९५४५७९३९७९
जंजाळ फिजिकल करिअर अकॅडमी
स्पेशल इंडियन आर्मी / B.R.O.GREF
हारा वही जो लढा नही....
One Nation One Army
आमच्या अकॅडमीचे वैशिष्ट्ये...
रनिंग साठी ४०० मिटरचा ट्रॅक
आर्मी भरती फिजिकल व पेपर, मेडिकल पुर्ण तयारी. (१००%)
विज्ञान व गणित शिकवण्यासाठी तज्ञ शिक्षक.
जेवणाची व राहण्याची उत्तम व्यवस्था. (रोज सकाळी नाश्ता)
विशेष: १६०० मीटर ४ मी. ४५ सेकंद येणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा व फी माफ
आमचे दरवर्षी १०० पेक्षा हि जास्त विद्यार्थी यशस्वी
आर्मी, फिजिकल साठी राहण्याची फ्रि व्यवस्था फक्त जेवणाचे पैसे घेण्यात येईल.
आजच आपला प्रवेश निश्चित करा.

डॉ. बी. आर. आंबेडकर अभ्यासिका हॉल
MPSC/UPSC च्या विद्यार्थ्यां करीता
२४ तास सेवा

।। श्री गजानन महाराज प्रसन्न ।।
श्री. इव्हेंट मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरर्स
प्रोप्रा.सोनू कथले
मो. ९१-९९२१८८१८७१, ९१-९३०९५२९०५९
नास्ता / जेवण
मंडप डेकोरेशन/ लाईटींग
सर्व प्रकारच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी घेतल्या जाईल
लहरिया नगर, कौलखेड, अकोला

आशिष जेन्टस पार्लर
मनिषा अपार्टमेंट, एस.टी. डिव्हीजन ऑफीस समोर, कौलखेड रोड, अकोला
प्रोप्रा. अनिल मिसाळकर
मो.९८९०२०२७२१, ८३०८०५५४५२

।। गजानन महाराज प्रसन्न ।।
वैभव जहुरकार 8446316203
विशाल जहुरकार 9637297978
वैभव ॲल्युमिनीयम वर्क & ग्लास सेंटर
स्ट्रक्चर, ॲल्युमिनीयम डोर, कंपोझिट पॅनल, ॲल्युमिनीयम पार्टीशन, ऑल ॲल्युमिनीयम वर्क
सर्व प्रकारचे ग्लास मिळतील
अकोटकार वाडी डाबकी रोड, अकोला

मो :- ७८४१८८८८६२
मर्यादित जागा.... सरकार मान्य संस्था कोड नं. ६३०७५ प्रवेश देणे सुरु आहे...
अक्षर कंप्यूटर टायपिंग अॅण्ड शॉर्टहॅन्ड इन्स्टिट्यूट
इंग्रजी/मराठी/हिंदी कंप्यूटर टायपिंग कोर्सेस
GCC-TBC गतिमान साक्षरतेकडून संगणकतेकडे राज्याच्या प्रगतीकडे

ब्युटी झोन मो. नं. ७६९८७१५८३
मेकअप स्टुडिओ अँड अकॅडमी
ऑल मेकअप अँड हेअर कट
लहान मुलींचे हेअर कट केले जातील
विद्या पातूरकर / गणेश नगर डाबकी रोड अकोला

रिद्धी सिद्धी कॅटर्स अँड हलवाई
बर्थडे, लंग्नसमारंभ, पार्टी ऑडर घेतलं जातील
अमोल हलवाई
मो. ८०८७५५३३५४
जुने शहर अकोला

आवंडेकर प्रॉपर्टी डीलर
अकोला शहरात डुप्लेक्स, घर, दुकान, शेती, प्लॉट, फ्लॅट विकणे किंवा घेणे असल्यास संपर्क करा
ऑफिस प्रिया टावर जवळ डाबकी रोड, अकोला
आंवडेकर मो- ९९६०२९८५९७

MS-CIT World-class Comprehensive Computer Course
MKCL KLiC Courses Gateway to Knowledge Lit Careers
ऋणश्री कंप्यूटर क्लासेस
ALC CODE: 12210199
MO: 7841888862
लक्ष्मी नगर, डाबकीरोड अकोला
प्रिया टॉवर डाबकीरोड अकोला
प्रो.प्रा सचिन वानखडे

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, गुरूवार,दि.११ सप्टेंबर२०२५


## महत्त्वाचे

### महिलेला मारहाण; तिघांविरुध्द गुन्हा

**खामगाव :** स्थानिक मेनरोड वरील लड्डा हॉस्पीटल समोर ८ सप्टेंबर २५ रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास दुचाकी क्र. एमएच-२८-एएल-११२४ चा चालक सचिन दादाराव लखाडे (वय ३२. रा. बाळापुर फैल) याने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे दुचाकी चालवुन शुभम बाबु मोरे रा.माखरिया मैदान यांच्या मामेभावाला धडक देऊन जखमी केले. याप्रकरणी शुभम मोरे यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द कलम २८१, १२५९, १२५बी भान्यास नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोहेकॉ संतोष गव्हाळे करीत आहेत.

### विवाहिता बेपत्ता

**संग्रामपूर :** किन्ही महादेव येथील खामगाव तालुक्यातील रहिवासी सौ. कमल वासुदेव भरगडे (३६) ही विवाहिता ९ सप्टेंबर २५ रोजी रात्रीचे सुमारास कोणाला काही न सांगता घरून निघुन गेली. तिचा सर्वत्र शोध घेतला असता मिळुन आली नाही. त्यामुळे वासुदेव सरदारसिंग भरगडे यांनी हिवरखेड पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये बेपत्ताची नोंद घेण्यात आली आहे.

### जि.प.अनुकंपा उमेदवारांची तात्पुरती सुधारित प्रतिक्षायादी प्रसिध्द

**बुलडाणा :** जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत सन २०२५ च्या अनुकंपाधारक उमेदवारांची तात्पुरती सुधारित प्रतिक्षायादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. या अनुकंपाधारक उमेदवारांच्या तात्पुरत्या ज्येष्ठता यादीवर संबंधिताकडून दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत लेखी आक्षेप मागविण्यात आले आहे. तसेच या तात्पुरत्याा यादीवर काही आक्षेप किंवा हरकती असल्यास विहीत मुदतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा या कार्यालयास लेखी सादर करावे. आक्षेपाची पडताळणी झाल्यानंतर अनुकंपा उमेदवारांची तात्पुरती प्रतिक्षायादी अंतिम करण्यात येईल, असे मुख्य कायकारी अधिकारी गुलाब खरात यांनी कळविले आहे.

### कु. प्रणाली क्रॉस कंट्री स्पर्धेत अव्वल स्थानी

**खामगाव :** स्थानिक श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालय, खामगाव ची विद्यार्थिनी कु. प्रणाली संजय शेगोकार हिने नुकत्याच अमरावती येथे संपन्न झालेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ तसेच आर डी आय के महाविद्यालय बडनेरा व अभिनंदन बँक अमरावती यांच्या सहकार्याने आयोजित संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत महिला विभागातून कु. प्रणाली संजय शेगोकार हिने दहा किलोमीटर क्रॉस कंट्री स्पर्धेत प्रथम येऊन पुन्हा यावर्षी अव्वल स्थानी राहिली आहे. यशाबद्दल व प्रा.डॉ. सीमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाबद्दल व महाविद्यालयाला मिळालेला यशाचा वारसा कायम ठेवल्याबद्दल नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व पदाधिकारी प्राचार्य प्रा. हेमा जंवजाळ, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १७०० - २२५० |
| गहू | २५०० - २६५० |
| तुर | ५४०० - ६५७५ |
| हरभरा | ४४०० - ५९२५ |
| सोयाबीन | ३४५० - ४५२५ |
| उडीद | ६५०० - ६८०० |
| मका | १७०० - १७०० |
| भुईमुग | ४८०० - ४८०० |

# अल्पवयीन बालिकेवर अत्याचार; आरोपीस तात्काळ अटक करा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि.१० :** अकोला शहरातील गुलजारपुरा भागात घडलेल्या संतापजनक घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. दिनांक ६ सप्टेंबर २०२५ रोजी केवळ तेरा वर्षांच्या भोई समाजातील अल्पवयीन बालिकेवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. समाजातील असंख्य नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला असून आरोपीस तात्काळ अटक करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रीय भोई समाज क्रांती दलाने दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तोहीच समर या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने अल्पवयीन बालिकेवर अमानुष कृत्य केले. विशेष म्हणजे हा प्रकार पहिल्यांदाच घडलेला नसून आरोपीने यापूर्वीही अशा स्वरूपाचे गुन्हे केले आहेत. पाचव्यांदा त्याने अशी घृणास्पद कृत्ये केल्याचे समोर आले असून यापूर्वीही त्याच्यावर गुन्हे दाखल झाले होते. इतकेच नव्हे तर तो तुरुंगवासही भोगून आला आहे. मात्र, तरीदेखील त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती कायम असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेच्या दिवशी बालिकेच्या घरातील मंडळी गणेश विसर्जनासाठी बाहेर गेल्याचा फायदा आरोपीने घेतला. घरात एकटी असलेल्या बालिकेवर त्याने अत्याचार केला. ही घटना समजताच परिसरातील नागरिक संतापाने पेटले. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलिसांकडून अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. या संदर्भात राष्ट्रीय भोई समाज क्रांती दलाच्या वतीने मेहकर तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनामध्ये आरोपीस तात्काळ अटक करून फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवून कठोर शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. ''अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रकरणांमध्ये प्रशासनाने तत्परता दाखवणे आवश्यक आहे. आरोपी जर अजूनही मोकाट फिरत असेल तर नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत जाईल,'' असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर सुनील ब्राह्मणे, राजू सावळे, गणेश गवते, निलेश सावळे, भास्कर सावळे, गजानन सावळे, श्याम सावळे, सोहम सावळे, आनंद सावळे, ईश्वर ढोके, एकनाथ फुलारे, श्याम चहारे, गजानन चहारे, संदीप श्रीनाथ, रमेश सावळे, सुरेश कुकडे, शुभम गवंदे, राजू कुकडे, अजय सावळे यांच्यासह समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तहसीलदारांकडे निवेदन सादर करताना समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, ''जर पोलिस प्रशासनाने तातडीने आरोपीला अटक करून न्यायप्रक्रिया गतिमान केली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. या आंदोलनाची जबाबदारी प्रशासनावर राहील.'' सध्या अकोला पोलिस आरोपीच्या शोधात असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, यापूर्वी अनेकदा गुन्हे करूनही आरोपीवर कठोर कारवाई झाली नसल्यामुळे लोकांमध्ये प्रशासनाविषयी प्रचंड नाराजी आहे. स्थानिक पातळीवर तरुणांनी एकत्र येऊन ''बालिकेवर अन्याय सहन केला जाणार नाही'' असा निर्धार व्यक्त केला आहे. या घटनेने पुन्हा एकदा अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. वारंवार अशा घटना घडत असताना केवळ गुन्हे नोंदवून न थांबता दोषींना त्वरित शिक्षा होणे ही काळाची गरज असल्याचे नागरिक सांगत आहेत. भोई समाजासह विविध सामाजिक संघटनांनीही या घटनेचा निषेध केला आहे. ''अत्याचारासारख्या घटनांमुळे समाजातील महिलांमध्ये आणि मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. आरोपीला तात्काळ कठोर शिक्षा झाली तरच अशा प्रवृत्तीला आळा बसेल,'' अशी भावना व्यक्त केली जात आहे. अल्पवयीन बालिकेवर झालेल्या या अत्याचारानंतर आता संपूर्ण जिल्ह्यातून आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी होत आहे. प्रशासनाने त्वरीत ठोस पावले न उचलल्यास लवकरच मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन पेट घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## पोखरा योजनेची अंमलबजावणी लांबणीवर; शेतकरी वंचित, आंदोलनाचा इशारा



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.१०:** तालुका कृषी अधिकारी यांना मोताळा तालुका काँग्रेस किसान सेलतर्फे आज निवेदन देण्यात आले. या निवेदनात पोखरा ( - ) योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. सुमारे नऊ ते दहा महिन्यांपूर्वी तालुक्यातील काही गावांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला होता. मात्र प्रत्येक्षात आजपर्यंत योजना सुरू न झाल्याने शेतकऱ्यांचा अपेक्षित लाभ मिळालाच नाही. काय आहे.

पोखरा()योजना?

या योजनेचा उद्देश हवामान बदलांना तोंड देण्यासाठी शाश्वत व हवामान-प्रतिरोधक शेती विकसित करणे हा आहे. या अंतर्गत शेततळी बांधणे पाणी व्यवस्थापन सुधारणा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेती यांत्रिकीकरणासाठी अनुदान (उदा. ट्रॅक्टर खरेदी) आधुनिक लागवड पद्धतींचे प्रशिक्षण कृषी उत्पादकता वाढविणे अशा विविध कामांद्वारे शेतकऱ्यांना हवामान बदलांच्या दुष्परिणामांशी लढण्यास मदत केली जाते.

शेतकऱ्यांची नाराजी

योजनेचे उद्दिष्ट पाणी साठवण, सिंचनक्षमता वाढवणे, उत्पादनक्षमता दुप्पट करणे व दुष्काळी परिस्थितीवर मात करणे असे असताना, अंमलबजावणीस झालेल्या विलंबामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. किसानसेलनेस्पष्टइशारादिलाआहेकी, शेतकऱ्यांना तातडीने पोखरा योजनेचा लाभ द्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.

## नागरिकांनी केले महावितरणसमोर ठिय्या आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.१०:** लोणार : शहरातील धार रोड व शहरातील इतर भागात मागील दोन दिवसा पासून लोड शेडींग सुरु आहे. परंतु काही भागात लोड शेडींग तर काही भागात लाईन सुरु असल्यामुळे नागरिकानी विदयुत वितरण कंपनीच्या सबस्टेशन जावून अभियंत्याला जाब विचारून घेराव घातला व कार्यालया समोर ठिय्या आंदोलन केल्याची घटना ९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता घडली. शहरात वाढती विजचोरी रोखण्यासाठी विदयुत वितरण कंपनीने धडक मोहीम राबऊन लाखो रुपये दंड वसुल केला. तरीही विजचोरी होत असल्यामुळे काही भागातच लोड शेडींग घेतली जात असल्याने नागरिक कमालीचे त्स्त्रा झाले. हा एक प्रकारे अन्याय असल्याने लोड शेडींग करायची तर संपूर्ण शहरात करावी, अशी मागणी नागरिकांनी अभियंता यांना केली. आणि एक तास संपूर्ण लोणार शहरातील लाईन बंद करून विदयुत वितरण कंपनीच्या कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करून एमईसीबी मुर्दाबाद च्या घोषणा नागरिकांनी दिला. काही वेळ गोंधळाची परिस्थिती निमर्ण झाली होती. नागरिकांचा रुद्रअवतार घटनास्थळावर पाहून पोलीस अधिकारी तातडीने उपस्थितीत झाले होते.

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा, वीजदर सवलत योजनेस मुदतवाढ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१० :** शेतकऱ्यांसाठीच्या अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजनेसाठीच्या वीजदर सवलत योजनेस आणखी दोन वर्षांसाठी म्हणजेच मार्च, २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे राज्यातील सुमारे १ हजार ७८९ उपसा सिंचन योजनांच्या खर्चात मोठी बचत होण्याबरोबरच त्याचा थेट फायदा या उपसा सिंचन योजनांशी निगडीत शेतकऱ्यांना होणार आहे.



या वीजदर सवलत योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना पिकांसाठी पाणी उपलब्ध करणे सुलभ झाले आहे. यातून शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. त्यामुळे यापुर्वी जाहीर केलेली ही वीजदर सवलत योजना शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यात आणि त्यांच्या कृषि उत्पन्नात वाढ करण्यात सहायभूत ठरली आहे. त्यामुळेच या कल्याणकारी योजनेस ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनीट रुपये १.१६ रुपये आणि स्थिर आकार दरमहा २५ रुपये रुपये (प्रति के.व्ही.ए.) आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनिट एक रुपया आणि स्थिर आकार दरमहा रुपये १५ रुपये (प्रति अश्वशक्ती) अशी सवलत ३१ मार्च, २०२७ पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली. या सवलतीमुळे महावितरणला महसुली तुटीच्या भरपाईकरिता राज्य शासनाकडून २०२५-२६ या वार्षिक वर्षात ८८६ कोटी १५ लाख रुपये आणि २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ८७२ कोटी २३ लाख रुपये देण्यास मान्यता देण्यात आली.

## महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी द्या: विदर्भ महसूल सेवक संघटनेची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि. १० :** विदर्भ महसूल सेवक संघटना (तालुका शाखा, सिंदखेडराजा जि. बुलढाणा) यांनी महसूल सेवक पदास शासकीय चतुर्थ श्रेणी दर्जा देण्याची ठाम मागणी केली आहे. शासनाने ही मागणी ११ सप्टेंबर २०२५ पर्यंत मान्य न केल्यास १२ सप्टेंबरपासून नागपूर येथे महसूल मंत्री यांच्या निवासस्थानी बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे .

संघटनेचे अध्यक्ष संजय आटोळे, उपाध्यक्ष श्रीमती. निता सोनुने, सचिव रामेश्वर खरात व कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे . आंदोलनादरम्यान पुढे करण्यात आलेल्या १४ ठोस मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.महसूल सेवकांना तात्काळ चतुर्थ श्रेणी लागू करणे,मागणी मान्य होईपर्यंत किमान ₹३०,००० मानधन देणे , ११/१२/२०२४ रोजीचे राजपत्र तात्काळ रद्द करणे. महसूल विभागातील वर्गड पदे कायम ठेवून ८०% राखीव महसूल सेवकांना देणे, दर ३ वर्षांनी सरकारने लागू केलेली १०% वाढीची योजना (जी.आर.) रद्द करणे, चप्पल भत्ता ₹१० वरून ₹३०० करणे , तलाठी व ग्रामविकास अधिकारी भरतीत महसूल सेवकांना ५०% आरक्षण, इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम लागू करणे, निवृत्त महसूल सेवकांना ₹१५,००० पेन्शन लागू करणे , डाक ने-आण करणाऱ्या सेवकांना बिल वेळेत मिळावे, न मिळाल्यास डाक नेण्यास नकार, ग्राम महसूल कार्यालयातील खाजगी ऑपरेटर बंद करणे, महसूल सेवकांकडून वर्ग३ व वर्ग४ ची कामे करून न घेणे, अशी कामे केल्यास अतिरिक्त मानधन देणे, तहसील कार्यालय सिंदखेडराजा येथील रिक्त वर्ग३ व वर्ग ४ पदे तातडीने भरणे व सफाई कामगाराची नियुक्ती करणे. या मागण्या मान्य न झाल्यास १२ सप्टेंबरपासून नागपूर येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे संघटनेतर्फे जाहीर करण्यात आले आहे.

## दोन सराईत चोरट्यांना वरणगावातून अटक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.१० :** एलसीबीच्या धडाकेबाज कारवाया सुरु असून, पथकाने वरणगावातून चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. मलकापूर व नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील २ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले. १,००,००० रुपये किमतीची बजाज पल्सर आरोपीकडून जप्त करण्यात आली असून दोन आरोपींना अटक केली आहे. अब्बास इबादात शेख अली २३ रा. भूसावळ ह. मु. वरणगाव जि. जळगाव, साहिल हुसैन मोहम्मद इज्जत अली जाफरी २१ रा. बिदर, कर्नाटक असे आरोपीचे नावे आहेत. घटनेची हकीकत अशी की, निकीता गोरे रा. श्रीराम कॉलनी, मलकापूर ह्या नातेवाईकांसह गणपती दर्शन घेऊन घराकडे जात असतांना अनंतकृपा फर्निचर गोडावून समोर आरोपींनी मागून दूचाकीवर येऊन गळ्यातील १८ ग्रॅम वजनाची १२६००० रुपये किमतीची पोथ जबरीने हिसकावून पोबारा केला होता. याबाबत मलकापूर शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासचक्र फिरवून दोन्ही आरोपींना गजाआड करून मलकापूर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये, हेड कॉन्स्टेबल दीपक लेकुरवाळे, शेख चांद, गणेश पाटील, गजानन गोरले, आशा मोरे, निवृत्ती पुंड, शिवानंद हेलगे, राजू आडवे, कैलास टोंबरे यांनी केली.

## डोणगावातील दोन मंडळांचा अनोखा उपक्रम पाच गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दत्तकत्व

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.१० :** गणेशोत्सव म्हणजे फक्त सजावट, मिरवणुका आणि सांस्कृतिक कार्यक्रम एवढंच नाही तर समाजासाठी काहीतरी देण्याची संधीही आहे, हे प्रत्याक्षात उतरवून दाखवले आहे शिवास्त्र प्रतिष्ठान गणेश उत्सव मंडळ व शिवरुद्र गणेश उत्सव मंडळ, डोणगाव यांनी. प्रत्येक गणेश मंडळाजवळ वर्गणीमधील काही रक्कम शिल्लक राहत असते. हाच शिल्लक निधी त्यांनी एका अनोख्या आणि प्रेरणादायी उपक्रमासाठी वापरला आहे.

या दोन मंडळांनी मिळून अतिशय गरीब व हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या पाच विद्यार्थ्यांना या व येणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी दत्तक घेतले आहे. या निर्णयामुळे गावभर कौतुकाचा वर्षाव होत असून समाजापुढे एक आदर्श उभा राहिला आहे. अनाठायी खर्चाऐवजी जर प्रत्येक गणेश मंडळ सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेतले तर अनेक गरजूंच्या समस्या कमी होऊ शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. शिवास्त्र मंडळाचे अध्यक्ष सुबोध आखाडे, अंकुश आखाडे, पवन आखाडे, विशाल आखाडे, राहुल आखाडे, अमोल बोडके, ओम आखाडे, देवानंद आखाडे, विठ्ठल आखाडे तसेच शिवरुद्र मंडळाचे अध्यक्ष वैभव पंजाबराव पळसकर, विठ्ठल भुतेकर, मयूर पांडे, ओम पांडे, अनिल वडवकर, प्रकाश अजगर, पृथ्वीराज काळे, अनिकेत वच्छे, संदेश पळसकर, आशिष लांभाडे, हनुमान घुगे, कार्तिक पळसकर यश शर्मा आकाश आखाडे आदित्या पळसकर या तरुणांनी या कार्यात मोलाचा वाटा उचलला. मार्गदर्शक म्हणून पंजाब पळसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# महसूल पंधरवड्याचा लाभ घ्या!

## तहसीलदार अजित दिवटे यांचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१०:** सर्वसामान्यांसाठी महसूल विभागाच्या सेवा अधिक सोप्या आणि पारदर्शक बनवण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. सिंदखेडराजा तहसील कार्यालयाच्या वतीने तहसीलदार अजित दिवटे यांनी नागरिकांना या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या पंधरवड्यात अनेक प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत, ज्यामुळे नागरिकांची कामे जलद गतीने पूर्ण होतील.

महसूल पंधरवड्याची उद्दिष्ट्ये आणि महतत्व

महसूल पंधरवाडा आयोजित करण्यामागे अनेक महतत्वाची उद्दिष्ट्ये आहेत. या पंधरवड्यात महसूल विभाग सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी थेट त्यांच्यापर्यंत पोहोचणार आहे.




**मुख्य उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:**

* प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे: जमीन, घर, वारस नोंदणी, सातबारा आणि फेरफार यांसारख्या महसुलाशी संबंधित प्रलंबित अर्ज आणि दावे जलद गतीने निकाली काढणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

*जागरूकता वाढवणे: ई-पिक पाहणी, डिजिटल स्वाक्षरीत सातबारा, आणि ऑनलाईन फेरफार यांसारख्या आधुनिक सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे, जेणेकरून ते घरबसल्या या सुविधांचा लाभ घेऊ शकतील.

*सुविधा एकाच ठिकाणी: प्रत्येक गावात शिबिरे आयोजित केली जातील, जिथे नागरिकांना उत्पन्न, जातीचा, रहिवासी आणि नॉन-क्रिमीलेअर यांसारखे आवश्यक दाखले एकाच ठिकाणी मिळतील.

*प्रशासकीय पारदर्शकता: प्रशासनामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणून ते अधिक लोकभिमुख बनवणे, तसेच नागरिकांचा सहभाग वाढवणे.

पंधरवड्यात राबवण्यात येणारे विशेष कार्यक्रम

या पंधरवड्यात नागरिकांना थेट लाभ देण्यासाठी अनेक विशेष कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत:

*नोंदी अद्ययावत करण्याची मोहीम : जुन्या नोंदी, वारस नोंदी आणि फेरफाराच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी एक विशेष मोहीम राबवली जाईल.

*गावपातळीवर शिबिरे: महसूल अधिकारी आणि कर्मचारी प्रत्योक तालुक्यात आणि गावात शिबिरे घेऊन नागरिकांच्या समस्या जागेवरच सोडवतील.

*अतिक्रमण हटाव मोहीम: सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी विशेष कारवाई केली जाईल, जेणेकरून सार्वजनिक जागांचा योग्य वापर होईल. शेत रस्ते , पादन रस्ते, अतिक्रमण झालेल्या ठिकाणी खुले करून देण्यावर जास्तीत जास्त भर राहणार आहे हे प्रकरणे सहजासहजी खुलेन झाल्यास पोलीस संरक्षणात खुले केले जातील.

*गांधी जयंतीची सांगता: या पंधरवड्याची सांगता २ ऑक्टोबर, महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी केली जाईल. यानिमित्ताने कार्यालयांची आणि परिसराची स्वच्छता केली जाईल, तसेच गांधीजींच्या ग्राम स्वराज्य आणि प्रशासकीय सुलभता या विचारांवर भर दिला जाईल.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा



बुलडाणा, गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५

**महत्वाचे**

## वंचित बहुजन आघाडीच्या तालुका पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**खामगाव :** तालुक्यात वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्ष देवा हिवराळे यांच्या हस्ते तालुका कार्यकारिणीच्या नव्या पदाधिकाऱ्यांचा गौरव सत्कार गजानन कॉलनी मधील माता रमाई सभागृह येथे करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीची पूजा करून, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबडेकर, महात्मा फुले यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ७९ पदाधिकाऱ्यांची जम्बो कार्यकारणी आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी देवा हिवराळे होते. या कार्यक्रमात जिल्हाध्यक्षांनी पदाधिकाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि सम ाजकल्याणासाठी, बंचित वर्गाच्या हक्कांसाठी कार्य करण्याचे प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळू मोरे ता. महासचिव तर आभार प्रदर्शन गौतम नाईक ता. महासचिव यांनी केले.

## अपघातातील दुसऱ्या युवकाचाही मृत्यू

**खामगाव :** काम आटोपून मलकापूर येथून परतणाऱ्या खामगाव येथील दोन मोटरसायकलस्वारांचा खामगाव नजीक सैनिक ढाब्यासमोर खामगाव येथून भरधाव जाणाऱ्या ट्रकने धडक दिल्यामुळे ३ सप्टेंबर रोजी रात्री अपघात झाला होता. त्या अपघातामध्ये मुकेश बजरंग शर्मा (२७) हा जागीच ठार झाला. तर जोडीदार मोटरसायकलस्वार सुरज गादगे (२५) रा. घाटपुरी नाका हा गंभीर जखमी झाला होता. त्याला सुरुवातीला खामगाव सामान्य रुग्णालयात तेथून खामगाव सिल्वर सिटी हॉस्पिटलमध्ये आणि तेथून अकोला येथील आयकॉन हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारसाठी दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना ५ सप्टेंबर रोजी त्याचा रात्री मृत्यू झाला. त्याचे पार्थिवाचर गणेश विसर्जनाच्या दिवशी ६ सप्टेंबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या या मृत्यूमुळे मोटरसायकल अपघातात मृतकाची संख्या दोन झाली असून घडलेल्या या घटनेबद्दल समाजात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## अंजुमन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना रौप्य व कांस्यपदक

**खामगाव :** अंजुमन हायस्कूल व ज्युनियर कॉलेज खामगावच्या तीन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय पावर लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण, गरीव आणि कांस्य अशी तीन पदके जिंकून अंजुमर राय उंचावले. ८ सप्टेंबर रोजी तालुका क्रीडा संकुल मलकापूर येथील मैदानावर शालेय स्तरावर पावरलिस्टिंग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या स्पर्धामध्ये १२० किलो वजन गटात अंजुमन हायस्कूलचा विद्यार्थी मोहम्मद अतीव याने सुवर्णपदक स्किले त्याचप्रमाणे ८३ किलो बजन गटात निस अहमदनेप्यपदक आणि ७४ किलो बन गटात फजल अहमदने कांस्य पदक जिंकले. अशाप्रकारे अंजुमन हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या या विद्यार्थ्यांनी तीन पदके कूचे नावले ही जिल्हास्तरीय स्पर्धा जिंकून, तिन्ही विद्यार्थी विभागीय स्तरावर आपले स्थानमाचे प्रबल दावेदार बनले आहेत. अंजुमन हायस्कूल ज्युनियर कॉलेजच्या या तिन्ही विद्यार्थ्यांनी जिल्हास्लीव स्पर्धेत विजय मिळवला. या विजयाबदल अंजुमन मुक्ति इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. बकार उल हक खान, प्राचार्य अहफाज उल हक खान, उपप्राचार्य उमेर मोहम्मद खान पर्यवेक्षक शकील अहमद इत्यादींनी संघातील सर्व खेळाडूंचे आणि क्रीडा शिक्षक शकील अहमद सैय्यद सोहेल नासिर अन्सारी इत्यादींचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# गायींची क्रूरतेने वाहतूक करणारे वाहन जप्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि. १० :** गावोगावी जनावरांच्या छळाच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. जनावरांच्या अवैध व क्रूर वाहतुकीला आळा घालण्यासाठी शासन व प्रशासन वेळोवेळी प्रयत्नशील आहे. तरीदेखील काही ठिकाणी अशा घटना उघडकीस येत आहेत. अशीच एक धक्कादायक घटना डोणगाव येथे घडली असून, गायींची क्रूरपणे वाहतूक करणारा एक आयशर ट्रक पोलिसांनी पकडला आहे. या घटनेत एक गाय मृत अवस्थेत आढळून आली असून, पोलिसांनी ट्रकसह एकूण साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. घटनेविषयी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास शिवाजी शाळेसमोर डोणगाव येथील नागरिक कृष्णा रमेश बकाल हे उभे असताना, संशयास्पदरीत्या जनावरे भरून जाणारा एक आयशर ट्रक दिसून आला. आयशर क्रमांक १९ ७९३१ या वाहनात तब्बल १५ जनावरे कोंबून क्रूरपणे भरल्याचे दिसताच बकाल यांनी तत्काळ पोलिसांना फोन करून माहिती दिली. डोणगाव पोलिस कर्मचारी तात्काळ




घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहनाची तपासणी केली असता, त्या १५ जनावरे अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून भरलेली असल्याचे उघड झाले. त्या एक लाल रंगाची शिंगे असलेली गाय मृत अवस्थेत आढळली. या प्रकारामुळे जनावरांच्या छळाची गंभीर बाब पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. या कारवाईत पोलिसांनी जनावरांची अंदाजे किंमत १ लाख ४५ हजार रुपये एवढी ठरवली आहे. तर आयशर ट्रकची किंमत सुमारे ४ लाख रुपये असून, अशाप्रकारे एकूण ५ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कृष्णा बकाल यांच्या तक्रारीवरून आरोपी विजय भागचंद मान (वय ४५ वर्षे, रा. मालेगाव जातपांडे, ता. मालेगाव, जि. नाशिक) आणि हजु बबजु चव्हाण (वय २५ वर्षे, रा. ज्योती नगर, धानोरी, ता. पुसद, जि. यवतमाळ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१)(ड), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मधील कलम ५(ब), तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम ३२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार मंगेश खडसे करीत आहेत. गेल्या काही वर्षांत जनावरांची अवैध वाहतूक आणि त्यातून होणारा छळ हा गंभीर प्रश्न ठरत आहे. शासन व प्रशासनाने यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले असले तरी ग्रामीण भागात असे प्रकार सर्रास आढळून येतात. पोलिसांच्या कारवाईमुळे अशा अवैध कृत्यांना काही प्रमाणात आळा बसतो, मात्र अशा घटना पुन्हा घडत असल्याने जनावरांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सदर प्रकरणात आयशर ट्रक पकडून, जनावरे व मृत गाय यांची सुटका करून एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. या घटनेमुळे डोणगाव परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांनी पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक केले आहे. त्याचबरोबर अशा प्रकारच्या घटनांना आळा बसावा यासाठी संबंधित विभागांनी आणखी कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही होत आहे.

# चिखली होमगार्ड गणेशोत्सवात शालेय बॅग वाटप व आरोग्य तपासणी



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगरूळ नवघरे दि.१० :** चिखली तालुका होमगार्ड समादेशक कार्यालयातर्फे आयोजित गणेशोत्सव याही वर्षी मोठ्या उत्साहात पार पडला. गणपती विसर्जन सोहळा ८ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडला. विशेष म्हणजे यावर्षी कोणतेही वाद्य न वाजवता तो खर्च वाचवून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्या वाटप करण्यात आले. या उपक्रमात ४० विद्यार्थ्यांना शालेय बॅगा वाटप करण्यात आल्या. तसेच चिखली महा-लॅबच्या माध्यमातून शहरातील नागरिक व सर्व होमगार्ड सैनिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी रक्तदान शिबिराचेही आयोजन झाले असून त्या १० होमगार्ड सैनिकांनी रक्तदान केले. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिखली विधानसभा आमदार सौ. श्वेता महाले पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार संतोष काकडे, देवाभाऊ लाडकी नागरी सहकारी पतसंस्थेच्या उपाध्यक्ष सौ. छाया खरात, भाजपा शहराध्यक्ष सागर पुरोहित, बिट्टू भावसार आदी मान्यवर उपस्थित होते.

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमावर कठोर कारवाई करण्याची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.१० :** दि.७ सप्टेंबर २०२५ ला अकोला येथे काही समाजकंटकाने कोणी घरी नाही याचा गैरफायदा घेऊन हिंदू समाजाच्या १३ वर्षीय मुलीवर अत्याचार केले घरची मंडळी गणेश विसर्जना निमित्त बाहेर गेले होते. ती वेळ साधून, एका समाजकंटकांने अकोला गुलजारपूरला येथील १३ वर्षीय बालिकेवर अत्याचार केला.

त्या नराधमावर



कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी त्याकरिता, नाबालिक बालिकेला न्याय मिळण्याकरिता शेगाव तहसील कार्यालय मार्फत महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हिंदूवादी संघटना तर्फे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भाजपा शेगाव शहर व ग्रामीण भोई समाज व बुलढाणा जिल्हा, सकल हिंदू समाज संघटना, शिवसेना तर्फे निवेदन देण्यात आले.

# गोर बंजारा समाजाचा आरक्षण प्रश्न पेटला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि१० :** महाराष्ट्रातील गोर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याबाबत तातडीने शासन निर्णय घेण्याची मागणी आज मेहकर तहसील कार्यालयावर झालेल्या मोठ्या आंदोलनातून करण्यात आली.

तालुक्यातील शेकडो बंजारा बांधवांनी तहसीलदारांना निवेदन सादर करून हा मुद्दा मुख्यमंत्री महोदयांपर्यंत पोहोचवला. गोर बंजारा समाजाचे प्रतिनिधींनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले की, इतिहास, परंपरा, जीवनशैली, शैक्षणिक वंचितता आणि सामाजिक-आर्थिक परिस्थिती या सर्व निकषानुसार समाज अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी पात्र आहे, मात्र केवळ महाराष्ट्र राज्यातच या समाजाला ''विजेंटी-ए'' प्रवर्गात ठेवण्यात आले आहे. यामुळे समाजावर भोर अन्याय झाला असून तातडीने दुरुस्तीची गरज आहे. निवेदनात पुढील महतत्वाचे पुरावे सादर करण्यात आले. हैद्राबाद राज्याच्या १९२१ च्या गॅजेटनुसार गोर बंजारा लंबाडी समाजाचा उल्लेख एसटी प्रवर्गात आहे. जिल्हा गॅजेट्स व महसूल रेकॉर्डमध्ये गोर बंजारा समाजाची आदिवासी स्वरूपाची नोंद आढळते. तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, राजस्थान या राज्यांत गोर बंजारा समाजाला एसटी प्रवर्गाचा दर्जा देण्यात आला आहे. भारत सरकारच्या १९६१ ते २०११ पर्यंतच्या सहा जनगणनांमध्ये लंबाडी, बंजारा, गोर समाजाची स्वतंत्र नोंद करण्यात आली आहे. ग्रामीण व डोंगराळ भागातील लोकसंख्या प्रमाण या समाजाच्या भौगोलिक अलगाव व आदिवासी स्वरूपाला अधोरेखित करते. यावेळी समाज प्रतिनिधींनी सांगितले की,



''मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण देताना वापरलेला ऐतिहासिक रेकॉर्डचा आधार गोर बंजारा समाजालाही लागू करावा. आमचा समाज सामाजिक न्याय व संवैधानिक अधिकार मिळविण्यास पात्र असून यापुढे दुर्लक्ष झाल्यास आम्हाला न्यायालयीन लढाई उभारावी लागेल.'' शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास हायकोर्ट व उच्च न्यायालयात राईट पिटीशन दाखल करण्यात येईल, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

# मोताळा येथे जनसुरक्षा विधेयक विरोधात आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.१० :** महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ विरोधात आज मोताळा येथे बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार मोताळा तालुका काँग्रेस कमिटीचे आंदोलन पार पडले.

या आंदोलनात काँग्रेसचे तुळशीराम नाईक जिल्हा उप अध्यक्ष, गणेश पाटील जिल्हा सरचिटणीस, साहेबराव डोंगरे, मिलिंद जैस्वाल, गजानन मामलकर, नितीराज शिह राजपूत, निना इंगळे, विलास



पाटील, अतुल जोहरी, भागवत किंगे, बाळाभाऊ खाखरे, बाबुराव खांडेबरळ, विनोद गायकवाड, अबीद कुरेशी, विनायक पाटील, भिका घोंगडे सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मोताळा येथे झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी सरकारच्या जनविरोधी व लोकशाहीविरोधी भूमिकेविरोधात जोरदार घोषणा दिल्या. जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन यशस्वीरीत्या पार पडले. आंदोलनादरम्यान वक्त्यांनी महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हे घटना विरोधी असून, नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणारे असल्याचा आरोप केला. हे विधेयक मागे घेण्याची मागणीही यावेळी जोरदारपणे करण्यात आली.

# सरसकट पीकविमा व ओला दुष्काळ जाहीर करा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.१० :** शिवसेना युवासेना, किसानसेनेच्यावतीने चिखली तालुक्यात शेतकऱ्यांना सरककट पिक विमा मिळावा, तसेच मंडळनिहाय नव्हे तर सरसकट ओला दुष्काळ जाहिर करावा. यासाठी तहसिलदार यांच्या दालनात शिवसेना पदाधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम केले. पिक विमा मिळत असतांना कोणाला कमी, तर कोणाला जास्त, तर कोणाला काहीच नाही. यामध्ये तफावत आढळून येत असल्याचे पुरावेच तहसिलदार यांना सादर करण्यात आले. तसेच सरसकट ओला दुष्काळ जाहिर करावा, व श्रावण बाळ योजनेचे रखडलेले प्रकरणे निकाली काढण्यात



यावे. व बंद पडलेला राशनचा माल पैसे स्वरुपात न देता सरळ राशन वितरण करण्यात यावे. यासाठी चिखली शिवसेना,युवासेना, किसानसेना यांच्यावतीने तहसिलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदन देते वेळी सर्व शिवसेना, युवासेना, किसानसेना, ज्येष्ठ शिवसैनिक, आजी माजी लोकप्रतिनिधी, आजी माजी पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांना आरोग्य शिबिराचा मोठा दिलासा, शेंदुर्जन येथे मोफत आरोग्य सेवा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.१० :** म.रा. बांधकाम कामगार विभागाच्या वतीने शेंदुर्जन गावामध्ये दिनांक ९ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीच्या भव्य प्रांगणात बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामुळे स्थानिक कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्याच्या बाबतीत मोठा दिलासा मिळाला. या शिबिरात बांधकाम कामगार आरोग्य विभागाच्या फिरत्याा दवाखान्याची ( ) टीम उपस्थित होती. या टीममध्ये जिल्हा समन्वयक सचिन संजय जाधव, डॉक्टर शेहजाद खान, तसेच ब्रदर्स अनिकेत पवार, विशाल जाधव, झाकीर शेख आणि इतर कर्मचारी यांचा समावेश होता. या सर्व टीमने बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची आरोग्य तपासणी केली. या शिबिरात कामगारांची विविध



प्रकारची तपासणी करण्यात आली. फिरत्याा दवाखान्यामध्ये रक्त तपासणी, मलेरिया, डेंग्यू, डोळ्यांची चाचणी, तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारासारख्या अनेक गंभीर आजारांची तपासणी केली गेली. याव्यतिरिक्त, पोटाचे विकार, कर्करोग, अशक्तपणा, सांधेदुखी आणि इतर सामान्य आरोग्य समस्यांवरही तपासणी आणि उपचार उपलब्ध होते. ज्या रुग्णांच्या तपासणीमध्ये काही आरोग्य समस्या आढळल्या, त्यांना तात्काळ आवश्यक औषधे पुरवण्यात आली. फिरत्याा दवाखान्यामध्ये तपासणीसाठी आवश्यक असलेली सर्व साधने उपलब्ध असल्याने, रुग्णांना तपासणी करताना कोणतीही अडचण आली नाही. या शिबिरामध्ये कामगारांना आरोग्य योजनेबद्दल सविस्तर माहिती आणि योग्य मार्गदर्शनही देण्यात आले. या शिबिरामुळे, रोजच्या कामात व्यस्त असलेल्या कामगारांना आपल्या आरोग्याची मोफत आणि सोयीस्कर तपासणी करण्याची संधी मिळाली, ज्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला.

# अखेर मेहकरच्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले उद्‌घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.१० :** लोणार विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते मेहकरच्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. मेहकर येथिल गवळीपूरा येथे शादींखाना करण्याची मागणी येथिल नागरिकांनी अनेक वर्षापासून केली होती . यासाठी विशेष नागरी सुविधा अंतर्गत रू ४० लक्ष खर्चाच्या कामांची निविदा मंजूर होती. तसेच बालाजी कन्स्ट्रक्शन ला कामाची निविदा देखिल देण्यात आली होती परंतु तरिही नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे शादीखान्याचे काम सुरू होऊ शकले नव्हते. या संदर्भात गवळीपुरा येथिल नागरिकांनी आमदार खरात यांच्या कडे या कामासाठी सतत पाठपुरावा सुरू ठेवला होता . त्यानुसार आज दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी या कानाचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज केले .

या प्रसंगी मेहकर नगरपालिका प्रशासक रामराजे कापरे, शहर प्रमुख किशोर गारोळे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवसेना तालुका अधिकारी ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, संदीप गारोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हा प्रमुख निसार अन्सारी, रफिक हसन गवळी, छोटू गवळी, इमाम गवळी, बापू पर्सुवाले, रहीम चौधरी, जंगली रोहिवाले, हसन पिरु नवरंगाबादी, फिरोज रहमान, निन्नु भाई यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गवळीपुरा येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गवळीपुरा परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांनी ग्रस्त होता. घाणीचे साम्राज्य, पायाभूत सुविधांचा अभाव या कारणांनी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आमदार खरात सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ४० लक्ष रुपये खचाचा शादीखाना तसेच १० लक्ष रुपयांचा संरक्षणभिंतीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामामुळे गवळीपुरातील खुल्या भूखंडात साचलेली घाण दूर होऊन एक भव्य व आधुनिक इमारत उभी राहणार आहे. यामुळे नागरिकांची दीर्घकाळची समस्या दूर होऊन सोयीसुविधांनी युक्त जागा उपलब्ध झाली आहे. नागरिकांच्या मुलभूत गरजांकडे लक्ष देत समस्यांचे निराकरण करण्याचे काम आमदार खरात यांनी हाती घेतल्यामुळे गवळीपुरा परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर कामाच्या वॉल कंपाऊंट साठी अधिकचा निधी लागल्यास उपलबध करून देण्यात येईल असेही आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन

**खामगाव :** कृषी उत्पन्न बाजार समिती यार्ड येथे श्री श्यामबाबा भव्य दरबार व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने कुउबास यार्डातील श्यामबाबा यांच्या भव्य दरबारात श्री श्याम लखदातार परिवार अमरावती यांच्यावतीने अन्न-धान्याने बाबांचा श्रृंगार करण्यात येत आहे. १४ सप्टेंबर २५ रोजी सकाळी ८ वाजता कॉटन मार्केट ते श्री श्यामबाबा मंदिर पर्यंत निशान यात्रा काढण्यात येणार आहे. तर सायंकाळी ६.३० वाजता कुउबास यार्डात गोपाल शर्मा (हारे) अकोला व अधिष्ठा-अनुष्का (मंदनौर) यांचा श्री श्यामबाबा यांच्यावर आधारीत भजन संध्या कार्यक्रम होणार आहे. भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त श्यामप्रेमी कुउबास खामगाव यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### सजनपुरी येथे वीज चोरी

**खामगाव :** महावितरणच्या पथकाने १० मार्च २५ रोजी सकाळी वीज चोरी शोध मोहिमे अंतर्गत १०.३० वा.च्या सुमारास बजरंग उत्तमराव निळे (वय ४०, रा.सजनपुरी) यांच्या घरातील विद्युत मिटरची तपासणी केली असता विद्युत मिटरमध्ये छेडछाड करून मागील अंदाजे १२ महिन्यात १७७८ युनिट (कि. ३० हजार ५२० रू. अधिक तडजोड रक्कम २००० रु) अशी एकूण ३२५२० रूपयांची वीज चोरी केली. याप्रकरणी सजनपुरी वितरण केंद्राचे सहा अभियंता कलीमुन्ना रहेमतुल्ला खान यांनी काल ९ सप्टेंबर २५ रोजी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द कलम १३५,१३८ भाविका नुसार गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पीएसआय निलेश लबडे करीत आहेत.

### राणा लकी सानंदा स्कुलच्या विद्यार्थिनींना पारितोषिक

**खामगाव :** श्री चंदनशेष गणेशोत्सव मंडळातर्फे घेण्यात आलेल्या सामुहिक नृत्य स्पर्धेत अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. त्यामधून राणा लकी सानंदा एज्युकेशनल शावर च्या ग्रुप व मध्ये वर्ग ३ री ते ५ वी तील विद्यार्थिनींनी सुंदर अशी गणेश वंदना सादर करून प्रेक्षकांची मने जिंकून तृतीय क्रमांका पारितोषिक पटकावले. पारीतोशिकाचे स्वरूप मेमेंटो व रोख बक्षीस देण्यात आले. समावेश असलेल्या विद्यार्थिनी मध्ये विदिशा वानखडे, ईश्वरी नळकांडे, धनश्री काटकर, सारथी मोरे, निष्ठा नागवाणी, शालवी राठोड, स्पृशा तायडे, पंखुडी मुगल, पायल काकडे, दिशा छतवाणी, आराध्या वाबळे, नेहल छतवाणी, मनस्वी गवई, मानवी बोदडे, प्रेरणा वाडे, त्रिशा सूर्यवंशी, गीतिका अग्रवाल, आराध्या अनभोरे, प्राची सोळंके, आदी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून आपल्या कलेचे प्रदर्शन केले. विजेत्याा सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत शालेय अध्यक्ष राणा अशोकुमारजी सानंदा, प्राचार्य श्री. संजयजी शर्मा सर, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे उपस्थितीत स्वागत करण्यात आले. शिक्षक व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. असे प्रसिद्धीप्रमुख कल्याणसिंग वतपाळ यांनी कळविले आहे.

### तरूणी बेपत्ता

**खामगाव:** वाडी येथील साई नगरातील रहिवासी कु. शिवानी रणजीत गोहर (२४) ही तरूणी ८ सप्टेंबर २५ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास बाहेर जाऊन येते असे सांगुन धरून निघुन गेली. मात्र घरी परतलीनाही. तिचा सर्वत्र शोध घेतला असता मिळून आली नाही. त्याामुळे सौ. आरती रणजीत गोह यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टें मध्ये बेपत्ताची नोंद घेण्यात आली असुन पुढील तपास एएसआय गजानन चोपडे करीत आहेत.

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या

### खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीची जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१० :** जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, माजी आमदार राहुल बोंद्रे व पदाधिकाऱ्यांवर सुडबुध्दीने राजकीय दबावाखाली दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अशी मागणी खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आज ता.१० सप्टेंबर रोजी एएसपी श्रेणीक लोढा यांच्या मार्फत जिल्हा पोलिस अधिक्षक निलेश तांबे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमुद आहे की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसा निमित्त दि.३१ ऑगस्ट रोजी ''मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी'' या मॅरेथॉन कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यात करण्यात आले होते. सर्वच ठिकाणी हा कार्यक्रम पूर्णतः शांततामय व संवैधानिक अधिकारांचे पालन करीत पार पडला. मात्र, चिखली येथे राजकिय सुडबुध्दीने जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व माजी आमदार राहुल बोंद्रे तसेच इतर १३ शहर व तालुका कांग्रेस पदाधिकाऱ्यांवर स्फोटक व ज्वालाग्रही पदार्थांचा वापर करुन सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याचे खोटे व अजामीनपत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाची ही कृती म्हणजे लोकशाहीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी आणि संवैधानिक मूल्यांचा अपमान करणारी आहे. जिल्हा अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्यावर नुकतीच हृदयशस्त्रक्रिया झालेली असतांना त्यांच्यावर अशा स्वरूपाचे गुन्हे लावणे म्हणजे सत्तेच्या गैरवापरातुन अशोभनिय अश्या राजकीय सूड भावने पोटी रचलेले षडयंत्र आहे. तरी राहुल बोंद्रे व सहकारी काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व खोटे व अजामीनपात्र गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावेत तसचे या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि राजकीय दबावात येवून खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या चिखली येथील ठाणेदारांना तात्काळ निलंबित करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील, तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, जिल्हा उपाध्यक्ष शेख जूलकर शेख चांद, शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, डॉ.विप्लव कविश्वर, कॉंग्रेस अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष शफी, अल्पसंख्याक विभाग सचिव वसीम, कॉंग्रेस अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष असलम पटेल, कॉ. जितेंद्र चोपडे, शिवसेना माजी विधानसभा संघटक रवि महाले, शिवसेना तालुका अध्यक्ष श्रीराम खेलदार, शिवसेना शहर अध्यक्ष रवी जैन, कैलास फाटे, अनंतराव ताठे, गजानन वाकुडकर, बबलू पठाण, पांडुरंग राखोंडे, शे.शब्बीर शे.बुढन, कॉ.जितेंद्र चोपडे, तहसीन शाह, प्रणव जोशी, पंकज घोगले, रूषी भोसले, विशाल कवठेकर, अक्षय शंकरवार, काशिनाथ मुन्हे, लोमेश भोयर, अनिल ठाकरे, तुशार सोनोने, महादेव फासे, रामचंद्र भारसाकळे, गजानन होगे, सुरज बेलोकार, अहमद अनसारी, बबलू भटकर, सय्यद जाफर, गजानन माने, अजय पवार, अजय तायडे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व महाविकास आघाडीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

## सार्वजनिक रस्त्यात अतिक्रमणामुळे काम ठप्प; अधिकाऱ्यांनाच पडला नोटीसचा विसर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि. १० :** राधाकृष्ण सोसायटी परिसरातील सार्वजनिक रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे गेल्या दोन महिन्यांपासून रस्त्याचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. महाशक्ती बँगल्सच्या पाठीमागे रवी पटेल यांचे अतिक्रमण असल्याचे समोर आले असून, नगरपालिका बांधकाम विभागाने तीन वेळा नोटीस देऊनही कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

रस्त्याच्या कामादरम्यान तारेचे कुंपण व इतर अडथळे हटविले गेले नाहीत, परिणामी काम थांबले आहे. तरीदेखील ठेकेदाराचे बिल काढले जात असल्याची माहिती मिळाली आहे. या संदर्भात राम झांबरे यांनी वारंवार अधिकाऱ्यांना निवेदन देऊन अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती. मात्र, अधिकाऱ्यांकडून उडवा-उडवीची उत्तरे मिळाल्याने संताप व्यक्त होत आहे. नियमाप्रमाणे, वारंवार नोटीस देऊनही अतिक्रमण न हटवल्यास पोलिसांचा बंदोबस्त घेऊन कारवाई करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची होती. परंतु अधिकाऱ्यांनाच आपल्या आदेशाचा विसर पडल्याचे चित्र दिसत आहे.

मुख्याधिकाऱ्यांची प्रतिक्रिया

या बाबत मलकापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी सांगितले की, ''अतिक्रमण हटविण्यासाठी मलकापूर पोलीस प्रशासनाकडे आम्ही निवेदन दिले आहे. मात्र बंदोबस्त उपलब्ध न झाल्याने कारवाई अडली आहे.''

पोलीस विभागाची भूमिका

या संदर्भात शहर पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांना विचारले असता त्यांनी स्पष्ट केले की, ''नगरपालिकेकडून आमच्याकडे बंदोबस्ताची मागणी झाल्यास आम्ही तत्काळ देण्यास तयार आहोत.''

नागरिकांचे म्हणणे आहे की, नगरपालिका आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वयाअभावी रस्त्याचे काम रखडले आहे. अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे रस्त्याच्या कामात अडथळे निर्माण होत असून, अखेर त्रास मात्र नागरिकांना सहन करावा लागत आहे.

## शिवसेना किसान सेनेच्या उपजिल्हाप्रमुखपदी अमोल ठाकरे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**संग्रामपूर दि. १० :** शिवसेना किसान सेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी अमोल ठाकरे यांची नियुक्ती केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार यांनी ही नियुक्ती एका नियुक्ती पत्राद्वारे केली आहे . सदर नियुक्ती वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शांताराम दाणे , शिवसेना तालुकाप्रमुख केशव ढोकणे, संतोष लिप्ते शिवसेना शहर प्रमुख शेगांव यावेळी उपस्थित होते. अमोल ठाकरे हे शिवसेना पक्षात उत्कृष्ट शिवसैनिक म्हणून काम करीत असल्यामुळे याचीच दखल घेऊन शिवसेना किसान सेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी ही नियुक्ती करण्यात आली आहे. अमोल ठाकरे यांची शिवसेना किसान सेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी नियुक्ती झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये व शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## सृष्टीमंगलम् प्रतिष्ठानचा नाविन्यपूर्ण उपक्रम; दगडमातीचे वनराई बंधारे निर्मिती

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि. १०:** दरवर्षीच पावसाळ्यात डोंगरावरून लाखो लिटर पाण्यासोबतच हजारो टन माती/ मृदा वाहून जाते व ज्यामुळेच धरणातील पाणी साठविण्याच्या क्षमतेला अडथळे निर्माण होतात. म्हणूनच शासकीय व सामाजिक स्तरावर वनराई बंधारे निर्माण करण्याची एक सोपी पध्दत काही वर्षापूर्वी अस्तित्वात होती ज्यास येथील सृष्टीमंगलम् प्रतिष्ठानच्या वतीने पुन्हा मुर्तरूप देण्याचे काम गेल्या पाच वर्षापासून अविरत सुरू ठेवले असून यावर्षी वेगवेगळ्या दिन विशेषांचे औचित्य साधून जवळपास पाच वनराई बंधारे निर्माण केले आहेत.

या कार्यासाठी सकल सामाजिक संस्थांचा दरवर्षीच हातभार लागत असून आज पर्यंत अनेक बंधारे लेकुरवाळी टेकडी, नंदाखोरा, सोनबर्डी व जाफ्राबादी टेकडीवर निर्माण केले असून यामाध्यमातून लाखो लिटर पाणी जमिनीत खोलवर जीरविण्यात येत असून सोबतच हजारो टन मृदा संवर्धन करण्यात येत आहे.या उपक्रमाचा फायदा नजिकच असलेल्या शेतकरी व शेतजमीनीस होत असल्याचे शेतकरी ग्वाही देत आहेत. सामाजिक सेवेतून विधायक कार्य पार पडतात याला जर शासकीय हातभार लागला तर नक्कीच निसर्ग संवर्धन होईल. यावर्षी




फोटोग्राफी डे, फ्रेंडशिप डे ,वन महोत्सव सप्ताह, श्रावण सोमवार अशा निमित्त वनराई बंधारे निर्माण करून त्या बंधाऱ्यांना त्याच दिन विशेषाची नांवे देण्यात आली.दगड मातीच्या या बंधाऱ्यांची ऊंची तीन ते चार फूट असून लांबी पंधरा ते पंचवीस फूट आहे.

ज्यामुळेच मोठ्याप्रमाणात पाणी अडवा - पाणी जिरवा उपक्रमा सोबतच मृदु संधारण सुध्दा होत आहे. वरील उपक्रमास कलाध्यापक संजय गुरव यांचे मार्गदर्शन लाभत असून विजय खंडागळे, गणेश कोकाटे, संदीप फंदाट, वैभव कारंजकर, राजेश शर्मा, उमेश खेडकर, दिनेश उखळकर, संतोष डवले, गौरव इंगळे, सुभाष बोचरे आदीचे सहकार्य लाभत असून फोटोग्राफर असोसिएशन खामगाव या उपक्रमात सामील झाले आहे.

## आरक्षण मुद्यावर ओबीसी संघटनांचे तहसीलदारांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.१० :** राज्य शासनाने मराठा आरक्षणा संदर्भात काढलेला चुकिचा जी.आर. रद्द करुन ओबीसी आरक्षणामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात येऊ नये या आशयाचे निवेदन दि. ०९ सप्टेंबर रोजी येथील ओबीसी संघटनांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटल्याप्रमाणे मराठा समाजाचा समावेश ओबीसी मध्ये न करता त्यांना वेगळे आरक्षण देण्यात यावे. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवून गावगाड्यातील सामाजिक मागासलेल्या शेकडो जातींना आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रक्रियेत आपले अस्तित्व निर्माण करण्याची संधी कायम ठेवण्यासाठी ओबीसी आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करण्यात येऊ नये. यावेळी सुभाष बावस्कार , गजानन भोपळे, अमोल राऊत, संजय देवकर, संतोष बोंबटकार, अ.भा.म.फुले समता परिषदेचे तालुका अध्यक्ष,पंकज देविकार, शहर अध्यक्ष दिपक बावस्कार, गजानन देवकर, अमोल राऊत, दिपक सातव, गजानन



> ओबीसी समाजाची अवहेलना करत राज्य सरकारने मराठा आरक्षणावर घा-ईघाईने काढलेला जी.आर. रद्द केला नाही तर महात्मा फुले समता परिषदेचे हजारो कार्यकर्ते तिव्र आंदोलन करतील.
>
> **दिपक बावस्कर**
> म.फुले समता परिषद, शहर अध्यक्ष

भोपळे, अमोल बगाडे, निनाजी घाटे, मनोज बगाडे, गोपाल बोचरे,अरुण घुटे, पंकज सातव, किशोर राऊत, रवी भाऊ वानखेडे, रामेश्वर वानखडे, एकनाथ करांगळे,गणेश गवळी,उमेश ताठे,श्रीधर देवकर, संतोष बोचरे,मंगेश सातव, गोपाल चोपडे आदी उपस्थित होते.

## सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस येथे शिक्षक दिन साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि. १०:** वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, खामगाव संचलित सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे दिनांक ८ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व महान तत्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. प्राचार्य डॉ. अनंतजी कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात शिक्षकांचे महत्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांची भूमिका मोलाची असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला डॉ. पी. व्ही. पिंगळे, प्रा. धीरज वानखडे व प्रा. सचिन इंगळे यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी गीते, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मनमोहक सादरीकरणे केली. शिक्षकांप्रती आपले अनुभव आणि कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी सभागृहात भावनिक वातावरण निर्माण केले. शिक्षकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. श्रीकृष्ण ढोले, प्रा. नीरज दांडगे व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेनेच्या आंदोलनानंतर वीज समस्येवर महावितरणची गतीशील हालचाल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि. १० :** गावठाणातील नादुरुस्त व ओव्हरलोड झालेल्या डीपी संदर्भात शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याला महावितरण कंपनीने तत्काळ दखल घेतली आहे. यानंतर गावठाणातील डीपीचे मेंटेनन्स काम व नवीन अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम मार्गी लागले असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत आहे.

३० ऑगस्ट रोजी शिवसेनेच्या वतीने पिंप्री गवळीतील विजेच्या गंभीर समस्यांवर महावितरणला निवेदन देण्यात आले होते. तलाव शिवारातील काळे यांच्या शेताजवळील डीपीवर २५ ते ३० कनेक्शन असल्याने तो सतत ओव्हरलोड होत होता. गावठाणातील डीपी नादुरुस्त असल्याने विजेचा व्होल्टेज कमी मिळत होता. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांना कायम स्वरूपी त्रास सहन करावा लागत होता. अनेकदा तक्रारी करूनही काम न झाल्याने शिवसेनेने आंदोलनाचा इशारा दिला होता.

या इशाऱ्यानंतर महावितरण प्रशासनाने तत्परता दाखवत सर्वेक्षण केले. त्यानुसार १०० केव्ही क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला असून गावठाणातील नादुरुस्त डीपी व केबल बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या डीपी व केबल बसविण्याचे काम सुरू असून हे काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना नियमित व दर्जेदार वीजपुरवठा होणार आहे.

या मागणीसाठी तालुकाप्रमुख राजेंद्र बघे, शहरप्रमुख चेतन ठोंबरे, उपशहरप्रमुख आनंद सारसर, बिडकर, विद्यार्थी सेना उपजिल्हाप्रमुख निलेश देशमुख, मयूर खंडारे, शंकर देशमुख, लक्ष्मण काकडे, गोपाल जगताप, ओम देशमुख, नरेंद्र गावंडे, फैजल आदींनी पाठपुरावा केला. तर सहदेव पिंपळकर, मनोहर काळे, गोवर्धन वरुडकर, नंदकिशोर कोरडे, भगवान बर्डे, भानुदास वांईदेशकर, पुंडलिक इंगळे, गजानन होगे, तुळशीराम फुंडकर, विकास देशमुख, गजानन डवंगे, पुरुषोत्तम हाडोळे, अनंता शामसुंदर, शालीग्राम पुराने, गोपाल लोखंडे, रवींद्र काळे, दरुबाई डोंगरे, चंद्रभान काटोने, रामभवनसिंह ठाकुर, शेख रशीद, शेख अब्बास, शेख युसुफ, सागरसिंह पवार, संतोष वरुळकार, किशोर काळे आदी शेतकऱ्यांनी सातत्याने मागणी केली होती.

महावितरणने दखल घेतल्यामुळे आता पिंप्री गवळीतील शेतकऱ्यांच्या विजेच्या समस्या सुटण्याची चिन्हे दिसत असून ग्रामस्थांत समाधान व्यक्त होत आहे.

## मलकापूर येथे डॉ. वसंत हंकारे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.१०:** पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मलकापूर हे महाविद्यालय केवळ शैक्षणिक गुणवत्तेसाठीच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठीही नेहमीच प्रसिद्ध आहे. या परंपरेला अनुसरून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी मिळावी यासाठी एक भव्य प्रेरणादायी व्याख्यान हे महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात करण्यात आले आहे. आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने उभी ठाकत आहेत. अभ्यासातील प्रगतीबरोबरच मानसिक तणाव, भविष्याबद्दलची चिंता आणि पालकांशी संवादातील दरी हे प्रश्न अधिक गंभीर होताना दिसतात. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी आणि संघर्षातून यशाकडे कसे जायचे याविषयी योग्य दिशा देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



या व्याख्यानासाठी विशेष वक्ते म्हणून प्रसिध्द प्रेरणादायी व्यक्तिमत्व मा. वसंत हंकारे सर यांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांचा प्रभावी वक्तृत्वशैली, जिव्हाळ्याचा संवाद आणि वास्तवाशी निगडित विचार हे तरुण पिढीला नेहमीच मार्गदर्शक ठरले आहेत. हंकारे सर ''बाप समजून घेताना संघर्षाकडून यशाकडे'' या अत्यंत हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. संघर्षाच्या माध्यमातूनच खरे यश प्राप्त होते आणि या प्रवासात पालकांची भूमिका अनन्यसाधारण असते, हे विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांमधून ठळकपणे उमगेल. पालकांचे महत्व ओळखून त्यांच्याशी संवाद साधणे, जीवनातील अडचणींना न घाबरता त्यांचा सामना करणे आणि यशाच्या दिशेने सातत्याने प्रयत्नशील राहणे यासाठी त्यांचे विचार विद्यार्थ्यांना निश्चितच उपयोगी ठरणार आहेत. या व्याख्यानाचे आयोजन मंगळवार, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले असून सकाळी ९.३० वाजता पदवी अभ्यासक्रमातील सर्व शाखांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता डिप्लोमा अभ्यासक्रमातील सर्व शाखांचे विद्यार्थी व्याख्यानाचा लाभ घेतील. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबतच पालकांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे हा उपक्रम विद्यार्थी-पालक संबंध दृढ करण्यासही मोठी मदत करणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे, प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे, तसेच आय क्यू ए सी समन्वयक प्रा. रमाकांत चौधरी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. या व्याख्यानाचे आयोजन प्रा. नितीन खर्चे, प्रा. मो. जावेद सह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले असून कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष ज्ञानदेव पाटील, उपाध्यक्ष प्रदीप कोलते सचिव डॉ. अरविंद कोलते, खजिनदार सुधीर पाचपांडे, तसेच सदस्य देवेंद्र पाटील, अनिल इंगळे, पराग पाटील सह डॉ. गौरव कोलते यांचा मोलाचा पाठिंबा लाभला आहे. व्यवस्थापनातील या मान्यवर व्यक्तींच्या सक्रिय सहभागामुळेच महाविद्यालयात असे उपक्रम सातत्याने राबवले जातात आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक बरोबरच चारित्र्य घडविणाऱ्या संधी उपलब्ध होतात. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांमध्ये सकारात्मक बदल होईल, अडचणींना घाबरण्याऐवजी त्यांचा सामना करण्याची जिद्द वाढेल आणि संघर्षातून यशाचा मार्ग शोधण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास महाविद्यालयाने व्यक्त केला आहे. केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे तर जीवनमूल्ये, संघर्षशीलता आणि पालकांचा आदर या बाबी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात किती महत्वाच्या आहेत हे अधोरेखित करण्यासाठी हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना नक्कीच नवी दिशा देईल.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, गुरूवार दि. ११ सप्टेंबर २०२५

## थोडक्यात

### तरुणावर धारदार शस्त्राने केला हल्ला

**अमरावती :** गाडगेनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील रामपुरी कॅम्प परिसरात वर्चस्वाच्या वादातून एका तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. यात अमित उज्वल मनोहर हे गंभीर जखमा झाला असून, त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी भरत ऊर्फ मक्की अर्जुन घुगे आणि अभिजित जाधव यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. अमित मनोहर (रा. गाडगेनगर) हा सोमवारी रामपुरी कॅम्पजवळील एका चायनीज दुकानाजवळ बसला होता. त्यानंतर आरोपी घुगे आणि जाधव आले. भरत म्हणाला की, आम्ही येथील भाई आहोत, माझ्याइतके पैसे कोणी कमवले नाहीत. त्यानंतर त्याने कुऱ्हाडीने हल्ला केला. यावेळी अमितने बचाव केला असता त्याच्या हाताला दुखापत झाली.

### जुगार अड्ड्यावर धाड; दोघे अटकेत

**अमरावती :** शहरातील राजापेठ बसस्थानकाच्या शेजारील गल्लीतील वरली मटका अड्डयावर गुन्हे शाखेने छापा टाकून दोन जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत एकूण ४४१० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सोमवारी (दि. ८) हवालदार सुनील लासुरकर यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून कारवाई करण्यात आली. पोलिसांनी धाड टाकली असता राजेश प्रकाशराव जाधव आणि अमित सन्नुजी नुराणी (दोघे रा. खोजा कॉलनी, यवतमाळ) हे जुगार खेळताना रंगेहात आढळले. त्यांच्या अंगझडतीदरम्यान ४४१० हजारांची रोख रक्कम जुगाराच्या चिठ्या व बॉलपेन असा साहित्य जप्त करण्यात आला. पंचासमक्ष पार पडलेल्या या कारवाईनंतर आरोपींविरुद्ध अमरावती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### लाखोंची रोख हिसकावून पोबारा

**चांदूर रेल्वे :** शहरातील अग्रवाल पेट्रोल पंपचालकाकडून २ लाख ८१ हजारांची रोख रक्कम हिसकावून चोरटे पसार झाल्याची घटना सोमवारी (दि. ८) घडली. पेट्रोलपंपाचे चालक चंपालाल अग्रवाल हे सोमवारी आपल्या जिजामाता कॉलोनी येथील स्व:ताच्या घरी जाण्यासाठी पेट्रोल पंपावरून आपल्या चारचाकी वाहनाने घराकडे निघाले. घराच्या फटकाजवळ पोहचताच त्यांनी पैशांची बॅग घेऊन घरात प्रवेश करणार तोच अचानकपणे तीन चोरट्यांनी त्यांच्यावर हल्ला चढवून, त्यांना धक्काबुक्की करत त्यांच्या जवळली २ लाख ८१ हजार २९८ रक्कमेने भरलेली बॅग हिसकावून पळ काढला. रक्कम असलेली बॅग हिसकाविताना झालेल्या झटापटीत अग्रवाल याच्या पायाला व हाताला दुखापत झाली. घटनेनंतर त्यांनी पोलिस स्टेशन गाठत घटनेची तक्रार दिली. चांदूर रेल्वे शहरात पोलिसांनी आरोपीविरूद्ध गुन्ह्याची नोंद केली.

### मोबाइल लंपास; गुन्हा दाखल

**अमरावती :** गोपालनगर स्थित डी-मार्टमधून एका ग्राहकाचा मोबाइल लंपास करण्यात आला. ही घटना उघडकीस आली. याप्रकरणात फिर्यादी अविनाश यशवंत पवार यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. फिर्यादी डी-मार्टमध्ये खरेदीसाठी गेले होते. काउंटर जवळ बिल करत असताना त्यांचा खिशात ठेवलेला सॅमसंग मोबाइल लंपास करण्यात आला. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. तपास सुरू केला आहे.

# ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी

## ॲपची सेवा सतत बंद | सुशिक्षित बेरोजगारांना ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याची कामे द्या!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि. १० :** राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्यासंदर्भात ई-पीक पेरा पाहणी नवीन ॲप विकसित करून कार्यान्वित केले आहे; परंतु अनेक शेतकऱ्यांना मोबाईल हाताळता येत नाही. ७५ टक्के शेतकऱ्यांजवळ स्वत:चा अँड्रॉईड मोबाईल नाही. काही भागात नेटवर्क, सर्व्हर डाऊनच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करणे अडचणीचे झाले आहे.

हे टाळण्यासाठी शासनाने तलाठ्यामार्फत गावातील सुशिक्षित बेरोजगारांना मानधनावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून त्यांना ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याचे काम द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देऊन केली आहे.



ई-पीक पाहणी नोंदणी ही अनेक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे, कारण ॲपमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी, जसे की ॲप अचानक बंद पडणे, ओटीपी न येणे, माहिती भरण्याची प्रक्रिया संथ होणे आणि नोंदणी अर्धवट राहणे, यांमुळे शेतकरी त्रस्त आहेत. या अडचणींमुळे शेतकऱ्यांना पीक विमा, नुकसान भरपाई आणि हमीभाव खरेदीसारख्या सरकारी लाभांपासून वंचित राहावे लागण्याची भीती आहे.




### मुख्यमंत्री, कृषी मंत्र्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवेदन

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि योग्यप्रकारे मदत करणे शक्य व्हावे, पिकाची माहिती संकलित करताना पारदर्शकता यावी या हेतूने राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी ई-पीक पेरा नोंदणी करण्यासाठी ई-पीक पाहणी ॲप विकसित करून कार्यान्वित केली आहे. खरीप हंगाम २०२५ साठी पीक पाहणीची शेतकरी स्तरावरील नोंदणी १ ऑगस्ट २०२५ ते १४ सप्टेंबर २०२५ चा कालावधी निश्चित केला असून पिक पेरा नोंदणी करण्याचा कालावधी संपत आलेला असून आजही हजारो शेतकऱ्यांचा पीक पेरा भरायचा शिल्लक असल्यामुळे पडीक क्षेत्राची माहिती, बांधावरील झाडांची माहिती कशी भरावी असा



प्रश्न निर्माण झाला आहे. सुशिक्षित अनुभवीसाठी ही पद्धत सोयीची असली तरी ७५ टक्के शेतकऱ्यांसाठी ई-पीक पाहणी या ॲपच्या माध्यमातून ई-पीक पेरा नोंदणी करणे पूर्णत: अडचणीचे आहे. त्यासाठी शासनाने गावातील तलाठ्यामार्फत सुशिक्षित बेरोजगारांना संधी देऊन एक स्वतंत्र यंत्रणा पथक तयार करून त्यांना शेतकऱ्यांच्या ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याची कामे द्यावी तसेच सर्व्हर डाउन होणे, शेतकऱ्यांमध्ये अपुरी जागृती आणि तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांची पीक पेरा नोंदणी झालेली नसुन पिक पेरा नोंदणी साठी मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या तर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे करण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांसमोर या येत आहेत अडचणी

ऑनलाईन नोंदणी न केल्यास ७/१२ मधील पीक पेरा कोरा राहील. त्यामुळे कोणतीही शासकीय मदत मिळणार नाही असे नमूद करण्यात आले आहे; परंतु अजूनही ७५ टक्के शेतकऱ्यांजवळ अँड्रॉईड स्मार्टफोन उपलब्ध नाहीत. काही शेतकऱ्यांजवळ मोबाईल आहे, तर पीक पेरा नोंदणी करण्याची प्रक्रिया माहीत नाही. या परिसरातील काही भागात नेटवर्क मिळत नाही. अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

# महिलांवरील अत्याचार प्रकरणातील समितीची नव्याने नियुक्ती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती दि. १० :** महिला व बाल विकास विभागांतर्गत महिलांवरील होणाऱ्या लैंगिक छळ तक्रारींची चौकशी व कार्यवाहीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती १६ जानेवारी २०२५ पासून कार्यरत राहणार असून त्यात जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी सदस्य म्हणून समाविष्ट आहेत.

जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. प्रिया देशमुख यांची अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. इतर सदस्यांमध्ये श्रीमती स्नेहा घाडगे (उपविभागीय अभियंता), सौ. ज्योती गावडे (प्रा.पा.उ.अ. अचलपूर), श्री. योगेश ताताल (सहाय्यक प्रशासन अधिकारी), सौ. रंजना साळुंके (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, महिला व



बाल विकास विभाग), सौ. माधुरी बडे, प्रणय काकडे (विद्या विकास केंद्र, अरोरा कॉलेज) यांचा समावेश आहे. तसेच श्री. विलास मसराम (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.जि.पा.) हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

महिला कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची योग्य चौकशी करून न्याय मिळवून देण्यासाठी ही समिती काम करणार आहे.

# जन सुरक्षा विधेयक विरोधात माजी आ. जगताप यांच्या नेतृत्वात ठिय्या आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. १० :** महाराष्ट्र हा पुरोगामी विचाराचा शाहू फुले आंबेडकरांना मानणारा महाराष्ट्र आहे महाराष्ट्रामध्ये महायुतीच्या सरकारने जन सुरक्षा विधेयक विधानसभेमध्ये मंजूर करून राज्यपालाच्या संमतीसाठी राखून ठेवले आहे त्या विधेयकामुळे महाराष्ट्रात राजकीय विरोधी पक्षनेते सामाजिक संघटना पत्रकार सरकारविरोधी भूमिका मांडणारे यांना टार्गेट करून या कायद्यामध्ये त्यांना अडकून लोकशाही संपवण्याचा घाट या सरकारने रचला आहे संविधानाच्या माध्यमातून सामान्य जनतेला जो अधिकार मत व्यक्त करण्याचा दिला आहे तो हिसकवण्याचा यामध्ये प्रयत्न आहे जे सामाजिक संघटना विरोधी राजकीय पक्ष सरकारविरोधी भूमिका घेतल्यास त्यांना कोणत्याही विचारात न घेता त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना तुरुंगात टाकणे त्यांच्या




प्रॉपर्टी जप्त करणे अशा पद्धतीने अडकून अजामीन पत्र गुन्हे दाखल करता येणार आहे त्यामुळे तुम्हाला जमानत सुद्धा या कायद्यांतर्गत मिळणार नाही व तुम्हाला न्यायालयातूनच खटला लढावा लागेल अशा पद्धतीचा काळा कायदा हा राज्य शासन आनु इच्छित आहे अशा कायद्याचा उपयोग नक्षलवादी कारवाया तसेच देश विरोधी आतंकवादी यांच्या बाबतीत केल्यास आमची कोणती हरकत नाही परंतु तुम्ही विरोध प्रदर्शन करणाऱ्या व शासन चुकीच्या बाबीवर बोट ठेवून विरोध केल्यास असे गुन्हे दाखल करत असेल तर हे लोकशाहीला घातक आहे २०२५ महाराष्ट्र विधिमंडळामध्ये मंजूर झालेल्या विधेकाची सखोल समीक्षा करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली त्या समितीकडून सदर विधेयकावर हरकती व सूचना मागवण्यात एकूण हरकती व सूचना १२७५० प्राप्त झाल्या त्यापैकी ९५०० पेक्षा जास्त हरकती विधेयक रद्द करण्या च्या बाजूने होत्या याचा सर्व विचार करण्यात यावा त्यामुळे धामणगाव रेल्वे तालुका महाविकास आघाडी तर्फे या कायद्याला विरोध करण्यासाठी हा विरोध दर्शवण्यासाठी माननीय तहसीलदार मार्फत राज्यपालांना व मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे यावेळी जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पंकज वानखडे, शिवसेना उभाठा गटाचे नाना देऊळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गट तालुका अध्यक्ष मंगेश ठाकरे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कैलास ठाकरे, भाकपा तालुका सचिव श्रीकृष्ण सडमाके, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रदीप मुंदडा, कार्याध्यक्ष चंदू डहाणे, महिला अशा अध्यक्षा मंजुश्री राठी, महिला तालुकाध्यक्ष अनिता मेश्राम ,माजी शहराध्यक्ष नितीन कनोजिया, युवक काँग्रेस शहराध्यक्ष आशिष शिंदे, गजानन चवरे, यशवंत बोरकर, सुनील भोगे, नंदकुमार मानकर, रवींद्र डबले, मुकुंद माहोरे, मुकेश राठी, गोपाल मोकलकर, संतोष गावंडे, रवींद्र काटणकर, संजय गाडे, नंदू ढोले, संकेत उभाळ, राधेश्याम चांडक, अविनाश इंगळे, भाऊराव अडकणे, भाऊराव बमनोटे अविन मांडवणे, शेख नुरभाई देविदास धारणे, अशोकराव कडू, दिनकरराव जगताप, मनोज वेरुळकर, हेमंत कडू, भगवान शिंदे, विजय सराफ, विलास चौधरी, तेजस दुबे, सुरेश कांबळे, लोकेश शेंडे, प्रशांत सबाणे, मुकेश राठी, हरिचंद्र वानखडे, सचिन समोसे, विठ्ठल सपाटे, मंगेश ढाले, संदीप जाधव, प्रशांत वानखडे, हेमराज तितरे, संदीप दावेदार, संजय धामंदे, प्रकाश कुरिले, सचिन काकडे, विपिन ठाकरे, सुरेंद्र जयस्वाल, विजय काळे, ओम प्रकाश हरवानी, रुपेश गुल्हाने, रमेश ठाकरे, प्रकाशराव वाडे, सुभाष उडाके, चंदू बोधिले, अमोल भेंडे, यावेळी महाविकासा आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

## तिवसा येथील घटना,. नातेवाइकांचा नगरपंचायत प्रशासनाविरोधात रोष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**तिवसा, दि. १० :** तिवसा नगरपंचायतमध्ये व्हॅलमन म्हणून सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने सोमवारी (ता. आठ) सायंकाळी सात वाजेदरम्यान राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. बाबूराव महादेवराव मकेश्वर (वय ६४, रा. तिवसा), असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. मकेश्वर यांच्या आत्महत्येला तिवसा नगरपंचायत प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप यावेळी त्यांच्या पत्नी लता मकेश्वर यांनी केला आहे.

आपल्या हक्काच्या रजारोखीकरण व पगाराच्या मिळकतीसाठी गेल्या पाच वर्षांपासून तिवसा नगरपंचायतच्या



पायऱ्या झिजविणाऱ्या ६५ वर्षीय कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

२०१९ मध्ये व्हॅलमन म्हणून सेवानिवृत्त झालेले बाबूराव मकेश्वर यांनी ग्रामपंचायत काळापासून शंभर रुपयाच्या दैनिक रोजंदारीने काम केले होते. कोरोनाच्या कठीण काळात त्यांनी वर्षभर विना मोबदला काम केले, असे त्यांच्या पत्नीने माध्यमांशी बोलताना सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून ते आपल्या पैशांच्या विवंचनेत होते. घर पती-पत्नी असताना त्यांनी समोरच्या हॉलमध्ये येऊन खिडकीला दुपट्टा बांधून गळफास घेतला.

यावेळी घटनेची माहिती तिवसा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी पंचनामा केला असून मर्ग दाखल केला आहे. दरम्यान, मृतक बाबूराव मकेश्वर यांच्या आत्महत्येला नगरपंचायत प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप यावेळी त्यांच्या पत्नीने केला आहे. अधिक तपास तिवसा पोलिस करीत आहेत.

तत्कालीन मुख्याधिकारी व कार्यालय अधीक्षक यांच्या अहवालानुसार श्री. ? मकेश्वर यांच्या दोन जन्म दाखल्याच्या नोंदी दिसून आल्या आहेत. दोन जन्म नोंदीमध्ये तफावत असल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी त्यांच्यावर चाळीस हजारांची वसुली काढली आहे.

**शिवदास मुसळे,**
**मुख्याधिकारी, नगरपंचायत तिवसा.**

याप्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक अधिकारी यांच्याकडे दिला आहे. ? नातेवाइकांचे बयाण व सर्व चौकशीअंती पुढील कारवाई करण्यात येईल.

**गोपाल उपाध्याय,**
**ठाणेदार तिवसा.**

# नोकरीच्या नावावर युवकाची फसवणूक

## १३.२१ लाखांनी गंडविले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** सरकारी नोकरीवर लावून देण्याचे आमिष दाखवून दर्यापूरातील २८ वर्षीय तरुणाची तब्बल १३ लाख २१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एवढेच नव्हे तर पीडित तरुणाला बनावट नियुक्तीपत्र देऊन भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर येथे आरोग्य सेवकाचे कामसुद्धा करून घेण्यात आले. मात्र संशय आल्याने तरुणाने चौकशी केली असता फसवणुकीचा हा प्रकार समोर आला. फिर्यादी प्रफुल गजानन दिगले (२८, रा. साई नगर, दर्यापूर) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सावता गोपाल म्हस्के (रा. पिंपरी चिंचवड, पुणे) व डॉ. प्रशांत (भंडारा) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस




सूत्रांनुसार, वर्ष २०२१ मध्ये आरोपी सावता म्हस्के याने प्रफुल दिगले यांना फोन करून आरोग्य सेवकाची जागा निघाल्याचे सांगितले. नोकरी हवी असल्यास माझ्या ओळखीने तुला लावून देतो, त्यासाठी १५ लाख रुपये लागतील, असे सांगत त्याने दिगले यांच्याकडून फोन पे व बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने एकूण १५ लाख रुपये घेतले. यानंतर आरोपींनी दिगले यांना जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा यांच्या नावे नियुक्ती आदेश पाठवले. त्यांचे मूळ कागदपत्रांची फाईल तयार करून घेतली. नियुक्तीपत्रावर विश्वास ठेवून प्रफुल दिगले लाखांदूर येथे गेले. तिथे ग्रामिण भागात जाऊन नागरिकांची बीपी, ताप आदी तपासण्याचे काम त्यांच्याकडून करून घेण्यात आले. कामादरम्यान अनेक अडचणी येऊ लागल्याने दिगले यांनी आरोपी सावता व डॉ. प्रशांत यांच्याशी फोनवर संपर्क साधला. मात्र त्यांच्या उत्तरांवरून संशय बळावला. अखेर त्यांनी थेट भंडारा जिल्हा परिषदेत चौकशी केली असता, संबंधित नावाचा कुठलाही अधिकारी अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट झाले.

# ऑगस्टमध्ये शेतकरी आत्महत्यांची शंभरी पार

## यवतमाळ, अमरावती जिल्ह्यांत अस्मानी, सुलतानी संकटाचे सर्वाधिक बळी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबलेले नाही. ऑगस्ट महिन्यात तब्बल १०१ शेतकरी अस्मानी, सुलतानी संकटाचे बळी ठरले आहेत. या ३१ दिवसांत यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक ४४, अमरावतीत २३ शेतकऱ्यांनी मृत्यूचा घोट घेतला आहे. राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या या दोन जिल्ह्यांत होत असल्याचे धगधगते वास्तव आहे.

विभागात सन २००१ पासून



प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकरी आत्महत्यांची नोंद घेतली जाते, त्यानुसार आतापर्यंत २१,८५४ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास ओढला आहे. यामध्ये शासन मदतीसाठी १०,२५० प्रकरणे पात्र ठरली तर त्यापेक्षा जास्त ११,३२३ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. अद्याप २८१ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याची विभागीय आयुक्त कार्यालयाची माहिती आहे.

नैसर्गिक आपत्ती, नापिकी, कर्जबाजारी, आजारपण यासह अन्य कारणांनी पश्चिम विदर्भातील शेतकरी मृत्यूला कवटाळत आहे. अशा परिस्थितीत शासन योजनांचा लाभ त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. महाडीबीटीमुळे गरजू शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळत नसल्याचे वास्तव आहे. समुपदेशनासह अन्य प्रकल्पही कुचकामी ठरले आहेत. एकाही शेतमालास हमीभाव नाही, शेतीचा उत्पादन खर्च वाढता असताना निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांच्या संघर्षावर नैराश्य मात करीत असल्याचे चित्र आहे.

### ११८३ शेतकरी आत्महत्या आठ महिन्यांत

अमरावती १ विभागात अमरावती जिल्ह्यात १४३, अकोला १२४, यवतमाळ २३५, बुलढाणा १२२ व वाशिम जिल्ह्यात ८३ व वर्धा जिल्ह्यात १४४ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागात छत्रपती संभाजीनगर १२८, जालना ५२, परभणी ७१, हिंगोली ४४, नांदेड १०४, बीड १७२, लातूर ५२, धाराशिव जिल्ह्यात ८५ शेतकरी आत्महत्या आहेत.

### १४ जिल्ह्यांत आत्महत्यांचा ग्राफ वाढताच

राज्यात अमरावती विभागातील ५, मराठवाड्यातील ८ व नागपूर विभागातील वर्धा असे १४ जिल्हे शेतकरी आत्महत्याप्रवण म्हणून ओळखले जातात. या जिल्ह्यांमध्ये जानेवारी ते ऑगस्ट दरम्यान आतापर्यंत ११८३ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात ५२० शेतकरी आत्महत्यांची नोंद झाल्याचा शेतकरी मिशन कार्यालयाचा अहवाल आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती



अमरावती, गुरूवार दि. ११ सप्टेंबर २०२५

## थोडक्यात

### विहिरीत उडी घेऊन युवकाची आत्महत्या

**अमरावती :** विहिरीत उडी घेत एका युवकाने आत्महत्या केल्याची घटना गडगेश्वर मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या विहीर परिसरात घडली. याबाबत महिलेने खोलापुरी गेट पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### देशी दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** हॉटेलची आड घेत अवैधरित्या देशी दारूची विक्र होत असल्याची गुप्त माहिती पेट्रोलिंगदरम्यान भातकुली पोलिसांना मिळाली. त्यांनी धाड टाकून एकूण 1 हजार ९०० रुपयांची देशी दारू जप्त केली. ही कारवाई आसरा येथील बस स्टॉप परिसरात असलेल्या एका हॉटेलवर करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांवर गुन्हे नोंदवले.

### चार चाकीची ऑटोला धडक

**अमरावती :** नागपूर-अकोला महामार्गावर बडनेरा नजिक भरधाव स्विफ्ट डिझायर कारने (एमएच ४०-एसी ८४३४) कोणतेही इंडिकेटर न देता निष्काळजीपणे डावीकडे वळवून ऑटोला धडक दिली. त्यात ऑटो पलटी होवून चालकासह एक महिला व मुलगा जखमी झाले. याबाबत ऑटो चालकाने बडनेरा पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून स्विफ्ट डिझायरच्या महिला चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला, तर तिच्या परस्परविरोधी तक्रारीवरून पोलिसांनी ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### पोलिसांकडून अवैध देशी दारू जप्त

**अमरावती :** दुचाकीवरून अवैधरित्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या युवकावर फ्रेजरपुरा पोलिसांनी कारवाई केली. दरम्यान त्याच्या ताब्यातून ४० हजारांच्या दारूसह दुचाकी (एमएच २७-एएल ११४५) असा एकूण ५४ हजार २५० रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त करीत युवकावर गुन्हा दाखल केला.

### मुलगी चिठ्ठी लिहून गेली घर सोडून

**अमरावती :** अल्पवयीन मुलीने आई घराबाहेर जाताच एक चिठ्ठी लिहिली. त्यात मम्मी, मी घर सोडून जात आहे. लग्न पण तिकडेच करणार. पोलिसात तक्रार देवून नको. मी दूर जात आहे. तू टेंशन घेवू नको, असा मजकूर असलेली चिठ्ठी लिहून ठेवत घरून निघून गेली. याबाबत तिच्या पालकांनी वलगाव पोलिसात तक्रार दिली. अज्ञाताविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### महिलेचा विनयभंग

**अमरावती :** दुकानासमोरच एक परिचित मुलीला शिवीगाळ करीत असल्याने तिच्या पालकांनी युवकाला जाब विचारला. दरम्यान युवकाची आई व बहिण तेथे आल्या. त्यांनी जाब विचारणाऱ्या मुलीच्या पित्याला मारहाण करणे सुरू केले. पत्नी त्याच्या मदतीला धावली असता, मारहाण करणाऱ्या युवकाने तिला वाईटरितीने पकडून, तर मुलीला अश्लिल शिवीगाळ करीत त्यांचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### रस्त्यावर गाडी लावणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती :** गद्रे चौकात वाहतुकीला अडथळा निर्माण करीत चार चाकी (एमएच ३०-पी ४५४३) वाहन चालकाने उभे केले. ही बाब राजापेठ पोलिसांच्या लक्षात येताच त्यांनी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढिल तपास राजापेठ पोलिस स्टेशन चे कर्मचारी करीत आहे.

# दोन बालकांसोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या एसटी चालकाला अटक

## अनेक बालकांवर अत्याचार केल्याची चर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वरुड, दि. १० :** शहराच्या एस.टी बसस्थानकात कार्यरत असलेल्या एका ५७ वर्षीय एस.टी. बस चालकाने शहरातीलच दोन अल्पवयीन बालकांसोबत अनैसर्गिक कृत्य केल्याची घटना उघडकीस आल्याने शहरात खळबळ माजली होती. याप्रकरणी वरुड पोलिसांनी आरोपी एस.टि बस चालक देवराव बावणे याला त्याबात घेऊन आज वरुड न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला १० सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

शहरातील अष्टविनायक सभागृह समोरील रस्त्याच्या दुसरीकडील भागात वास्तव्यास राहात असलेला वरूड बसस्थानकात कार्यरत एस.टी. चालक देवराव बावणे या नराधमाने पोळ्याच्या दिवशी वरुड शहरातील दोन अल्पवयीन बालकांना दुचाकीवर बसवुन रेल्वे स्टेशन परिसरालगतच्या विठ्ठलनगर मध्ये नेवुन आरोपीने दोन्ही बालकांसोबत अनैसर्गीक कृत्य करीत अत्याचार केले. यापैकी एक बालक हा १० वर्षाचा तर दुसराहा केवळ ७ वर्षाचा असल्याची माहीती आहे. वरुड शहरातील अनेक बालकांना गंडवुन याच नराधमाने त्यांना अज्ञातस्थळी नेवुन त्यांचेसोबत अनैसर्गिक कृत्य केल्याची शहरात चर्चा आहे. यातील १० वर्षीय



बालकाच्या पाल्यांना ही माहीती समजताचपिडीत बालकाच्या वडिलांनी नराधम आरोपी देवराव याला चांगलाच चौप दिल्याची सुध्दा चर्चा आहे. विशेष म्हणजे आज सकाळच्या सुमारास यासंदर्भात वरुड पोलीसांनी रितसर फिर्याद घेऊनन गुन्हा दाखल केला. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांनी स्वत: वरुडपोलिस स्टेशन गाठुन घटनेची माहीती घेतपुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे मार्गदर्शनाखाली सुरु करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी वरुड पोलिसांनी आरोपी देवराव बावणे विरुध्द भादवीचे कलम ३५१ बी.एन.एस. ४, ६, ८, १२, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अन्वये गुन्हा दाखल करीत आरोपी देवराव बावणे याला अटक केली. नंतर दुपारचे सुमारास आरोपीला वरुड जिल्हासत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीला १० सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या घटनेने वरुड शहरात एकच खळबळ माजली असून अशा प्रकारचे अनैसर्गिक कृत्य करणारे शहरात आणखी काही महाभाग आहेत का? किंवा या आरोपीने आतापर्यंत किती बालकांसोबत अनैसर्गिक कृत्य करीत अत्याचार केले याचा सुध्दा पोलीस कसून शोध घेत आहे.

# गुटख्याची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक

## ४ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. १० :** स्थानिक गुन्हे शाखा पथकाने गुटख्याच्या अवैध वाहतुकीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुटख्याची वाहतूक करणाऱ्या दोन आरोपी सैय्यद अजरूददीन सैय्यद जमालउददीन (39, रा. जमील कॉलनी, अमरावती) व शेख सलमान शेख युसुफ (32, रा. अलीमनगर, अमरावती) यांना अटक केली असून दोन आरोपी पसार झाले. शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, पांढुर्णावरून वरुडकडे कारद्वारे शासन प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होणार आहे. या माहितीच्या आधारे स्थागुशा पथकाने पिपलागड येथे नाकाबंदी केली. नाकाबंदीदरम्यान संशयित कार थांबवून झडती घेतली असता कारमध्ये तंबाखूमिश्रित सुगंधित पानमसाला, गुटखा आढळून आला. तसेच वाहतुकीसाठी वापरलेली कार आणि दोन मोबाइल असा एकूण 4 लाख 46 हजार 860 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना शेंदूरजनाघाट पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, पोलिस अंमलदार रवींद्र बावणे, बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, पंकज फाटे आणि चालक प्रशिक वानखडे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# पुर्णानदी घाटावर तीन दिवसात शेकडो गणेश मुर्तीचे विसर्जन

## मोठ्या गणेश मुर्तीचे क्रेनद्वारे विसर्जन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. १० :** दर्यापूर मुर्तीजापुर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या पुर्णा नदी तीरावर पश्चिम विदर्भातील शिवभक्तांची काशी असलेले तीर्थक्षेत्र लाखपुरी गावातील पुर्णा घाटावर तसेच लाखपुरी टाकळी पुलावर दरवर्षी प्रमाणे गणेश मुर्ती विसर्जन व्यवस्था करण्यात आली होती. दि. ५ ते ७ सप्टेंबर ला मुर्तिजापूर, दर्यापूर, अंजनगाव, अकोला व भातकुली तालुक्यातील शेकडो सार्वजनिक गणेश मंडळाच्या मूर्ती व हजारो घरगुती गणेशमुर्ती विसर्जन पार पडले. मोठ्या गणेश मुर्तीचे विसर्जन पुलावरून क्रेन द्वारे करण्यात आले. क्रेनची व्यवस्था मुर्तिजापूरचे आमदार हरिष पिंपळे व दर्यापूर येथील गणेश गुल्हाने, प्रदीप



मलीये यांनी केली होती . येणाऱ्या भाविकांसाठी मसालाभात व पाण्याची व्यवस्था आ हरिष पिंपळे यांनी केली होती.लाखपुरी ग्राम पंचायत व टाकळी ग्राम पंचायतने लाईट व्यवस्था केली. लाखपुरी घाटावर श्री लक्षेश्वर तैराकी पथक व टाकळी घाटावर सरपंच किशोर टाले व त्यांचे सहकारी यांनी विसर्जनसाठी सहकार्य केले. विसर्जन दरम्यान मुर्तिजापूर ग्रामीण पो. स्टे. निरीक्षक श्रीधर गुठ्ठे, पीएसआय चंदन वानखडे



साहेब स्वत: रात्री २ ते ३ वाजेपर्यंत आपल्या कर्मचारी सोबत बंदोबस्त करत होते. मंडळ अधिकारी जाधव, पटवारी, सुनील वानखडे ठाणेदार यांच्यासह राजा दहापते. व इतर सेवाधारी सेवा देत होते. नियोजनबद्ध विसर्जनकरून भाविकांनी सर्वांचे आभार व्यक्त केले .

# श्री शिवाजी हायस्कूलचे क्रीडा स्पर्धेत सुयश



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**रामतिर्थ, दि. १० :** क्रीडा व युवक संचालनालय ,पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित पावसाळी क्रीडा स्पर्धा दर्यापूर तालुका क्रीडा स्पर्धेत श्री शिवाजी हायस्कूल व क. म. वि., रामतीर्थ चा १७ वर्षाखालील मुलांचा व मुलींचा खो-खोचा संघ विजयी झाला असून हा संघ जिल्हास्तरावर पात्र झाला आहे शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री आर बी गव्हाळे तसेच शारीरिक शिक्षक श्री के एम पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे गावातील प्रतिष्ठित नागरिक शाळा समिती सदस्य श्री चंद्रकांत उर्फ अण्णासाहेब देशमुख व श्री वकिलाजी खडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# जनसुविधा आदेश रद्द करा : मागणी

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे निवेदन सादर
- युवासेना जिल्हाप्रमुख अंकश पाटील कावडकर यांचे नेतृत्व

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. १० :** शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र जन सुविधा आदेश रद्द करण्यात यावा याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे उपविभागीय अधिकारी दर्यापूर यांना निवेदन सादर करून त्यांच्या मार्फत राष्ट्रपती महोदयांपर्यंत पोहोचवण्याकरिता निवेदन सादर केले आहे. सभागृहात निवेदन सादर करून शिवसेना पक्षाच्या वतीने घोषणाबाजी करण्यात आली जन सुविधा आदेश रद्द करण्यात यावा अशा घोषणांनी संपूर्ण तहसील कार्यालय आणि उपविभागीय कार्यालय शिवसैनिकांनी दणाणून सोडले.

निवेदन सादर करताना युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कवडकर, जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अलका पारडे, विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, तालुकाप्रमुख प्रमोद धानोरकर, युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे, शिवसेना शहरप्रमुख गोपाल अग्रवाल, युवासेना शहरप्रमुख रुपेश मोरे, उपशहर प्रमुख दीपक बगाडे, महिला आघाडी उपतालुकाप्रमुख अर्चनाताई पखाले, भाकप पक्षाचे बाळासाहेब कुटेमाटे, पूजाताई रामावत, दिनकरराव मुळे, शुभम विल्हेकर, मंगेश पारडे, संतोष हागे, उमेश बुरे, आकाश साबळे, पंकज राणे, निलेश पारडे, योगेश कावडकर, रवी जाधव तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

# अंजनगाव व सुर्जी येथील गणपती विसर्जन मिरवणूक शांततेत पडली पार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. १० :** अंजनगाव व सुर्जी येथील गणपती विसर्जन मिरवणुक शांततेत पार पडली.या मिरवणूकीची सुरवात अंजनगाव शहरातील मुख्य ठिकाण पान अटाई येथून झाली तर सुर्जी येथील मिरवणुकीची सुरवात मोठी मळी येथून करण्यात आली.मिरवणुकीला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी अंजनगाव सुर्जी पोलिसांकडून तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.तसेच अतिसंवेदनशील भागातील आवागमन असणारा मार्ग पूर्णत: बंद करुन त्याठिकाणी अतिरिक्त पोलीस कुमक तैनात करण्यात आली.6 सप्टेंबर व 7 सप्टेंबर रोजी दुपारपासून गणपती विसर्जन मिरवणुकीला सुरवात झाली.ही मिरवणूक पान अटाई येथून मोमीनपूरा,ढोमनपूरा, संत गुणवंत बाबा चौक,संगत संस्थान, तेलीपूरा,सावकारपूरा,सराफा लाईन, चावडी चौक,शनिवार पेठ,पान अटाई मार्गे विठ्ठल मंदिर येत पर्यंत काढण्यात आली



होती.मिरवणुकीची वेळ रात्री बारा वाजेपर्यंत असून शहरातील 39 गणेश मंडळ मिरवणुकीत सहभागी झाले होते.शांततेच्या मार्गाने मिरवणुक ही अतिसंवेदशील भाग असलेल्या मोमीनपूरा मशिद येथून काढण्यात आली.दरम्यान या ठिकाणी अतिरिक्त पोलीस कुमक तैनात करुन मिरवणुकीला गालबोट लागणार नाही याची दक्षता नुकतेच रुजू झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे,ठाणेदार सुरज बोंडे व सहकारी अधिकाऱ्यांनी घेतल्यागेली.नियमांचे उल्लंघन न होता गणपती विसर्जन मिरवणुक शांततेत पार पडली मिरवणुकीत ढोल ताशे,बँड पथक,डीजे साऊंड,दिंडी पथक, पारंपरिक वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक निघाली होती. मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा जिल्हाभरातून अतिरिक्त कुमक बोलवून संवेदनशील व अतिसंवेदनशील भागात तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला. नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे की नाही यावर उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे,पोलीस निरीक्षक सुरज बोंडे, तसेच वरिष्ठ अधिकारी यांनी मिरवणुकीवर नजर ठेवली होती.



# मंगेश ढेकण यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. १० :** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अंजनगाव बारी येथील सहाय्यक शिक्षक मंगेश वसंतराव ढेकण दिनांक ३० ऑगस्ट रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवागौरव व सत्कार सोहळा समारंभ दिनांक ३० ऑगस्ट रोजी शाळेच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव न्यू.एज्युकेशन सोसायटी बडनेरा ,प्रमुख अतिथी राजेश टारपे उपाध्यक्ष, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा, महादेवराव चकुले सभापती जनता विद्यालय अंजनगाव बारी, सोमेश्वरराव इंगोले न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा सदस्य , प्राचार्य विनोद मुगल, पर्यवेक्षक गजेंद्र अवघड उपस्थित होते. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.भाऊसाहेब दातीर व सरस्वती मातेच्या फोटोचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांनी केले त्यांनी त्यांच्या प्रास्ताविकामधून मंगेश ढेकन यांची कौटुंबिक माहिती दिली. त्यानंतर सत्कार मूर्ती मंगेश ढेकन आणि त्यांच्या सहचारीनी अर्चना ढेकन यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. त्यांच्या सहचारीनी अर्चनाताई यांचा ही साडी चोळी देऊन ज्येष्ठ शिक्षिका वैशाली ठाकरे यांनी सत्कार केला तसेच त्यांची कन्या धनश्री ढेकन हिचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ.अर्चना पोकळे यांनी सेवा सन्मान पत्राचे वाचन करून त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले.

# जिल्ह्यात 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ३०८ आरोग्य शिबिरातून १६ हजार २१९ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी | ५८३ नागरिकांनी केले रक्तदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. १० :** गणेशोत्सावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे हजारो नागरिकांना मोफत आरोग्यसेवेचा लाभ मिळाला.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील गणेश मंडळांच्या ठिकाणी आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. हा विशेष उपक्रम जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधीक्षक डॉ. निलेश खटके, धर्मदाय सह आयुक्त दीपक खोचे, धर्मदाय उपायुक्त राजेश इंगोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक आसोले, सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल काळे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे



अध्यक्ष डॉ. श्याम गावंडे, कर्मचारी पवन गुल्हाने व मंगेश बांबटकर यांच्या प्रत्यक्ष सहभागाने प्रभावीपणे राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एकूण ३०८ आरोग्य शिबिरे घेण्यात




आली. या शिबिरांमधून १६ हजार २१९ नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचाराचा लाभ मिळाला. या शिबिरात ७ हजार ९१५ पुरुष, ७ हजार ३८० महिला व ९२४ बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमादरम्यान ५८३ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाचे सुंदर उदाहरण दिले.

यासोबतच विविध सामाजिक संस्थांनी देखील आरोग्य विषयक जनजागृतीसाठी सहभाग नोंदवला. 'अनुलोम' संस्थेने जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ग्रामीण भागात १३० गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन ९१०० नागरिकांमध्ये आरोग्य विषयक बाबी संदर्भात जनजागृती केली.

अशाप्रकारे श्रीगणेशा आरोग्याचा या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून एकूण ४३८ आरोग्य उपक्रम व जनजागृती कार्यक्रम आयोजित करून २५,३१९ नागरिकांपर्यंत आरोग्य विषयक जनजागृती पोहोचविण्यात आली, तर यापैकी १६२१९ नागरिकांना प्रत्यक्ष आरोग्य सेवेचा लाभ देण्यात आला. 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाला जिल्ह्यातील नागरिक व सामाजिक संस्थांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आरोग्य जनजागृती व सेवा क्षेत्रातील एक उल्लेखनीय बाब ठरली आहे. समाजातील गोर-गरीब नागरिकांना व रुग्णांना आरोग्य तपासणी व वैद्यकीय उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत, या उदात्त हेतूने हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात आला.

## महत्वाचे



### आयटीआय परीक्षेत विशाल माटलवार राज्यात प्रथम

**आर्णी :** अत्यंत हालाखीच्या परिस्थितीवर मात करत, आर्णी तालुक्यातील कवठा बाजार येथील विशाल वसंता माटलवाड याने आयटीआय परीक्षेत ६०० पैकी ६०० गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. त्याच्या या देदीप्यमान यशाबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने त्याचा सत्कार करून कौतुक करण्यात आले. शेतकरी कुटुंबातील विशालने यवतमाळ येथील शासकीय वसतिगृहात राहून आपले शिक्षण पूर्ण केले. त्याच्या या संघर्षाचे आणि यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यात उद्योजक बनण्याचे स्वप्न त्याने बाळगले आहे. लवकरच महाराष्ट्र शासनाच्या वतीनेही मुंबई येथे त्याचा मोठा सत्कार होणार आहे. त्याच्या यशाबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी येथील विश्रामगृहात त्याचा शाल व श्रीफळ देऊन गौरव केला. यावेळी मनसेचे सचिन यलगंधेवार, धीरज कोडापे, नामदेव मेटके, आकाश माटलवाड आदी उपस्थित होते. विशालच्या यशाने अनेक गरजू विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे.



### दिग्रस शहरातील शिक्षकांचा सन्मान

**दिग्रस :** 'गुरु-शिष्य' परंपरेचा सन्मान करत, येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेने शिक्षक दिनानिमित्त एक अभिनव उपक्रम राबवला. बँकेचे व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी शहरातील विविध शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन, मुख्याध्यापक व शिक्षकांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सकाळी बँकेच्या शाखेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केल्यानंतर, या उपक्रमाला सुरुवात झाली. शाखा व्यवस्थापक रणजितकुमार सिन्हा आणि क्षेत्राधिकारी निलेश कापडे यांच्या नेतृत्वातील पथकांनी दिवसभर शहरातील शाळांना भेटी दिल्या. यामध्ये दिनबाई विद्यालय, मोहनाबाई कन्या शाळा, अंजुमन उर्दू हायस्कूल, विद्यनिकेतन इंग्लिश स्कूल, आर. एफ. मेहता राष्ट्रीय विद्यालयासह इतरही अनेक शाळांचा समावेश होता. प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. एका राष्ट्रीयीकृत बँकेने कार्यालयीन कामकाजाच्या पलीकडे जाऊन शिक्षकांचा केलेला हा सन्मान शहरात चर्चेचा विषय ठरला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### वन्य प्राण्यांच्या दहशतीने शेतकरी हवालदिल

**पुसद :** तालुक्यात वन्य प्राण्यांनी शेतशिवारात घातलेल्या



धुमाकुळामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. रानडुकरे आणि इतर वन्य प्राणी उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस करत असून, शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. वनविभाग आणि लोकप्रतिनिधींच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे ही समस्या गंभीर बनल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे. दिवसरात्र मेहनत करून पिकवलेले आणि तोंडाशी आलेले पीक वन्य प्राणी फस्त करत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांवर हल्ले झाल्याने, शेतात जाण्यासही भीती वाटत आहे. शासनाची 'तार कुंपण' योजना केवळ कागदावरच असून, तिचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. लोकप्रतिनिधी केवळ बांधावर येऊन फोटो काढतात, पण ठोस उपाययोजना करत नाहीत, असा संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन तार कुंपण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि पिकांचे व जीविताचे रक्षण करावे, अशी एकमुखी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

### राजमाता जिजाऊ पतसंस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सत्कार

**पुसद :** तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी, येथील श्रीरामपूरस्थित राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्थेने पुढाकार घेतला आहे. संस्थेच्यावतीने दहावी, बारावी आणि इंजिनिअरिंगमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, पात्र विद्यार्थ्यांना कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना दहावी, बारावी आणि इंजिनिअरिंगमध्ये ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत, तसेच ज्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवला आहे, ते या सत्कारासाठी पात्र असतील. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिका व आधार कार्डच्या सत्य प्रती संस्थेच्या कार्ला रोड येथील कार्यालयात किंवा पंकज प्रोव्हिजन येथे जमा कराव्यात. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत कागदपत्रे स्वीकारली जातील. या सोहळ्याद्वारे तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव केला जाईल. जास्तीत जास्त गुणवंतांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे मार्गदर्शक प्रा. महादेव सखाराम गावंडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत वानखेडे यांनी केले आहे.

# अखेर जयस्वाल देशी बारला लागले सील

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश, जाम रोड वडगाव येथील महिलांच्या आणि नागरिकांच्या लढ्याला अभूतपूर्व यश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १० :** गेल्या दोन महिन्यांपासून निवासी वस्तीत सुरू असलेल्या देशी दारू बारविरोधात महिलांनी आणि नागरिकांनी उभारलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. पोलिस प्रशासनाच्या अहवालानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जयस्वाल देशी बारला तात्काळ सील लावण्याचे आदेश दिले, ज्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडत जल्लोष केला.

जाम रोड वडगाव येथे दोन महिन्यांपूर्वी, स्थानिक रहिवाशांचा तीव्र विरोध असतानाही शासकीय परवान्यासह जयस्वाल देशी बार सुरू करण्यात आला होता. या बारमुळे परिसरातील शांतता धोक्यात येईल आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशी भीती नागरिकांमध्ये होती. त्यामुळे, बार सुरू झाल्याच्या दिवसापासूनच येथील महिला आणि पुरुष रस्त्यावर उतरून आंदोलन करीत होते. या आंदोलनाचे नेतृत्व दारूबंदी व्यसनमुक्ती आंदोलन समिती करीत होती. समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना हजारो महिलांच्या स्वाक्षरी असलेले निवेदन सादर करण्यात आले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने यावर स्थानिक पोलिस प्रशासन आणि जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून सविस्तर अहवाल मागविला होता. या दोन्ही अहवालांनी नागरिकांच्या भीतीला दुजोरा दिला. अखेर, या अहवालांच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी जयस्वाल देशी बार बंद करण्याचे आदेश दिले, ज्याची अंमलबजावणी नुकतीच करण्यात आली. बारला सील लागताच, परिसरातील नागरिकांनी आणि विशेषतः महिलांनी आनंदोत्सव साजरा केला. हा विजय म्हणजे केवळ एका दारूच्या दुकानाविरुद्धचा विजय नसून, तो लोकशाहीत सामान्य नागरिकांच्या एकजुटीचा आणि स्त्रीशक्तीचा विजय असल्याची भावना व्यक्त होत आहे. या यशस्वी लढ्यासाठी असंख्य नागरिकांनी अतोनात मेहनत घेतली होती. नागरिकांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिस आणि जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून अहवाल मागविला. या दोन्ही अहवालांमध्ये, सदर बारमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा निष्कर्ष नोंदविण्यात आला. लोकांच्या विरोधाला न जुमानता सुरू केलेल्या या बारला अखेर कायद्याच्या प्रक्रियेनुसारच बंद होण्याची वेळ आली. या अधिकृत अहवालांच्या आधारेच जिल्हाधिकाऱ्यांनी बार बंद करण्याचे आदेश दिले.

### थेंबे थेंबे तळे साचे

हा लढा दोन महिन्यांपूर्वी सुरू झाला, जेव्हा रहिवाशांचा तीव्र विरोध डावलून हा देशी बार सुरू करण्यात आला. दारूबंदी व्यसनमुक्ती आंदोलन समितीच्या नेतृत्वाखाली महिला आणि पुरुष रस्त्यावर उतरले. हजारो महिलांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या सातत्यपूर्ण आणि एकत्रित प्रयत्नांमुळेच प्रशासनाला अखेर जनतेच्या मागणीपुढे झुकावे लागले आणि हा मोठा विजय साध्य झाला.

### लढ्याचे शिलेदार

या आंदोलनाचे नेतृत्व दारूबंदी व्यसनमुक्ती समितीच्या प्रणिता संगीता पवार आणि मुख्य संघटक उमेश मेश्राम यांनी केले. त्यांना वडगाव शाखेचे पदाधिकारी राजीव गिरी, विलास बावणे, मनीषा काटे, आशु मुळे, गौरव बावणे, वसंतराव शिरभाते, अभय डोंगरे, राहुल मेश्राम, विजय घोडा, गोलू शिरसागर, मोहन निमजे, दिनेश आडे, सतीश कुचनकर, मोहन मुळे, पंकज कापसे, बाळासाहेब मुक्कावार आणि इतर अनेक कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली.

# राळेगाव शिवसेनेत (शिंदे गट) मोठे फेरबदल

## जानराव गिरी विधानसभा समन्वयक, भानुदास राऊत तालुका समन्वयक!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**





**राळेगाव, दि. १० :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने (शिंदे गट) राळेगाव मतदारसंघासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. यात नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष जानराव गिरी यांची विधानसभा समन्वयकपदी, तर माजी मुख्याध्यापक भानुदास राऊत यांची तालुका समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार यवतमाळ येथे ७ सप्टेंबर रोजी झालेल्या भव्य पदग्रहण सोहळ्यात या नियुक्त्या करण्यात आल्या. राळेगाव नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष जानराव गिरी यांच्यावर विधानसभा समन्वयकपदाची मोठी जबाबदारी देण्यात आली आहे, तर माजी मुख्याध्यापक भानुदास राऊत यांची संघटनात्मक अनुभवाची दखल घेत तालुका समन्वयकपदी निवड झाली. यासोबतच, मनोज भोयर यांची तालुकाप्रमुखपदी, इम्रान पठाण यांची राळेगाव शहरप्रमुखपदी, दिपक येवले यांची शहर संघटकपदी आणि नगरसेवक संतोष कोकुलवार यांची शहर समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याच कार्यक्रमादरम्यान, पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत राळेगाव शहरातील राजकीय वर्तुळात मोठी घडामोड झाली. ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख म्हणून कार्यरत असलेले जीवन रामगडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह, शेख अनिस आणि मनीष साठे यांच्यासोबत शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला. यामुळे ठाकरे गटाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. यावेळी पालकमंत्री संजय राठोड आणि शिवसेना उपनेते ज्ञानेश्वर धाणे पाटील यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले. आगामी काळात होणाऱ्या यवतमाळ जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांवर शिवसेनेचा एकहाती भगवा फडकवण्यासाठी आतापासूनच पूर्ण ताकदीने कामाला लागण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी दिले. यवतमाळ येथील या मुख्य कार्यक्रमाला पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार आणि जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे यांच्यासह अनेक प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातात दोघे गंभीर जखमी

**पाटण, दि.१० :** पाटण येथे भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवून दोघांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी एका चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात फिर्यादी महिलेचे पती आणि मुलगी गंभीर जखमी झाले आहेत. संजीवणी मनोहर उदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मंगेश शंकर फुटाणे हा एम.एच. २९ सीएल २२९७ क्रमांकाचे वाहन अत्यंत भरधाव वेगाने चालवत होता. यावेळी त्याने रस्त्यावरून जाणाऱ्या संजीवणी यांच्या पती व मुलीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उदार यांच्या तक्रारीवरून पाटण पोलिसांनी आरोपी वाहनचालक मंगेश फुटाणेविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# शिवसेनेच्या सहसंपर्क प्रमुखपदी प्रवीण निमोदिया

## पक्ष वाढीसाठी केलेल्या कामाची दखल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १० :** शिवसेनेची जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असून, यामध्ये पक्षाचे जुने कार्यकर्ते प्रवीण निमोदिया यांची जिल्हा सहसंपर्क प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. त्यांची संघटनात्मक बांधणी आणि जनसंपर्क लक्षात घेता, पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्यावर ही नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

२०१४ पासून शिवसेनेत सक्रिय असलेल्या निमोदिया यांनी यापूर्वी व्यापारी आघाडीचे जिल्हा प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. ते टिंबर मर्चंट असोसिएशनचे सचिव, नवशक्ती दुर्गा मंडळाचे कोषाध्यक्ष आणि महावीर इंटरनॅशनलचे अध्यक्ष आहेत. अग्रवाल समाजातही ते सक्रिय आहेत. रक्तदान, वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक कार्यातील त्यांच्या सहभागामुळे त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. आपल्या निवडीचे श्रेय त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय राठोड, पराग पिंगळे, हरिहर लिगनवार, श्रीधर मोहोड आणि सर्व सहकाऱ्यांना दिले आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. या निवडीमुळे पक्ष संघटनेला बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# २०० विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून साकारला 'बाप्पा'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि. १० :** येथील विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अनंत चतुर्दशीनिमित्त मानवी साखळीतून गणपती बाप्पांची प्रतिकृती साकारून अनोख्या पद्धतीने निरोप दिला. शाळेतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी एकत्र येत हा अभिनव उपक्रम राबवला.

विद्यार्थ्यांच्या भक्ती आणि श्रद्धेचा आविष्कार असलेल्या या रचनेतून त्यांनी एकता, प्रेम आणि परंपरेचा संदेश दिला. आपल्या लाडक्या बाप्पाला भावनिक निरोप देण्याचा हा उपक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. शाळेच्या कृतीयुक्त अभ्यासक्रमाचा भाग असलेल्या या सादरीकरणाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शरद मैंद, सचिव सुरज डुबेवार, प्राचार्या डी. राधा यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती शाळेची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर दिग्रस शिवसेनेत फेरबदल

## उत्तम ठवकर तालुकाप्रमुख, संजय कुकडी शहराध्यक्ष, शिंदे गटाची दिग्रसमध्ये नवी टीम जाहीर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. १० :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने (शिंदे गट) दिग्रस तालुक्यासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. यात जुन्या पदाधिकाऱ्यांना कायम ठेवतानाच, नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली असून, उत्तम ठवकर यांची तालुकाप्रमुखपदी तर संजय कुकडी यांची शहरप्रमुखपदी वर्णी लागली आहे.

यवतमाळ येथील समर्थ लॉन येथे ७ सप्टेंबर रोजी झालेल्या भव्य पदग्रहण सोहळ्यात या महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर झाल्या. यामध्ये उपजिल्हाप्रमुखपदी राजकुमार वानखेडे आणि तालुकाप्रमुखपदी उत्तम ठवकर यांना त्यांच्या कामाची पावती देत कायम ठेवण्यात आले आहे. पूर्वीचे शहरप्रमुख डॉ. संदीप दुधे यांना बढती देत त्यांच्यावर विधानसभा समन्वयकपदाची मोठी जबाबदारी देण्यात आली. तीन वर्षांच्या अंतरानंतर संजय कुकडी यांची शहरप्रमुखपदी पुनर्नियुक्ती झाली आहे. तर, बाळू राठोड (तालुका समन्वयक), विनायक दुधे (शहर संघटक) आणि डॉ. मनोज टेवरे (शहर समन्वयक) यांच्या रूपाने नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. दुर्गा दुधे यांची महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुखपदी निवड झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीने ही नियुक्तीपत्रे जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड व पक्षाचे निरीक्षक, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यवतमाळ येथून पदग्रहण करून परतताच दिग्रस शिवसेना कार्यालयासमोर फटाक्यांच्या जोरदार आतषबाजीत या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत आणि सत्कार केला. यवतमाळ येथील मुख्य कार्यक्रमाला पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, लोकसभा समन्वयक विश्वास नांदेकर, ज्येष्ठ नेते जीवन पाटील, जिल्हाप्रमुख राजूदास जाधव, यशवंत पवार, गजानन डोमाळे, युवासेना लोकसभा अध्यक्ष विशाल गणात्रा, महिला आघाडी संघटिका कालिंदा पवार आणि महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशाली मासाळ यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते.

# विद्यार्थी बनले गुरुजी, शाळा झाली आनंदी!

## आर्णीतील बाबा कंबलपोष हायस्कूल व आयडियल पब्लिक स्कूलमधील शिक्षक दिनाचा उत्साह

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि. १० :** शाळेचा गणवेश घालून आलेले विद्यार्थीच मुख्याध्यापकांच्या खुर्चीत, शिक्षक बनून वर्गात धडे देताना आणि कर्मचारी म्हणून शाळेची व्यवस्था पाहताना... शिक्षक दिनानिमित्त आर्णीतील दोन शाळांमध्ये हे अनोखे आणि उत्साहवर्धक चित्र दिसले. विद्यार्थ्यांनीच एक दिवसासाठी आपल्या गुरुजनांची भूमिका साकारत त्यांच्याप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त केला.

येथील बाबा कंबलपोष उर्दू माध्यमिक शाळा आणि आयडियल पब्लिक स्कूलमध्ये हस उपक्रम राबवण्यात आला. बाबा कंबलपोष हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीचा विद्यार्थी राहील फानन याने मुख्याध्यापकपदाची जबाबदारी सांभाळली, तर आयडियल पब्लिक स्कूलमध्ये चिमुकल्या अजलान निसार शेख याने मुख्याध्यापकाची भूमिका बजावली. दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बनून संपूर्ण दिवसाचे कामकाज पाहिले. त्यांनी विविध वर्गांमध्ये जाऊन आपल्या अध्यापन कौशल्याचे प्रदर्शन केले. आयडियल स्कूलच्या लहानग्यांनी तर आपल्या शिक्षकांना भेटवस्तू देऊन त्यांचे प्रेम जिंकले. दिवसभराच्या या यशस्वी उपक्रमानंतर मुख्याध्यापक सैयद इरफान, खालिद शेख, फौजिया आफरीन सैयद, प्रशिक मुनेश्वर, मुमताज बेग यांच्याहस्ते या 'बालशिक्षकां'चा गौरव करण्यात आला. अजीज चौव्हाण, मुजीब शेख, सैयद नौशाद अली, साहेल खान यांच्यासह इतर शिक्षकवृंद यावेळी उपस्थित होते.

### मुख्याध्यापकांच्या खुर्चीतील क्षण

राहील फानन आणि अजलान निसार शेख यांच्यासाठी हा दिवस अविस्मरणीय ठरला. मुख्याध्यापकांच्या खुर्चीत बसून शाळेचे व्यवस्थापन पाहणे, इतर 'विद्यार्थी शिक्षकांना' सूचना देणे आणि संपूर्ण शाळेची जबाबदारी घेणे, हा अनुभव त्यांच्यासाठी केवळ रोमांचक नाही, तर खूप काही शिकवणारा होता. या एका दिवसाच्या अनुभवातून त्यांना नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्याचे प्रत्यक्ष धडे मिळाले.

### अदलाबदलीतून दृढ झाले नाते

शिक्षक दिनाचा खरा उद्देश गुरुजनांप्रती आदर व्यक्त करणे हा असतो. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत शिरून अध्यापनातील आव्हाने आणि शिक्षकांची मेहनत प्रत्यक्ष अनुभवली. भूमिकेच्या या अदलाबदलीमुळे केवळ मनोरंजन झाले नाही, तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते अधिक दृढ झाले. या उपक्रमाने गुरु-शिष्य परंपरेला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले.

## महत्वाचे

### लोखंडी रॉडने हल्ला

**यवतमाळ :** इसमावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीसोबत किरकोळ कारणावरून वाद करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून लोखंडी रॉडने तसेच काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना ८ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी गौतम लाला उफाळे (३०) रा. नेताजी नगर यांच्या तक्रारीवरून आमन हातागडे, निहाल हातागडे, सागन हातागडे, निखिल हातागडे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जुन्या भांडणातून मारहाण

**यवतमाळ :** जुन्या भांडणातुन मारहाण केल्याची घटना घडली. ही घटना ९ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी घरात प्रवेश करून जुन्या भांडणाच्या कारणावरून कोयत्या सारख्या हत्याराने फिर्यादीचे वडील दौलतराव घोडमारे यांचे हातावर, पाठीवर, गळ्यावर मारून जखमी केले. याप्रकरणी निकेश दौलतराव घोडमारे यांच्या तक्रारीवरून मोहन मंगेश बागडे विरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन

### अशोकराव बायस्कर

**यवतमाळ :** येथील वाघापूर



(टेकडी) परिसरातील सावित्रीबाई फुले सोसायटीचे रहिवासी आणि सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी अशोकराव रामदासजी बायस्कर (६०) यांचे सोमवारी, ८ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी, (दि. ९) सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता स्थानिक घाटावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस दलात सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले बायस्कर हे त्यांच्या मनमिळाऊ स्वभावासाठी परिचित होते. त्यांच्या अंत्ययात्रेला विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, चार बहिणी, जावई असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### उर्मिला येटरे

**यवतमाळ :** तालुक्यातील



पांढरी (घोंडखिंडी) येथील रहिवासी उर्मिला नामदेवराव येटरे (६०) यांचे मंगळवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी पांढरी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत मनमिळाऊ आणि कुटुंबवत्सल व्यक्तिमत्व म्हणून त्या गावात परिचित होत्या. त्यांच्या अंत्ययात्रेला नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सून आणि नातू असा मोठा आप्तपरिवार आहे.

# कापूस-सोयाबीन उत्पादकांच्या प्रश्नांवर वणीत 'एल्गार'

## राज्यव्यापी शेतकरी परिषदेत आंदोलनाचा ठराव!; शासनाकडे 'हमीभावा'ची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**वणी, दि.१० :** कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि हमीभावाच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी वणी येथे राज्यव्यापी शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य किसान सभेने आयोजित केलेल्या या परिषदेत, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आगामी काळात तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार एकमताने करण्यात आला आहे.

वणी येथील शेतकरी मंदिरात झालेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले (नागपूर) यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. करमसिंग राजपूत होते, तर अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर यांनी उपस्थितांना प्रमुख मार्गदर्शन केले. परिषदेत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी धोरण आखण्याची आणि कापूस-सोयाबीनला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्याची जोरदार मागणी करण्यात आली. या मागण्यांसाठी राज्यभरातील शेतकऱ्यांना संघटित करून व्यापक आंदोलन उभारण्याचा ठरावही एकमताने मंजूर करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर भाकप राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे (अमरावती), डॉ. महेश कोपुलवार (गडचिरोली), ॲड. हिरालाल परदेशी (धुळे), अशोक सोनारकर (अमरावती) हे उपस्थित होते. तसेच, ॲड. प्रदीप नागपूरकर (नांदेड), ओंकार पवार (परभणी), सतीश चौधरी (अमरावती), संजय बाजड (वाशिम), रामप्रभू कोरडे (हिंगोली), सी. एन. देशमुख (बुलडाणा), प्रकाश रेड्डी (चंद्रपूर) आणि द्वारका इमडवार (वर्धा) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल हेपट यांनी केले, सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष अनिल घाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील गेडाम यांनी केले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी पंढरी मोहितेकर, गणेश कळसकर, मोरेश्वर कुंटलवार, रवी गोरे, गजानन पैसटवार, पांडुरंग ठावरी, प्रा. धनंजय आंबटकर, अथर्व निवडींगे, प्रवीण आडे, ऋषी उलमले, वासुदेव गोहणे, सुरेखा हेपट, शंकर केमेकर, राकेश खामनकर, दत्तू कोळळे, छाया गावंडे, प्रमोद पहूरकर, उत्तम गेडाम, दिनेश शिटोलवार, मिलिंद रामटेके, शैलेंद्र कांबळे, एकनाथ रायसिडाम, प्रदीप नगराळे, दिनेश पारखी यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. राज्यभरातून आलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीमुळे परिषदेला मोठा प्रतिसाद मिळाला.

# वनसंरक्षक कार्यालयाला भ्रष्टाचाराची वाळवी

## सर्वेक्षक १५ हजारांची लाच घेताना अटक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१० :** येथील उपवनसंरक्षक कार्यालयातील भ्रष्टाचाराचे बिंग बुधवारी (दि. १०) फुटले. रुईकर ट्रस्टच्या जमीन सीमांकन अहवालासाठी पंधरा हजार रुपयांची लाच स्वीकारताना, वनसर्वेक्षक सुमित अक्कलावार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ अटक केली. या कारवाईने वनविभागात प्रचंड खळबळ उडाली आहे.

सुमित शंकरराव अक्कलावार (३२) यांनी रुईकर ट्रस्टच्या अधिकाऱ्यांकडे तीन शेतांच्या अहवालासाठी सुरुवातीला ३० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती १५ हजार रुपये देण्याचे ठरले. ट्रस्टने याची तक्रार 'एसीबी'कडे केल्यानंतर, बुधवारी कार्यालयात सापळा रचण्यात आला. रक्कम स्वीकारताच पथकाने त्यांना अटक केली. यावेळी तक्रारदाराने धाडसाने संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण केले, जो महत्त्वाचा पुरावा ठरला आहे. या कारवाईची माहिती मिळताच कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांनी पळ काढल्याने त्यांच्यावरील संशय बळावला आहे. 'एसीबी'ने अक्कलवार यांना ताब्यात घेऊन इतर संशयित अधिकाऱ्यांची चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणामुळे विभागातील जुन्या भ्रष्टाचार प्रकरणांची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. ही कारवाई अमरावती परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक मारुती जगताप यांच्या मार्गदर्शनात, पोलिस उपअधीक्षक अभय आष्टेकर, पोलिस निरीक्षक मनोज ओरके, पोलिस हवालदार अतुल मत्ते, जयंत ब्राह्मणकर, अब्दुल वसीम, सचिन भोयर, राकेश सावसाकडे, इरफान काझी आणि संजय कावळे यांच्या पथकाने पार पाडली.

# आमचे शिक्षक आम्हाला परत द्या!

## उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांचे बाभूळगाव पंचायत समितीत ठिय्या आंदोलन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१० :** 'आमचे शिक्षक परत द्या,' अशी आर्त हाक देत बाभूळगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि. १०) थेट पंचायत समिती कार्यालय गाठले. शैक्षणिक सत्राच्या मध्यातच मुख्याध्यापकांसह तीन शिक्षकांच्या बदल्या केल्याने, संतप्त विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले.

शाळेचे मुख्याध्यापक अझहर अली, शिक्षक शेख जहीर आणि शिक्षिका शहनाज यांची अर्धसत्रात बदली झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती आहे. 'येणारे नवीन शिक्षक कसे शिकवतील,' असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. गटविकास अधिकारी सुनंदा ढोले यांनी, बदल्यांचा निर्णय वरिष्ठ स्तरावरचा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला. 'शिक्षकांच्या बदल्या या ऑनलाईन होतात. त्यामुळे आमच्या हातात काहीच नाही. वरिष्ठांनी जसे आदेश दिले, त्यानुसार आम्हाला काम करावे लागते,' असे गट शिक्षणाधिकारी गणेश मैघाणे यांनी याप्रसंगी सांगितले. मात्र, विद्यार्थी आपल्या मागणीवर ठाम राहिले. 'आमचे शिक्षक परत द्या आणि वरिष्ठांना येथे बोलवा,' अशी एकच भूमिका घेत विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवल्याने प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. या अनोख्या आंदोलनाची तालुक्यात दिवसभर चर्चा होती.

# आर्णीच्या शिवनेरी चौकात आंदोलन

**आर्णी, दि. १० :** जनसुरक्षा कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या कायद्याच्या विरोधात बुधवारी, १० सप्टेंबर रोजी आर्णी शहरातील शिवनेरी चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात तालुकाप्रमुख उज्ज्वल मोरे, विधानसभा संपर्कप्रमुख रमेश ठाकरे आणि शहरप्रमुख पंकज शिवरामवार यांच्यासह असंख्य शिवसैनिक सहभागी झाले होते. हा कायदा जनतेच्या सुरक्षेच्या विरोधात असून तो तात्काळ रद्द करावा, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनात लक्ष्मण पठाडे, नितीन राठोड, गणेश राठोड, गुणवंत टाके, साहेबराव राठोड, युवराज देवकर, गोविंद बिसनोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करा

## उमरखेडमध्ये 'गोर सेने'चा मोर्चा; 'एकच मिशन, बंजारा आरक्षण'च्या घोषणा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**उमरखेड, दि.१० :** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करावे, या प्रमुख मागणीसाठी गोर सेना आणि सकल बंजारा समाजातर्फे बुधवारी (दि. १०) उमरखेडमध्ये मोर्चा काढण्यात आला. पारंपरिक वेशभूषेतील महिलांच्या लक्षणीय सहभागासह, 'एकच मिशन, बंजारा आरक्षण'च्या घोषणा देत हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला.

स्थानिक वसंतराव नाईक चौकातून निघालेल्या या मोर्चात 'जय सेवालाल'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला. शासनाने हैदराबाद गॅझेट आणि न्यायमूर्ती बापट आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, तसेच कर्नाटक, तेलंगणा राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही समाजाला घटनात्मक न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. २०१६ पासूनच्या सर्व पुराव्यांचा लेखाजोखा निवेदनासोबत जोडण्यात आला होता. पारंपरिक वाद्यांच्या गजरात मोर्चा उपविभागीय कार्यालयावर पोहोचल्यानंतर, शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. मागण्या मान्य न झाल्यास लढा तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. निवेदन सादर केल्यानंतर मोर्चाची शांततेत सांगता करण्यात आली. या आंदोलनाने प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. सदर मोर्चाच्या यशस्वितेसाठी गोर सेनेचे तालुका अध्यक्ष आकाश आडे, गोपाल राठोड, सूरज राठोड, राम राठोड, बबलू जाधव, नामदेव राठोड, रोहिदास जाधव, योगेश चव्हाण, डॉ. प्रतीक रूडे, शेषराव जाधव, कान्हा जाधव यांच्यासह विवेक मुडे, रमेश चव्हाण, अर्जुन राठोड, डॉ. राम नाईक, अरुणा राठोड, सुनीता चव्हाण यांच्यासह शेकडो समाज बांधव उपस्थित होते.

# मूळव्याधीच्या उपचारासाठी आंतरराष्ट्रीय पेटंट

## डॉ. आलोक गुप्ता यांच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१० :** मूळव्याध आजारावरील उपचारासाठी एका अत्याधुनिक आणि सुधारित पद्धतीचा शोध लावणाऱ्या भारतीय डॉक्टरांच्या चमूला आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले आहे. यवतमाळचे सुप्रसिद्ध डॉ. आलोक गुप्ता यांच्या नेतृत्वातील या चमूने शोधलेल्या 'सर्जिकल मेकॅनिझम'ला जर्मनीच्या पेटंट कार्यालयाने 'युटिलिटी पेटंट' बहाल केले आहे.

'हिमोरॉयडल रिपेअर सिस्टिम विथ अ मल्टिस्टेज प्रोटोस्कोप गाइड सर्जिकल मेकॅनिझम' असे या उपचार पद्धतीचे नाव आहे. निमा प्रोक्टोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे यवतमाळ अध्यक्ष डॉ. आलोक मोहनलाल गुप्ता यांनी या संशोधन चमूचे नेतृत्व केले. त्यांना हिंगोलीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गजानन धाडवे यांचे सहकार्य लाभले. या पेटंटचे मुख्य शोधक आणि मालक म्हणून डॉ. आलोक गुप्ता, डॉ. अमोल अशोक गुप्ता (यवतमाळ) आणि डॉ. ऋषिकेश रामेश्वर तोडकर (बीड) यांचा समावेश आहे. जर्मन पेटंट कार्यालयाच्या अध्यक्ष इवा स्वेव्हियर यांच्या स्वाक्षरीने हेपेटंट प्रदान करण्यात आले. या यशामुळे भारतीय वैद्यकीय संशोधन क्षेत्राची मान जागतिक पातळीवर उंचावली आहे.

# घोरपडीची शिकार करणाऱ्या आरोपींना वन कोठडी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पांढरकवडा, दि.१० :** तालुक्यातील टिपेश्वर अभयारण्यात घोरपडीची बेकायदेशीररीत्या शिकार करणाऱ्या पाच आरोपींना येथील न्यायालयाने तीन दिवसांची वन कोठडी सुनावली असून याप्रकरणी संशयित आरोपींचा तपास वन विभाग करीत आहे.

याप्रकरणी वनविभागाच्या सूत्रानुसार सात सप्टेंबर रोजी पारवा वनपरिक्षेत्रांतर्गत सावंगी नियत क्षेत्रात गस्ती पथकास गस्त घालीत असताना घोरपडीच्या बेकायदेशीर शिकारीची घटना उघडकीस आली. वनविभागाने या शिकार करणाऱ्या विरुद्ध तत्परतेने कारवाई करीत ८ सप्टेंबरला पाच आरोपींना अटक केली, दुसऱ्या दिवशी या आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले तेव्हा न्यायालयाने या सर्व आरोपींना तीन दिवसांची वन कोठडी सुनावली.

दरम्यान, वन्य जिवांचे संरक्षण करणे नागरिकांचे कर्तव्य असून बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या विरोधात वन प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन विभागीय वन अधिकारी उत्तम फड यांनी केले आहे. सदर कारवाई मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावतीचे क्षेत्र संचालक तथा वनसंरक्षक एम आदर्श रेड्डी यांचे मार्गदर्शनात विभागीय वन अधिकारी उत्तम फड, सहाय्यक वनसंरक्षक उदय आव्हाड, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत सोनुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडले.

# कर्जमाफीच्या आश्वासनावरून बच्चू कडू आक्रमक

## नेरमध्ये शुक्रवारी 'कर्जमुक्ती सभा'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१० :** निवडणुकीत दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने, माजी मंत्री बच्चू कडू पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. त्यांच्या प्रहार जनशक्ती पक्षातर्फे, शेतकरी-शेतमजुरांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्यासाठी शुक्रवारी (दि. १२) नेर येथे 'कर्जमुक्ती सभे'चे आयोजन करण्यात आले आहे. यातून 'कुंकू पुसलेल्या बहिणीं'चा लढा तीव्र केला जाणार आहे.

शहरातील निर्मलबन्सी लॉन येथे सकाळी ११ वाजता ही सभा होणार आहे. आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यात कर्जमाफीसाठी सरकारची कासवगती आणि वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर, प्रहारने आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. यापूर्वी 'सातबारा कोरा करा' पदयात्रा, चक्का जाम यांसारखी आंदोलने करूनही सरकार उदासीन असल्याचा आरोप संघटनेने केला. या सभेतून शेतकरी, शेतमजूर आणि दिव्यांग बांधवांच्या ज्वलंत समस्या मांडून, खऱ्या अर्थाने कर्जमुक्ती देण्याची मागणी केली जाणार आहे. या न्याय हक्काच्या लढ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षातर्फे करण्यात आले आहे.

# गुरू म्हणजे आत्म्याचा दीप

## मोरारी बापू : रामकथा पर्वात गुरू-शिष्य नात्यावर मार्गदर्शन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.१० :** आपल्याला नम्र करणे, आपला अहंकार तोडणे, वैराग्य आणि विश्रांती देणे, विकास घडविणे आणि विश्वास वाढविणे हे केवळ गुरूमुळे होऊ शकते. त्यामुळेच गुरू म्हणजे आत्म्याचा दीप, असे मोरारी बापू यांनी सांगितले. रामकथा पर्वाच्या पाचव्या दिवशी त्यांनी गुरू आणि शिष्याचे नाते यावर मार्गदर्शन केले.

येथील दारव्हा मार्गावरील चिंतामणी बाजार समितीच्या प्रांगणात डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा आणि दर्डा परिवाराच्या वतीने प्रसिद्ध आध्यात्मिक संत तथा कथाकार मोरारी बापू यांच्या रामकथा पर्वाचे आयोजन १४ सप्टेंबरपर्यंत करण्यात आले आहे. यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. मोरारी बापू म्हणाले, जो गुरूच्या मौनाला समजतो तोच खरा शिष्य. रामचरित मानसमधील राम-भरत भेट, सीता-राम मीलन आणि शिवधनुष्य भंजन हे केवळ साहित्य नाही तर आत्म्याला हलवून टाकणारी प्रतिकृती असल्याचे त्यांनी सांगितले. गुरू सदैव विचाराने, दृष्टीकोनाने आणि आचरणाने युवा असावा, असे ते म्हणाले. आज माझे वय ८१ आहे. मला वाटते की व्यासपीठावर कथा सांगत-सांगतच मला निवृत्ती मिळावी. कारण अध्यात्मामध्ये निवृत्ती नसते. इथे प्रवृत्तीच निवृत्तीमध्ये बदलते. भगवंताचं कार्य करीत राहणे हीच प्रवृत्ती आहे आणि निवृत्तीही असल्याचे मोरारी बापू म्हणाले.

### तरच जीवन यशस्वी आणि समाज समृद्ध होईल

**यावेळी कथापर्वाचे यजमान डॉ. विजय दर्डा म्हणाले, रामकथेत बापूंनी कठीण परिस्थितीतही आपला सिद्धांत आणि संस्कार सोडू नका, असे सांगितले. रामकथा आपल्याला शक्तीचा उपयोग इतरांवर वर्चस्व गाजविण्यासाठी नव्हे तर दुर्बळांच्या रक्षणासाठी करायचा आहे, हे शिकविते. युवकांनी रामायणातून प्रेरणा घेऊन जीवनात शिस्त, सत्य आणि समर्पण आणावे तरच जीवन यशस्वी आणि समाज समृद्ध होईल.**

### मान्यवरांची उपस्थिती

**अखिल भारतीय चतु:संप्रदायाचे अध्यक्ष महामंडलेश्वर डॉ. संगीतकृष्ण सावरिया बाबा, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, डॉ. सुनीता महात्मे (नागपूर), राजेश जैन (जळगाव-मुंबई), अजंता फार्माचे सीएमडी मधुसूदन अग्रवाल (मुंबई), 'लोकमत'चे समूह संपादक विजय बाविस्कर, प्रा. नितीन वडघाम (राजकोट), राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्कप्रमुख सुनील देशपांडे.**

# 'जनसुरक्षा विधेयक' मागे घेण्याची मागणी

## महाविकास आघाडीचे आंदोलन; सरकारविरोधी घोषणाबाजी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.१० :** राज्य सरकारने नुकतेच पारित केलेल्या 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' विरोधात महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे. हे विधेयक जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे असल्याचा आरोप करत, महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी बुधवारी (दि. १०) येथील संविधान चौकात जोरदार निदर्शने करत विधेयक तात्काळ मागे घेण्याची मागणी केली.

दुपारी बाराच्या सुमारास संविधान चौकात एकत्र येत, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. 'हे विधेयक जनतेच्या भावनेविरोधात असून, सरकारने ते तातडीने मागे घ्यावे,' अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्ष वर्षा निकम यांनी केली. या आंदोलनात त्यांच्यासह शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू देशमुख, शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाध्यक्ष किशोर इंगळे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनामुळेपरिसरातील वातावरण काही काळ तापले होते. राज्यभरात या विधेयकाला विरोध होत असल्याचे नेत्यांनी सांगितले.